Registered NO N. 150

वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७] आकोला-- सोमवार तारीख २ माहे जून सन १९१३ इ० [अंक २१

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट

नं १

मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या **आकोले आणि उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९½ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत व जारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट.

नो० नं० २

हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाट लावाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. ताबडतोब दूर होतात. किं. रु. १८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मुंबरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ३

जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें (मंदिराचें) काम बांधण्याचे सुरूं आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामी संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल कर्ते नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात म्हणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुनी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी.

व्यवस्थापक
रामचंद्र कृष्णाजी पाटील
नो० नं० ४

—सीतागीत—किं. २ आणे

शाळा खात्यानें मंजूर केलेलें, मनोरंजन, केसरी, आनंद वगैरेनीं उत्तम अभिप्राय दिलेलें, मुद्दाम स्त्रियांकरितां सोप्या व चटकदार चालीवर रचलेलें.

अडीच आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

कर्ता:--- गणेश दिनकर आठवले
घर नं. ६७२ सदाशिवपेठ
नो० नं० ९ पुणें सिटी.

निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहिवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्यांना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझें मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचें देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे. भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. ६

वऱ्हाडांत खात्रीचा उत्तम नवीन सोय.

खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां **डोळे तपासून** सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ७ आकोला

उन्हाळ्याकरितां

लिमलेटच्या वड्या

१६ वड्यांचे बाटलीस ८ आणे पोष्टखर्च माफ. ६ बाटल्या घेणारास एक बाटली फुकट. खात्री करितां एकच मागवा.

डि. व्ही. राजवाडे बुधवार पेठ पुणें सिटी
नो० नं० ८

अपूर्व लाभ ! अपूर्व संधी !! अपूर्व संधी !!!

उत्तम कलप.

—:-*-:-*-:—

जर तुह्माला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहींत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखें मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे. एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त म्हणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे.

ट. ह. निराळा

आमचा पत्ता

हजरत मौलाना आशके याजदानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई

नो० नं० ९

रामबाण उपाय.

रक्तपिती व कोड

[illegible] हजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी म्हणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंशय सिद्ध करितील या पुड्या वापरून अनुभव पहावा म्हणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ४॥ ठेविली आहे. ही [illegible] तेलंग, किंवा मि. दयाराम गिडुमल यांच्यासारख्या सुधारकाग्रणीच्या सुंदर व मोहक व्याख्यानांनीं अथवा लेखांनीं सामाजिक सुधारणेंचें पाऊल जितकें पुढें पडलें आहे त्यापेक्षां त्यांच्या अवसानघातकी कृत्यांनीं तें अधिकमागें पडलें आहे ही गोष्ट त्यांचे अंधभक्त कबूल न करोत, पण ज्याला पाहण्यास डोळे आहेत व विचार करण्यास बुद्धि आहे ते निःशंकपणें कबूल करतील. यांना सुधारकाग्रणी हें नांव देणें [illegible] जे सुधारणापक्षाची निवळ थट्टा आहे [illegible] नंदीबैल सुधारणापक्षाचें जेवढें नुकसान केलें [illegible] चडपणें सामाजिक सुधारणेला

नो० नं० १० [illegible] वकांनीं व वक्तृत्वांनीं [illegible] तच्या उदाहरणांत

नोटीस

खालील सह्या करणार यांज कडून

चंद्रभागाबाई भ्रतार खंडुजी देशमूख राहणार कसबे रिसोड ता० वाशीम जि० आकोला यांस:—

नोटीस देण्यांत येते की मौजे भरजाहागीर प्र० रिसोड ता० वाशीम जि० आकोला येथील शेतें खाली लिहिल्या प्रमाणें

आह्मी नोटीस देणार वहितदार	स० नं०	एकर	आकार	शेत निशानी
शिवाजी व॥ कृष्णाजी कोळी व हरी व॥ बाळाप्पा आरे कानडी उभयता रा० भरजाहगीर	५ सालीम	९"२	११	विहिरीची पट्टी शेरी
	६ "	८"२८	१०	मोरगव्हाण वाट शेरी
	७ "	३६"३७	१७	शेरी पैकी पूर्वभाग
बळवंता व॥ रामजी व आबाजी व॥ पुंजाजी गरकळ राहणार भरजहागीर	१२	२८"४	१५	कसइथळाचा उत्तरेचा बरडाचा भाग
गंगाराम व॥ कृष्णाजी सोनार व लक्ष्मण सखाराम वाणी जिरवनकर रा० भर	४१	२०"१४	२६	बेंदाडी
कोंडापा व॥ दगडापा महाजन रा० भर	२९	७"१	१०	बाग

हीं वरील शेतें वर लिहिल्याप्रमाणें आह्मी भरजागीरदार साहेबा कडून वहात असून आजपर्यंत आमची वहिती बिन बोभाट चालली आहे. तुमचा व आमचा कांहीं एक संबंध नसता कबुलायत द्या नाहींतर आह्मी तुह्मास शेत वाहू देत नाहीं तंटा करूं अशी दहशत तुह्मी व तुमचा मुखत्यार रामराव भिकाजी व त्यांचे साथीदार मार्तंड मैराळ पांडे वगैरे यांचे मार्फत घातली होती आता जनाब सबडिव्हिजनल आफिसर साहेब बहादूर कोर्ट वाशीम यांनीं तुमचा मुखत्यार रामराव वगैरे इसमाना जबरीनें ताबा न घेण्या बद्दल ताकीद समज दिली आहे. तरी ह्या नोटिसीनें तुह्मास खुद्द व स्पष्ट कळवितों कीं आह्मी जागीरदाराकडून शेतें वहात असल्यामुळें आह्माला तुह्मास कबुलायती देता येत नाहींत व तुह्मी विनाकारण कांहीं संबंध नसतां आह्माला कबुलायती मागू नयेत. कळावे ता० १९-५-१३ ई.

दस्तुर सदाशीव पांडुरंग जोशी राहणार भर सही

१ गंगाराम कृष्णाजी सोनार राहणार भरजहागीर दस्तुर खुद्द
२ लक्ष्मण सखाराम वाणी जिरवनकर राहणार भर द. खु.
३ शिवाजी कृष्णाजी कोळी रा. भर नि. खुद्द हातचा आंगठा असे.
४. हरी व॥ बाळापा आरे कानडी रा. भर नि. आंगठा असे.
५ कोंडाप्पा व॥ दगडाप्पा महाजन कानडी रा. भर नि. आंगठा द. गंगाराम सोनार
६ बळवंता व॥ रामजी गरकळ रा. भर नि. आंगठा द. गंगाराम सोनार
७ आबाजी वल्लद पुंजाजी गरकळ रा. भर नि. हातचा आंगठा असे द. गंगाराम सोनार

नो० नं० २०

नोटीस

नोटीस बेशमी रायजी मर्द जद्यानी ठोले कुणबी राहाणार हसनापुर तालुका दर्यापूर ईस:—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची आई आमची चुलती हें ६ महिने झाले मरण पावली तो वारसा तुमचें नांवानीं झाला तो माल शेत सर्वे नंबर ९७ एकर १४ गुंठे ८२७ [illegible] आहे [illegible] रेल ह्या महाल अधिकाऱ्यांचें [illegible] संबंधांत प्रांतिक व्यक्त करीत अ[illegible] या प्रश्नाची स[illegible] दाखवित आहे[illegible] काऱ्यांनीं अ[illegible] त्या निराळें ठेवण्यांत पण त्यांच्या [illegible] कंवा एक तजवीज म[illegible] बंगाल आहे मे[illegible] अधि[illegible] सही रोकडे राहाणार लखाऊ निशाणी खुद्द

नोटीस

रा. रुंजाजी वल्लद लालु उर्फ गणाजी मामनकार रा० तेल्हारा तालूका अकोट

यांस:-

खाली सही करणारा कडून कळवीण्यांत येतें कीं तुह्मी मला रोखा रुपये १०० शंभरचा करून दिला होता. रुपये तुह्मास मागीतले असतां देत नाहीं माझे घर जळाले त्यात तो रोखा जळला आहे तरी नोटीस पावले पासून आठ दिवसांनी रुपये व्याजासह व नोटीशीचे खर्चासह देऊन माझी पावती घ्यावी. तसे न केले तर फीर्याद करून त्याचा खर्च व रुपये द्यावे लागतील कळावे. ता० ८-५-१३ई.

सही

जानकीराम जयराम जिनगर तेल्हारा द. खु.

नो. नं. २२

जाहिरात

तारीख ३१-३-१३ चे वऱ्हाडसमाचारांत प्रसिद्ध झालेल्या निराश्रीत बालरक्षण गृहा संबंधी नियमा पैकीं नियम ८ वा कमी केला आहे ता. २२-५-१३

मुक्काम अकोला

सही

जी. श्रीमंता तर्फे विष्णू प्रभुराम मॅनेजर

नो० नं० २३

वऱ्हाडसमाचार

वैशाख वद्य १२ शके १८३५ प्रमादी

राजकीय अत्याचाराचें निष्फलत्व

राजकीय अत्याचारामुळें इतिहासाचा ओघ बदलत नसतो या विषयावर उत्कृष्ट निबंध लिहिणारासाठीं मुंबईच्या इंडियन सोशल रिफॉर्मर पत्राच्या संपादकांनीं एक बक्षीस लाविलें होतें तें दिल्ली येथील सेंट स्टीफन्स कालेज मधील मि० आत्माराम नांवाच्या एका विद्यार्थ्यानें मिळविलें. असें बक्षीस लावून विद्यार्थी वर्गाला या विषयाचें चिंतन करण्यांस लावण्याची आमच्या व्यवसाय बंधुची कल्पना खरोखर अभिनंदनीय होती. बक्षीस मिळालेला निबंध ही विद्यार्थ्यानींच नव्हे तर थोरांनीं सुद्धां वाचून मनन करण्यासारखा आहे. शिवाजी, शिकंदर, नेपोलियन, जॉर्ज वाशिंगटन, यांच्या सारखे थोर पुरुष हे इतिहासाचे कर्ते—इतिहासाचा प्रवाह हवा तिकडे वळविणारे—होत असें सामान्यतः ह्मणण्यांत येत असतें. पण हें विधान अंशतः खरें आहे, सर्वांशीं नाहीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. माणसाप्रमाणें राष्ट्रें ही परिस्थितीचे दास होत हीच गोष्ट मुख्य नियम मानण्यास हरकत नाहीं. परिस्थिति इतिहासाच्या ओघाची खरी नियंत्री असते, आणि ही परिस्थिति अनेक घटकावयवांमिळून झालेली असते. यांतला मुख्य घटक ह्मणजे धर्म हा आहे. समाजांत रूढ असलेल्या धर्म व नीतिविषयक कल्पना समाजांत कांहीं गरजा निर्माण करून ठेवित असतात, व त्या गरजा भागविण्याचें सामर्थ्य राष्ट्राचे ठायीं निर्माण करणें येवढें काय तें थोर पुरुषांच्या हातचें असतें. पण त्या गरजा निर्माण करणें हें कार्य त्याच्या शक्ती बाहेरचें आहे. या गरजा भागविण्याचें सामर्थ्य त्या राष्ट्राच्या ठायीं बीजरूपानें नसेल तर थोर पुरुष उत्पन्न होऊन ही कांहीं कार्य व्हावयाचें नाहीं. सारांश काय, मनुष्य हा एक तऱ्हेनें अतिशय पंगु आहे, राष्ट्राच्या अंगचें बीजरूप सामर्थ्य हीच मुख्य शक्ति आहे. ही मुख्य शक्ति ह्मणजेच राष्ट्राची नीतिमत्ता होय. आमच्या शास्त्रकारांनीं हेंच तत्व निराळ्या तऱ्हेनें इतिहासाला लाविलें आहे. त्यांनीं ह्मटलें आहे—'यत्र यत्रेश्वरः कृष्णः यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयोभूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम' येथें कृष्ण व पार्थ धनुर्धर या दोन व्यक्ति दुसरें कोणी नव्हत तर राष्ट्रांतले कर्ते पुरुष व राष्ट्राची अनुकूळ परिस्थिति याच होत. अनुकूळ परिस्थिति असली ह्मणजे तिचें कार्य करणारी माणसें आपोआप निर्माण होतात. अशीं माणसें उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्या राष्ट्राच्या ठायीं भरपूर असतें. त्यांतला एखादा दुसरा राजकीय अत्याचाराला बळी पडल्यानें त्या सामर्थ्याला कुंठितपणा येत नाहीं. कर्तृत्वाचा तो जिवंत झरा असतो. अशा वेळीं अत्याचार निष्फल होतात ईश्वराची इच्छा प्रबळ असते. इतिहासाचा ओघ वाहावयाचा तसाच वाहत जातो; त्याची दिशा बदलत नाहीं किंवा त्यांत खंड पडत नाहीं.

या नियमाला इतिहासांतलीं हवीं तेवढीं प्रमाणे देतां येतील. आशिया खंडांतल्या-विशेषतः हिंदुस्थानच्या इतिहासांत—राजकीय अत्याचाराचीं उदाहरणें अतिशयच दुर्मिळ आहेत, पण जीं आहेत तीं वरील नियमाचें पुष्टीकरण करणारींच आहेत. युरोपखंडाचा इतिहास तर राजकीय अत्याचाराच्या असंख्य उदाहरणांनीं कलंकित झालेला आहे. तथापि तेथें सुद्धां त्या अत्याचारामुळें इतिहासाचा ओघ बदलल्याचें आढळत नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. इंग्लंडांत मध्यंतरी कांहीं काळपर्यंत राजाला स्वेच्छेनें राज्य करण्याचा ईश्वरदत्त अधिकार आहे अशी समजूत प्रबळ झाली होती. पण ती पहिल्या चार्लस राजासारख्या दुर्बळ राजाच्या प्रभावामुळें काय? किंवा युरोपांत कांहीं काळपर्यंत दुसरा फिलिप, चौदावा लुई, किंवा पांचवा चार्लस यांनीं धुमाकूळ घातला होता तो त्यांच्या त्यांच्या व्यक्तिशः प्रभावामुळें काय? नाहीं. राष्ट्राची परिस्थिति त्यांच्या पाठीशीं होती तिचा तो प्रभाव होता, व त्या व्यक्ति नाहींशा झाल्या तरी ती शक्ति कायम होती तों पर्यंत कांहीं विशिष्ट समजूती लोकांत ही कायम होत्या. पण ती परिस्थिति हळूं हळूं बदलत गेली, तेव्हां इतिहासाच ही ओघ बदलला. हल्लींच्या काळीं सुद्धां रशिया वगैरे कित्येक देशांत अत्याचाराची संख्या मोठी आहे ह्मणून तेथील परिस्थितींत त्यामुळें काय फरक घडत आहे? कांहीं नाहीं. सारांश काय, तर राजकीय अत्याचार हे इतिहासाचा ओघ बदलण्यास समर्थ नाहींत. अशा अत्याचारांनीं तो ओघ बदलण्याचा यत्न करणें ह्मणजे गवताच्या काडीनें समुद्राचा ओघ पालटूं पाहण्यासारखें हास्यास्पद कृत्य आहे. इतिहासाच्या ओघाला दिशा लावण्याची शक्ति राष्ट्राच्या परिस्थितीचे ठायीं असते व ही परिस्थिति ज्या अनेक घटकावयवांमिळून झालेली असते ते घटकावयव ह्मणजे धर्म व नीति यांविषयींच्या कल्पना, आनुवंशिक संस्कार, शिक्षण प्रसारानें व्यक्तीच्या ठायीं उत्पन्न होणारे कर्तृत्व इ० निरनिराळ्या प्रकारचे आहेत. हें तत्व आमच्यांतल्या तरुण मंडळीच्या मनावर पुर्णपणें बिंबण्याची फार अवश्यकता आहे कारण इतिहासाच्या अध्ययनाची खरी सफलता त्यांतच आहे.

अपेशाचीं कारणें.

गेल्या पांच सहा वर्षांत स्वदेशीच्या कल्पना प्रसृत झाल्यापासून आमच्या देशांत औद्योगिक कारखान्याची संख्या झपाट्यानें वाढत आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं हे कारखाने जितक्या झपाट्यानें उभारले जातात, तितक्याच त्वरेनें ते बंद ही पडतात. कित्येक वेळां तर कारखाना निघाल्याबद्दलच्या बातमी बरोबरच तो बंद पडल्याची ही बातमी येते. आमचे कारखाने असें अल्पायुषी कां व्हावे हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे, आणि या प्रश्नाचा विचार करण्या करितां हिंदुस्थानसरकारानें कांहीं कमिटी वगैरे नेमण्याची तजवीज करावी अशी योग्य सूचना कौंसिलच्या एका देशी सभासदानें केली ही होती ह्मणतात. पण हिंदुस्थान सरकारानें ही नवी जबाबदारी अंगावर घेण्याचें टाळलें. तसें करण्यांस हिंदुस्थान सरकारला काय अडचण अपरिहार्य वाटली तें त्यांचें त्यांना माहित. पण या सूचनेंत खरोखर नवीन असें कांहीं नव्हते. सुधारलेलीं राष्ट्रें आपापल्या प्रजेच्या कल्याणार्थ ज्या गोष्टी करीत असतात तिचाच नमुना येथें उठवावा यापलीकडे या मागणींत अधिक कांहीं अर्थ नव्हता. जपान, जर्मनी, अमेरिका वगैरे राष्ट्रें लोकांच्या औद्योगिक सुधारणेंत विशेष मन घालून लोकांनीं सांगण्याची वाट न पाहतां अशीं कामें स्वतःच अंगावर घेत असतात व वेळोवेळीं अशी माहिती गोळा करून लोकांना सादर करतात. त्यांपासून [illegible] व परंपरेनें सरकारचा ही फायदा होतो हें आपण पाहतों. इंग्लंडांत बोर्ड आफ ट्रेड ह्मणून जें एक सरकारी खातें आहे त्याकडे हें कामें सोंपविलें आहे. हिंदुस्थानांतही सरकारानें व्यापार खातें लॉर्ड कर्झन साहेबांच्या वेळेपासून निर्माण केलें आहे. पण हें खतें कोणत्या लोकोपयोगी कामांत गुंतलें आहे याची लोकांना बहुधा खबर नसतें या खात्यानें जर हें व्यापार व उद्योगधंद्यांना साह्य करणारें काम अंगावर घ्यावयाचें नाहीं, तर असलें हें खातें हवें तरी कशाला! असा प्रश्न करणें गैरवाजवी होणार नाहीं.

अल्पवयी अपराधी.

अल्पवयी अपराध्यांना तुरुंगांतून कशा रीतीनें वागविलें असतां त्यांचें वर्तन सुधारलें ह्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे सरकारी अधिकाऱ्यांचें लक्ष लागलेलें आहे व त्यासंबंधांत प्रांतिक सरकारें आपले विचार व्यक्त करीत आहेत, इतकेंच नाहीं तर या प्रश्नाची सद्यःस्थिति कशी आहे तें ही दाखवित आहेत. सरहद्दीवरील प्रांतांचें अधिकाऱ्यांनीं अल्पवयी अपराध्यांना इतरांपासून निराळें ठेवण्याची तजवीज केली आहे. पण त्यांच्या सुधारणेसाठीं यापलीकडे कांहीं एक तजवीज अद्याप केली नाहीं पूर्व बंगाल आणि आसाम या प्रांतांतल्या अधिकाऱ्यांची अशी तक्रार आहे कीं अल्पवयी अपराध्यांना इतक्या कमी शिक्षा कोर्टाकडून करण्यांत येतात कीं त्या अल्पावधींत त्यांच्या सुधारणेची कांहींच तजवीज करतां येत नाहीं. अशा अपराध्यांना तुरुंगांत अल्पकाळ ठेवण्यापेक्षां रिफार्मेटरीमध्यें दीर्घकाळ ठवणें अधिक चांगलें यांत शंका नाहीं. अशा अपराध्यांना चौकशी वांचून फार वेळ कुचंबत ठेवणें ही चांगलें नाहीं, या दोन्ही बाबतींत सुधारणा होणें जरूर आहे. पंजाबांत अल्पवयी अपराध्यांसाठीं बोर्स्टलच्या पद्धती वर तजवीज करण्यांत आली आहे. येथें मुलाला बंधमुक्त झाल्यावर प्रामाणिकपणें उद्योगधंदा करून पोट भरतां येईल असें एखादें काम शिकविण्यांत येतें हें निःसंशय समाधानकारक आहे. मुंबई इलाख्यांतल्या तुरुंगावरल्या अधिकाऱ्यांची अशी तक्रार आहे कीं कोर्टाकडून अल्पवयी अपराध्यांना देण्यांत येणाऱ्या शिक्षेंत सुधारणेची अत्यंत अवश्यकता आहे अशा अपराध्यांकडून जामीन मागणें किंवा अति अल्प अवधीची शिक्षा देणें या दोन्ही गोष्टींपासून उपयोग होत नाहीं. यांत तर सुधारणा झाली पाहिजेंच, पण या शिवाय असे अपराधी बंधमुक्त झाल्यावर कामें वगैरे पतकरून प्रामाणिकपणानें निर्वाह करण्याचें कामीं लोकांनींही त्यांना साह्य केलें पाहिजे, मध्यप्रांतात अशा अपराध्यांना शिक्षा देण्याचे कामीं सुधारणा दिसून येत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. अल्पवयी अपराध्यांना प्रौढ आणि निर्ढावलेल्या अपराध्यांपासून वगळे ठेवण्यासाठीं शक्य ते प्रयत्न चालले आहेत. उमेद आहे कीं लवकरच येथें ही बोर्स्टलची पद्धत सुरू करण्यांत येईल व पंजाबाप्रमाणें मध्यप्रांतांत ही तिचे सुपरिणाम दिसूं लागतील.

तुर्की सत्तेचा अधःपात.

हिंदुस्थानांतली मोगलांची राज्यसत्ता व युरोपांतली तुर्की राजसत्ता यांच्यांत त्यांचें एके काळचें वैभव, राज्याचें विशालत्व, प्रबळ महत्वाकांक्षा, ऐषआरामाविषयींची लालसा, दूरदृष्टीचा अभाव, सुप्तावस्था व इतर जातींच्या मनांत त्यांचें वैभवानें उत्पन्न झालेली इर्ष्या इ० अनेक बाबतींत पूर्ण साम्य आहे. दोघांच्याही अधःपाताची कारणें एकच आहेत. अशा स्थितींत तुर्कीचें राज्य इतकें वर्षेंतरी युरोपांत टिकलें हेंच आश्चर्य ह्मणावयाचें. पण या आश्चर्यकारक स्थितीची मीमांसा एका कारणानें लावतां येते. तें कारण ह्मणजे युरोपांत इतके दिवस ख्रिस्ती राष्ट्रांत एकी नव्हती हें होय. ही एकी जेव्हां जेव्हां झाली तेव्हां तेव्हां तुर्की राज्याचा लचका तोडल्या शिवाय ख्रिस्ती राष्ट्रें राहिलीं नाहींत. 'सुधारक महंमद' नावानें प्रसिद्ध असलेल्या सुलतानाच्या कारकीर्दींत ग्रीस देशानें तुर्कांचें जूं झुगारून दिलें, रशियानें आपल्या राज्याची हद्द सरकावित डान्युब नदीपाशीं आणून भिडविली, ईजिप्तचा महमदअली सुभेदार स्वतंत्र झाला व फ्रान्सनें अलजीरिया हाताखालीं दाबला. याप्रमाणें तुर्की राज्याचा एकेक अवयव क्रमा क्रमानें गळत गेला, तथापि तुर्की लोकांची मध्यवर्ती सत्ता जीव धरून अद्याप राहिली होती. पण तिच्यावर ही ख्रिस्ती राष्ट्रांच्या संघशक्तीनें जोराचा अघात करून शेवटीं तिला गतप्राण केलें सुलतान अबदुल हमीद इतर बाबतींत किती ही नालायक असला तरी हा भावी परिणाम ओळखून होता. पण एकटा करतो काय? त्याचें मुत्सद्दीमंडळ पाहिजे तितकें हुषार नव्हतें व त्यांना सुलतानाच्या अरेरावीवर्तनानें असंतुष्ट केलें होतें. यामुळें त्याच्याही वेळीं थेसली, अनाटोलिया, बॉसनिया, हर्जगोविना वगैरे प्रांत ग्रीस, फ्रान्स व आष्ट्रिया याच्या सारख्या राष्ट्रांनीं गिळंकृत केले व इजिप्त व सैप्रस हीं ब्रिटिश सिंहाच्या पंजांत सांपडलीं. अखेर अखेर इटालीनेंही ट्रिपोलीवर हात मारला आणि शेवटचा प्रहार बाल्कन संघानें करून तुर्की सत्तेला युरोपांत नामशेष करून टाकण्याचें श्रेय घेतलें असा तुर्की सत्तेच्या अधःपाताचा इतिहास आहे. हा अधःपात आशिया खंडांतल्या लोकांना अत्यंत उद्वेगजनक वाटणारा आहे, व त्यामुळें त्या सत्तेविषयीं सहानुभूति वाटणें ही स्वाभाविक आहे आतां आशिया खंडांत तरी त्यांचें पाऊल भक्कम बसतें कीं तेथें हीं कांहीं नव्या भानगडी उपस्थित करून ख्रिस्ती राष्ट्रें त्याला सळो कां पळो करून सोडतात तें पाहणें आहे. आतांपर्यंतच्या इतिहासापासून तुर्की सत्तेनें योग्य धडा घेतला नाहीं, आणि आपलें बळ वाढविलें नाहीं तर मात्र प्रसंग फार कठीण आहे. उमेद आहे कीं तुर्कस्थान आतां तरी जागृत होईल.

औद्योगिक तपासणी

कोणत्याही देशाचें शिल्प व कारागिरी हें त्या देशांतल्या उद्योग धंद्याचें मुख्य जीवन आहे आणि ह्मणूनच सुधारलेल्या देशांतलें सरकार आपल्या देशाची औद्योगिक तपासणी करून कोणतें उद्योगधंदे व कारखानें कशा रीतीनें चालण्यासारखे आहेत याची चौकशी करून अशी माहिती प्रसिद्ध करित असतात. मध्य प्रांत व वऱ्हाड यांची औद्योगिक तपासणी करण्यासाठीं सरकारनें दोन तीन वर्षांपूर्वी कमिट्यानेमून हुशार कामदाराच्या देखरेखी खालीं काम करण्याविषयीं त्यांस फर्मावलें होतें. या कमिट्यानीं मिळविलेल्या माहितीचा रिपोर्ट औद्योगिक उन्नति इच्छिणारांस अत्यंत महत्वाचा वाटेल. मध्यप्रांत व वऱ्हाड यांचे पैदासवारीनें वर्गीकरण केलें तर चार वर्ग होतात— १ गहूच्या पैदाशीचा प्रांत; २ वऱ्हाड व कापुसपिकविणारा इतर प्रांत; ३ [illegible]चे उत्पन्नाचा व ४ मध्यप्रांताचा

[illegible]	००८७६	८११
भाग.		
फ	९६,१४५	४५६
	१२०८५८	६८
	११८२३०	२२३
सुधार	९०४२	२,६६
कापू	६८९१९५	१,०५
[illegible]	३६८६१६	१,४

त व तिगस्त सालचे आठ[illegible]

[illegible]चांन

[illegible]या शिकव[illegible] असें गुरु कराव[illegible]चें अनुक[illegible]शिकवणीप्रमाणें [illegible] अगोदर ठरलें [illegible]चें अनुकरण कराव[illegible] तुकारामाला गुरु [illegible]पंच कधीं करतां [illegible]राम प्रापंचिक या [illegible]गीय वाटणार नाहींत. [illegible]त्याणत्या गोष्टी करूंनयेत [illegible] अयशस्वी प्रपंचावरून [illegible]च्या शिकवणीला गुरु

या मुलुखांत रेशीम, सूत [illegible] ऱ्हेंचा कपडाही होतो. हीं का[illegible] द्धतीनें कशी केली असतां फायदेशी[illegible] तें रिपोर्टांत सांगितलें आहे व त्या [illegible] वर काम शिकविण्यासाठीं नागपुरांत [illegible] शाळा काढण्याचा ही सरकारचा विचार आहे. कापसाशिवाय इतर कित्येक उद्योग ह्मणजे मातीचीं भांडीं, विटा वगैरे करण्याचा धंदा वगैरे होत. याही बाबतींत हा प्रांत जुन्या रूढीलाच चिकटून असल्यामुळें नव्या पद्धतीनें किफायतशीर रीतीनें कामकरणारा एखादा तज्ञ आणून त्याच्या कडून कुंभार वगैरे लोकांना शिक्षण द्यावें व कारागिरांना द्रव्यसाह्य करण्यासाठीं एखादी ब्यांक स्थापावी अशी शिफारस करण्यांत आली आहे. तिसरा धंदा कातड्याचा. हा ही हळूं हळूं ऱ्हास पावत आहे. गेल्या दहा वर्षांत पुर्वी पेक्षां फार मोठ्या प्रमाणावर कच्चीं कातडी बाहेर देशीं गेलीं व तेथून त्याचा पक्का माल तयार होऊन आला. सन १८९१ मध्यें तयार माल १९२३ मण आला होता, तोच १९०६--०७ मध्यें ८४२० मण आला! आणि १८९१ मध्यें ५१८८० मण कच्चीं कातडीं बाहेर गेलीं होती तीं १९०६ मध्यें १६७१०८ मण गेलीं! या व दुसऱ्या अनेक किरकोळ औद्योगिक बाबांवरून या प्रांताच्या औद्योगिक स्थितींत सुधारणेला पुष्कळ जागा आहे हें स्पष्ट होत आहे.

पोर्तुगाल देशांतला तुरूंग

आमच्या ब्रिटिश सरकारच्या व्यवस्थेतले दोष दाखवून ते सुधारण्याचा मार्ग दाखविणें हें आह्मी वर्तमानपत्रांचे संपादक आपलें कर्तव्य समजतों. अशा रीतीनें देशांतलीं एकंदर वर्तमानपत्रें छिद्रान्वेषण करतांना पाहिलें ह्मणजे असें वाटतें कीं इंग्रजी राज्यांत काय अंधार हा आहे? पण तेच रशिया, फ्रान्स, पोर्तुगाल वगैरे इतर देशांतल्या संस्था व त्यांच्या पद्धति यांचें वर्णन वाचूं लागलों व त्यांची ब्रिटिश पद्धतीशी तुलना करून पाहू लागलों ह्मणजे आह्माला ब्रिटिश अंमलाखालीं आणण्यांत दयाळु परमेश्वराचा थोर हेतु आहे व ब्रिटिशसरकार आह्माला सापत्न मातेप्रमाणें वागवीत असले तरी त्याच्या छायेखालीं जे आह्मास सुख लाभत आहे तें अनिर्वचनीय आहे हें क[illegible] करावें लागतें. आमच्या इकडे राज [illegible] परलोकवासी [illegible] तेलंग, किंवा मि. दयाराम गिडुमल यांच्यासारख्या सुधारकाग्रणीच्या सुंदर व मोहक व्याख्यानांनीं अथवा लेखांनीं सामाजिक सुधारणेचें पाऊल जितकें पुढें पडलें आहे त्यापेक्षां त्यांच्या अवसानघातकी कृत्यांनीं तें अधिकमागें पडलें आहे ही गोष्ट त्यांचे अंधभक्त कबूल न करोत, पण ज्याला पाहण्यास डोळे आहेत व विचार करण्यास बुद्धि आहे ते निःशंकपणें कबूल करतील. यांना सुधारकाग्रणी हें नांव देणें ह्मणजे सुधारणापक्षाची निवळ थट्टा आहे यांनीं सुधारणापक्षाचें जेवढें नुकसान केलें आहे तेवढें उघडपणें सामाजिक सुधारणेला विरोध करणाऱ्या लेखकांनीं व वक्त्यांनीं खात्रीनें केलेलें नाहीं. प्रस्तुतच्या उदाहरणांत

हुकुम आहे
वर ३२००० माणसें
हा प्रकार पाहून धर्माला
सुटला आहे. मेलेल्या साधूचीं
उकरून पुरलेल्या प्रेतांची विटंबना
ण्यांत येत आहे. बिचारे साधुसंत सुद्धां
कर्मभोगांतून सुटले नाहींत, कोण
कर हा प्रकार! या मानानें आह्मी
ती सुखांत आहों!

आधुनिक कवि.

सध्या बंगालचे सुप्रसिद्ध कवी बाबू रवींद्रनाथ टागोर यांचा विलायतेंत व अमेरिकेंत जयजयकार चालला आहे. त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या गीतांजलि नांवाच्या इंग्रजी काव्यानें इंग्रजी वाङ्मयांत क्रांति उडेल असें भाकित कित्येक करीत आहेत दुसरे कित्येक असें ह्मणत आहेत कीं या पुस्तकाच्या योगानें पूर्व आणि पश्चिम यांच्यांत परस्पराविषयींची गुणज्ञता वाढेल. रवींद्रनाथ यांचें चरित्र व कविता याविषयावर आपल्यापुढें व्याख्यान देण्यास खुद्द व्हाईसराय साहेबांनीं रे० मि० अंड्रूज यांना पाचारण केलें होतें. या सर्व गोष्टीवरून रवींद्रनाथ यांची कवि या दृष्टीनें कांहीं अलौकिक योग्यता निःसंशय असली पाहिजे हें व्यक्त होतें. ही येवढी योग्यता त्यांना कशानें प्राप्त झाली तें ही आमच्या आधुनिक कवींनीं लक्षांत ठेवण्याजोगें आहे. रे० मि० अँड्रूज यांनीं रवींद्रनाथाच्या चरित्राचें व त्यांना झालेल्या यशःप्राप्तीचें सांगितलेलें रहस्य विचार करण्यासारखें आहे. कवीला नैसर्गिक स्फूर्ति तर पाहिजेच पाहिजे. ती नसली तर तो कवि कसचा पण कित्येक आधुनिक कवित्वाचें स्फुलिंग प्राप्त होतांच गर्वानें फुगून वेड्यासारखें पद्यांत बरळूं लागतात. रवींद्रनाथाला नैसर्गिक स्फूर्ति होती तरी त्यांनीं चंडीदास व विद्यापति यांच्यासारख्या जुन्या वैष्णव कवींच्या काव्यांचा उत्तम अभ्यास करून त्यांचें अनुकरण करण्याचा यत्न केला; थोर व अनुभविक लोकांपासून ज्ञानाचा व उच्च विचारांचा लाभ करून घेतला; खेडेगांवांतल्या लोकांत मिसळून त्यांची साधी राहणी, सोशिकता, आणि मनुष्याविषयींची सहानुभूति हे गुण संपादले; सृष्टिसौंदर्याचें अवलोकन करीत करीत सृष्टीशीं तादात्म्य करण्याचें वळण उचललें. मनुष्य जीवित हें काय आहे त्याचें उद्दिष्ट कोणतें त्यांतलीं [illegible] तीं [illegible] कवीचा? सारांश काय कीं खरें कवित्व संस्कारावांचून राहूं शकतें ही समजूत कित्येक आधुनिक कवींनीं उराशीं बाळगिली आहे ती सर्वथैव चुकीची आहे.

नवा अद्भुत शोध

कमांडंट डार्जेट नांवाच्या एका माणसानें मनुष्याच्या विचारांचा फोटो घेण्याची युक्ति शोधून काढली आहे. युक्ति अगदीं सोपी आहे. ज्याप्रमाणें साधा फोटो घेण्यासाठीं औषधिद्रव्य लावलेली काचेची प्लेट फोटोग्राफर घेतो तशीच एक प्लेट घेऊन ती छापील कागदांत गुंडाळावयाची व मग ही प्लेट माणसाच्या डोक्याला अगर पोटाला बांधावयाची. ह्मणजे त्या माणसाच्या डोक्यांत ज्या गोष्टी बद्दलचे विचार चालले असतील त्या गोष्टीचें पुसट पुसट चित्र आपोआप त्या प्लेटीवर एका तासाचे आंत उमटूं लागतें. ज्या किरणाच्या योगानें हें कार्य घडतें त्यांना त्या शोधकानें तूर्त व्हीकिरण हें नांव दिलें आहे. हा शोध क० डार्जेट यांनीं लाविलाव आपल्या शोधाचे प्रयोग प्यारिस येथील शास्त्रज्ञ मंडळीच्या संस्थे देखत करून दाखविल्यावरून त्यांत कांहीं लबाडी वगैरे नाहीं अशी खात्री झाली आहे. मि० डार्जेट हे आपल्या शोधाची जी उपपत्ति लावतात ती अशी आहे. ते ह्मणतात कीं या चराचर सृष्टींत सचेतन व अचेतन सर्वच वस्तुच्या अंगीं एक प्रकारचें तेज असतें. कांहींत ज्यास्त असतें, कांहींत कमी असतें व हें तेज एकाच प्रकारचें नसतें, या तेजाचें किरण कित्येकापासून दृश्य रुपानें तर कित्येकापासून अदृश्य रुपानें बाहेर पडत असतें. येथें दृश्यव अदृश्य हे शद्ब आपल्या स्थूल दृष्टीच्या अपेक्षेनें योजिलें आहेत. रेडियम सारखे खनिजापासून या तेजाचें किरण इतके बाहेर पडतात की तें स्थूल दृष्टीला सहज दिसतात. वनस्पतीपासूनही ऋतुमाना प्रमाणें हें तेजाचें किरण कमी अधीक बाहेर पडत असतात. मनुष्यादि प्राण्यांचें ही तसेंच आहे. मनुष्याच्या अंगांत जीवन रस ज्या मानानें कमी अधिक प्रमाणांत किंवा कमी अधिक उच्च प्रतीचा असेल त्या मानानें या तेजाचें किरण कमी अधिक प्रमाणांत बाहेर पडतात. कपाळ, हात, बरगड्या वगैरे कित्येक शरीरावयापासून हे किरण ज्यास्त निघतात. तसेंच माणसाची इच्छाशक्ति ज्यास्त असल्यास हे किरण ज्यास्त [illegible] व मनुष्याचा मुस[illegible] [illegible] हीं पाहून वरील ६ जागा चीफ कमिशनर साहेब [illegible] माझ्यात [illegible].

पण सध्यां वऱ्हाडाकडील या तीन जागा रिकाम्या नाहीं. रा. रा. रुस्तुमजी फर्दुनजी, मोईनुद्दीन खान, काशिनाथ श्रीराम जठार यांनीं त्या तिन्ही जागा भरलेल्या आहेत तेव्हां हे तिघे अधिकारी पेनशन घेई पर्यंत वरील ६ जागा प्राव्हिनशिअल सरव्हीसला देण्या संबंधाचा तो सेक्रेटरीचा ठराव पूर्णपणें अंमलात येणार नाहीं. [illegible] तिघे गृहस्थ रजेवर जातील तेव्हां [illegible] कमिशनर साहेब त्यांच्या जागा [illegible] शिअल सरव्हीस मधून भरून [illegible] ढतील. या सहा जागांचा पगार खालील प्रमाणें निर्णित करण्यांत आलेला आहे:—

आमच्या या प्राचीन कल्पनेचा आजपर्यंत उपहास होत आला, पण आतां तिचें पुष्टीकरण क० डॉर्जेट सारख्या शास्त्रज्ञांनीं प्रयोगाच्या द्वारें केलें आहे आमच्या इकडे या तेजाला विशेष काय संज्ञा असे तें ठाऊक नाहीं. नवीन शास्त्रज्ञांनींही अद्याप या तेजाचें नामकरण केलेलें नाहीं. तथापि तूर्त या किरणाला त्यांनीं व्ही—किरण अशी संज्ञा दिली आहे. या व्ही—किरणाच्या शोधापासून पहिला व्यावहारीक उपयोग पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं करून दाखविला आहे तो मनुष्याच्या विचारांत फोटो घेणें हा होय, आणखी दुसरे कोण कोणते उपयोग ते शोधून काढतात इकडे आतां सर्वांचे डोळे लागले आहेत.

गहूं

गव्हाच्या पीका संबंधानें मध्यप्रांताची आख्या सर्व राष्ट्रभर आहे. या प्रांताचा मोठेपणा या पिकावर अवलंबून असतो सर्व ब्रिटिश इंडियांत गव्हाचें क्षेत्र जेवढें आहे त्याच्या मानानें शेंकडा ११. ४० या प्रमाणावर मध्यप्रांत व वऱ्हाड येथील गव्हाचें क्षेत्र येईल. मध्यप्रांतांतील हें क्षेत्र ३३ लक्ष एकर असून वऱ्हाडांतील गव्हाचें सर्व क्षेत्र अवघे ३ लक्ष एकर आहे. वरील आंकड्या वरून पाहतां वऱ्हाडच्या ११ पटीनें मध्यप्रांतांत गहूं पेरण्यांत येतो. मध्यप्रांतांत जी जमीन लागवडी खालीं आहे त्यापैकीं प्रत्येक ७ एकर जमीन मागें १ एकर जमीन गव्हाच्या पेऱ्या खाली येते आणि वऱ्हाड प्रांतांतील लागवडींतील प्रत्येक २७ एकरा मागें १ एकराचें क्षेत्र गव्हाच्या पेऱ्याकडे येईल असें सरासरीचें प्रमाण पडतें. वऱ्हाडची मुख्य दौलत ह्मणजे जसा कापूस त्या प्रमाणें मध्यप्रांताची सर्व श्रीमंती गव्हाच्या पीकावर अवलंबून आहे. क्रमवारीनें पाहतां हुशंगाबाद व सागर हे दोन जिल्हे गव्हाच्या पीका मुळें धनाढ्य आहेत. आणि त्यांच्या खालोखाल बाकीचे जबलपूर, दमो छिंदवाडा, नागपूर, शिवनी इत्यादि जिल्हे येतील. मध्यप्रांताकडे गव्हाच्या पीकाला जोमही चांगला असतो. तिकडे सरासरीनें ३ एकरापासून ३॥ एकरा मागें एक एक टन गहूं पिकतो. गोळा बेरजेनें पाहतां यंदा तिकडे पीक रुपयांतले १३·१४ आणे आलें. वऱ्हाडांत त्या मानानें पीकाचा अंदाजा एखाद्या आण्यानें कमीच आहे. मध्यप्रांतांतील गव्हाचा अंदाजा ९ लक्ष ६१ हजार ६४५ टन असून वऱ्हाडांतील उत्पन्न ७५,७१४ टन होत आहे. गव्हाचें पीक वऱ्हाडांत अधीक होण्याचा संभव आहे; पण पुष्कळशा गव्हाळी जमिनीचा उपयोग कपाशीकडे होत असतो जमिनीला थोडी कष्ट मशागत, पीक उभारण्याचा खर्च थोडा आणि बाजारांत येण्यापुर्वी उभ्या शेतांतल्य कापसाला येणारा चांगला भाव या मुळें स्वाभाविकपणेंच शेतकरी कपाशी पेरण्याला धांव घेतात मध्यप्रांता पेक्षां वऱ्हाडांतील गहूं देखील हलक्या प्रतीचा असून तिकडे तीन साडेतीन एकरामागें १ टन गहूं पिकेल तर तोच इकडे ४।५ एकरामागें १ टन या मानानें उत्पन्न होईल. असा मोठा फरक आहे; आणि तो जमीन, हवा, पाणी इत्यादि निसर्गाच्या विषम कारणामुळें आहे.

जवस

१९१२—१९१३ च्या हंगामांत जवसाचें पीक गव्हा पेक्षांही अधिक मौल्यवान आहे; आणि त्याच्या संबंधाचा व्यापारी धोरणाचा मोठेपणा अजून शेतकरी वर्गाच्या ध्यानांत पुरेसा आला आहे असें दिसत नाहीं. सर्व ब्रिटिश इंडियांत जेवढा जवस पेरला जातो त्याच्या एक तृतियांशाहून थोडा अधिक एवढा जवस मध्यप्रांत व वऱ्हाड मध्यें पेरण्यांत येतो ही गोष्ट निर्विवाद आहे कीं गव्हाप्रमाणें जवसाचा देखील पेरा उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणावर गेल्या दहापांच वर्षांपासून चढत चालला आहे. मध्यप्रांतांत १४ लक्ष एकरांत हा पेरा असून वऱ्हाडांत जवळ जवळ १ लक्ष एकरापर्यंत हा पेरा आहे. या वर्षी हें पीक चांगलें जोरदार आलें नाहीं तथापि पिकाच्या मानानें वऱ्हाडांत जवस अधिक पिकतो असें दिसतें. मध्यप्रांतांत सरासरीनें दर ११ एकरीं १ टन जवस येतो आणि वऱ्हाडांत तोच जवस ७॥ एकरामागें १ टन पिकतो. यंदाच्या एकंदर पिकाचा अंदाजा अनुक्रमें १, २८, ५१० टन व १३, २५२ टन आहे. सध्यां जवसाचा भाव मंदा आहे आणि गेलीं तीन वर्षे जसा गहूं तेजीच्या भावानें विकला गेला तसा जवसाचा भाव स्थिर राहत नाहीं. गहूं हुशंगाबादकडे ८२ २/७ पौंडाच्या दर मणी ३॥ रुपये भावानें विकला जातो तेथें जवसाचा भाव जवळ जवळ दर मणी ६ रुपये १५ आणे पडतो.

खरें कारण

(संप व अपघात यांचें अंतस्थ कारण)

मद्रास आणि सदर्न मराठा रेलवेवरील रोजगारी लोकांनीं तसेंच बी. बी. सी. आय. रेलवे कडील वर्कशॉप मधील ५ हजार लोकांनीं संप केले आहेत. रेलवे कंपन्याच्या व्यवस्थेविरुद्ध हे संप असून संपाची अभिवृद्धि सार्वत्रिक होण्याची मोठी भिती आहे. संप होतात किंवा रेलवेचे अपघात होतात तेव्हां दोषांची फाळणी कशी तरी करण्याची वहिवाट आहे पण या सर्व गोष्टींच्या बुडाशीं कारणें निराळींच असतात. भांडवलवाले व मजूरदार या दोन पक्षामधील हा कलह असतो. आणि भांडवलवाल्याचें वर्चस्व स्वाभाविक असल्यामुळें त्याच्या हातून मजूरदारांची चेंचाचेंच होत असते. संपाचा निकाल कांहीं ही होवो, ही गोष्ट निर्विवाद आहे कीं भांडवलवाले व मजूरदार यांचे मधील परस्पर संबंध समाधानकारक करण्यासंबंधानें सरकारानें हात घातला पाहिजे आणि कायद्याच्या दुरुस्तीनें हे संबंध अधीक सुखावह व प्रेमवर्धक केले पाहिजेत.

बोरगांव स्टेशनावर आगगाड्यांची एक महिन्यापूर्वी टक्कर लागून जो मोठा अपघात झाला त्याच्या संबंधानें मेजर फ्लौडन साहेब डिपुटी कमिशनर यांच्या समोर तीन फौजदारी खटले चालूं आहेत. त्यांचा

यथायोग्य न्याय होऊन दोषांची शहानिशा दयाळूपणानें करण्यांत येईल असा सर्वांस भरंवसा आहे. तथापि आमच्या मतें मोठें कारण अगदीं निराळेंच आहे, रेलवे कंपनीवरील स्टेशन मास्तर वगैरे अधिकाऱ्यांस व इतर नोकरचाकरांस बारा तासांची चाकरी दररोज करावी लागते आणि त्या चाकरीच्या वेळा ऐन झोंपेच्या वेळीं देखील असतात. ही चाकरीची कालमर्यादा फार मोठी आहे आणि त्यामुळें सर्व चाकरमाणसें अगदीं जर्जर होऊन गेलेलीं असतात. अशा बारा तासांच्या चाकरींत जेव्हां मनुष्य थकतो, मेटाकुटीला येतो आणि उदरंभरणाला अन्यत्र सोय नाहीं ह्मणून नाइलाजास्तव कामावर हजर राहून कामगिरी बजावीत असतो तेव्हां जर कांहीं प्रमाद घडले तर अपघात घडतात आणि लोकांचे जीव धोक्यांत येऊन त्यांची आहुती पडते रेलवेवरील हा बारा तास चाकरीचा नियम अपघात घडण्याइतके प्रमाद करविण्याचें कार्य करुन ठेवितो असें आमचें अनुमान आहे आणि अपघात घडल्यावर मागाहून आपण कोणाची सुस्ती निष्काळजीपणा किंवा गुन्हा याची शहानिशा करीत बसतो. मजूरदाराकडून काम घेण्या संबंधानें फ्याक्टरीचा कायदा आहे व रेलवेचा तर स्वतंत्र कायदा आहे तथापि रेलवेकडील नोकरांच्या हातांत केवढी मोठी जोखीम आहे याचा विचार करून सरकारांनीं बारा तास कामाची मर्यादा कमी केली पाहिजे ह्मणजे अपघात पुष्कळ कमी होतील. हल्लीं चालूं असलेले संप मजूराच्या रोजमाऱ्या संबंधानें देखील रेलवेच्या अमलांतील घोड्या एवढ्या चुका दर्शवीत आहेत. या प्रकरणांत हिंदुस्थान सरकारनें ताबडतोब हात घातला पाहिजे असें आह्मांस वाटतों.

नवी योजना

मध्यप्रांत व वऱ्हाड या मधील श्रेष्ठ दर्जाच्या इंपिरिअल सरव्हिस मधील जागा इतकीं वर्षें निरनिराळ्या ठेविल्या होत्या त्या या पुढें एकत्र करण्यांत येतील. दोन्ही प्रांतमिळून ३ डिपुटी कमिशनर २ डिव्हीजनल जज्ज, व १ डिपुटी कमिशनर किंवा डिव्हीजनल जज्ज मिळून ६ जागा प्राव्हिनशिअल सरव्हिसच्या लोकासाठीं मुद्दाम राखून ठेवण्यांत येतील; आणि कामाची लायकी व मनुष्याला मुसलीपणा हीं पाहून वरील ६ जागा चीफ कमिशनर साहेब [illegible] माझ्यात.

पण सध्यां वऱ्हाडाकडील या तीन जागा रिकाम्या नाहीं. रा. रा. रुस्तुमजी फर्दुनजी, मोईनुद्दीन खान, काशिनाथ श्रीराम जठार यांनीं त्या तिन्ही जागा भरलेल्या आहेत तेव्हां हे तिघे अधिकारी पेनशन घेई पर्यंत वरील ६ जागा प्राव्हिनशिअल सरव्हीसला देण्या सशयाचा तो सेक्रेटरीचा ठराव पूर्णपणें [illegible]त येणार नाहीं. वरील तिघे गृहस्थ रजेवर जातील तेव्हां चीफ कमिशनर साहेब त्यांच्या जागा प्राव्हिनशिअल सरव्हीस मधून भरून काढतील. या सहा जागांचा पगार खालील प्रमाणें निर्णित करण्यांत आलेला आहे:—

	पगार
डिपुटी कमिशनर किंवा डिव्हीजनल जज्ज	
वर्ग १ ला	१६००
" २ रा.	१२००
" ३ रा.	१०००
सिनिअर डिव्हीजनल जज्ज	१७००

वऱ्हाडवृत्त.

हवामानः— उष्णतेचें मान पुनः उलटलें आहे आणि उष्मा फार होत असतो पण मध्यंतरी वारा जोराचा सुटतो, ढग वारंवार जमतात, विजा चमकतात, आणि आरबी समुद्रातील तुफानें हीं पर्जन्य कालाचा आगम समीप आल्याचें ध्वनित करीत आहेत. रोगराई नाहीं.

रा० रा० स्टानिअन सी० आय० ई० आडि० जुडिशिअल कमिशनर यांस ८ महिन्यांची रजा देण्यांत आली आहे.

वाढदिवसः— उद्यां चक्रवर्ती श्रीमान बादशाहाचा वाढदिवस असल्यामुळें सर्व आफिसें बंद राहतील आणि मामुली महोत्सव होतील.

रा. रा. ए. आर. इम्मेट असि. सर्जन यांस इलिचपूर येथें मेडिकल अधिकारी नेमण्यांत आले.

अजब करामत.

बालक्षुधा निवारण— लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हौसेनें घेतात. किं० १ तो० ८२ आणे.

हेमसुधा— धुपणी हा रोग पुष्कळ स्त्रियांना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे. किं० १ बाटलीस ३ रु०

कामधेनुगुटिका— अलीकडील निरनिराळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ८६ आणे.

जानकीबाई रानडे } सांगली.
नर्स अॅण्ड मिड्वाईफ. }

नो० नं० २४

जाहिरात

नवीन शाळा

सरकारी इंग्रजी मराठी शाळेंत ज्या विद्यार्थ्यास यंदा जागेच्या अडचणीमुळें घेण्यात आले नाहीं अशा व इतर शिकू इच्छिणारे मुला करितां इंग्रजी मराठी शाळा अमरावती शहर कमेटीनें स्थापन करण्याचें सरकारचे मंजुरातीनें ठरविलें आहे. यंदाचे सालीं इंग्रजी १ ली व ४ थी इयत्ता काढण्याचे ठरले आहे. तरी या दोन वर्गांत येऊ इच्छिणारे विद्यार्थ्यांनीं तारीख १-७-१३ चे आंत आपलीं नांवें कमेटींत नोंदवून घ्यावी. शाळेस सुरुवात ता० १-७-१९१३ ई० पासून होईल.

Sd/—K. V. Brahma
व्हाइसचेअरमन उमरावती शहर
नो० नं० २५ मुनिसीपाल कमेटी

कापूस- तक्ता- साप्ताहिक- २४ मे १९१३ पर्यंत

जिल्हा.	वर्ष	काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता. २४।५।१३ पर्यंतचा आठवडा	काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून	काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. २४।५।१३ पर्यंतचा आठवडा	काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून	गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. — ता० २४।५।१३ पर्यंतचा आठवडा	गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. — ता. १।१०।१२ पासून आज तागाईत
उमरावती	चालूं साल	२,४२२	१६३९८७	६६०	२१,८६०	४,६१५	१६९,३७६
	गुदस्त	३५२	२४५०९२	३०५	२७१८३	....	.
	तिगस्त	१,३१०	१०९१८३	३२४	१२६३९	....	
यवतमाळ	चालूं साल	२१	१३३२०७	३३७	२०,४६२	१२१९	८५,५०९
	गुदस्त	....	१४१४९६	२६	११,८८७	....	....
	तिगस्त	९	४०,३२७	६२	१३ ४८२	....	....
आकोला	चालूं साल	१,२५६	१५५७०३	१,२१०	४७०२०	२,६६१	१७८९८०
	गुदस्त	१३७	१८१७४९	६६०	५०८०२		
	तिगस्त	९८८	१००८७६	८६६	२४१४९		
बुलढाणा	चालूं साल	६८९	९६,१४५	४५६			
	गुदस्त	२९	१२०८५८	६८			
	तिगस्त	७६१	११८२३०	२२३			
एकूण वऱ्हाड	चालू साल	४,३८८	५४९०४२	२,६६			
	गुदस्त	५१८	६८९१९५	१,०५			
	तिगस्त	३,०६८	३६८६१६	१,४			

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठ

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
२७ ६०

[illegible] परलोकवासी [illegible] तेलंग, किंवा मि. दयाराम गिडुमल यांच्यासारख्या सुधारकाग्रणीच्या सुंदर व मोहक व्याख्यानांनीं अथवा लेखांनीं सामाजिक सुधारणेचें पाऊल जितकें पुढें पडलें आहे त्यापेक्षां त्यांच्या अवसानघातकी कृत्यांनीं तें अधिकमागें पडलें आहे ही गोष्ट त्यांचे अंधभक्त कबूल न करोत, पण ज्याला पाहण्यास डोळे आहेत व विचार करण्यास बुद्धि आहे ते निःशंकपणें कबूल करतील. यांना सुधारकाग्रणी हें नांव देणें ह्मणजे सुधारणापक्षाची निवळ थट्टा आहे यांनीं सुधारणापक्षाचें जेवढें नुकसान केलें आहे तेवढें उघडपणें सामाजिक सुधारणेला विरोध करणाऱ्या लेखकांनीं व वक्त्यांनीं खात्रीनें केलेलें नाहीं. प्रस्तुतच्या उदाहरणांत

अमूल्य संधी ? अप्रतीम नासिक चूर्ण !! अमुल्य रत्न.

टि. सि.

सुगंधी औषधी तपकीर.

[illegible] प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकाच्या [illegible]नंदास पात्र झाले आहे. आलिकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कार-[illegible]रोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या [illegible]तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि [illegible] लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट [illegible]आहे.

मस्तकशूल, ज्ञानतंतूची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानसिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक. गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य [illegible]त.

[illegible] घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर [illegible]नें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर [illegible]नें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे प्रिय सुगंधी तपकीर केवल एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभरित असें नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
' डझन डबीस २–६–० " " " ०–६–०

[illegible]चना) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत [illegible] कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील ' किंवा तसें न [illegible]स अडिचरुपयांस पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा [illegible]ध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० ११ पार्क टाऊन पोष्ट' मद्रास

जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत

शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे [illegible]कारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील [illegible] नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर [illegible] असल्यामुळें उघडकीस आले [illegible] मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व [illegible]खातेदाराच्या नांवानीं असलेल्या [illegible] मज्जेसंबंधीं रोग दूर [illegible]नावावरून मला असे वाटले [illegible]पकीर दहा वीस वेळां लिहून दिलेलें स० नं० ए० गु [illegible] तपकीर फक्त दोन [illegible]र असावेत कारण कीं खरेदी [illegible]त आमच्या सुवासिक पट्टेखतांत स्पष्ट खातेदाराची नांवे [illegible]सुगंधी होते. शेंकडों आहेत. ह्मणून मला संशय आला [illegible]प्रमाणें संग्रही ठेवतात परंतु यंदा जेव्हां राईट ऑफ [illegible]शीव्रता एकदोन दिव-[illegible]मोजणी वाले साहेब यांचे कडे [illegible]र्यंत कायम रहातात चवकशी झाली तेव्हां तुमची लबाडी [illegible]ार करविली आहे [illegible]डकीस आली तेव्हां तुह्मास चार चौ[illegible] तिकीटें पाठविलीं समक्ष ह्मटले असतां तुह्मी पंचा समक्ष [illegible]णून हिची किंमत

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
नो. नं. १२ सावकार पेठ, मद्रास

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा

डॉ० वामन गोपाळ यांचा

आयोडाईज्ड सार्सापरिला.

हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत " सर्वोत्तम " अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १३

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANy
Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terme of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceasr of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employinn portion of their annual income or profits in effecting life policies, at oncg create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 14

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

नोटीस

रा० रा० रामचंद्र वासुदेव व माधव वासू जात गुरव पैकी माधव वासुदेव अज्ञान पालन करणार भाऊ रामचंद्र वासुदेव उभयतां रा० बाळापूर जि० आकोला

यांसः—

खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे हिंगणे उंबरे ता० खामगांव जि० बुलडाणा येथील शेत स० नं १७ ए० १३ गुं० १० आकार रु० ५४ याचें खातें खुद्द माझे नांवानें ह्मणजे बाबनसा बंडुसा याचे नांवानीं आहे व शेत स० नं० १३ ए० गुं० १४८५ आ० रु० १७ याचें खातें पुंजाजी वल्लद चाहदाजी पोहे याचे नांवानीं आहे. हीं दोन्ही शेतें तुमचा बाप व माझा बाप यांनीं दोघांनीं मिळून खरेदी घेतलें होतें व ते समाइकीत वहीत करीत होते पुढें तुमचा बाप वारल्यानंतर तुह्मी दोन्ही शेतातील आठ आण्याचे हिस्से ता० १५ १०-०९ ई० रोजीं रक्कम ५०० रुपयास मजला गहाण लिहून दिलें. त्यानंतर गहाण खताचे रुपयाचे मुबदल्यांत व कांहीं नगदी रुपये घेऊन पांच पंचा समक्ष ज्या शेताचे खाते खुद्द माझे नांवानीं आहे त्या शेतांतील तुमचे मालकीच्या एक द्वितिआंश हिस्सा खरेदी देण्याचें ठरविलें व ज्या शेताचें खातें पुंजाजी वल्लद चाहादाजीचे नांवें आहे त्या शेतातील एक द्वितिआंश हिस्सा पट्यानी दरसाल नगदी रुपये ३५ घेऊन देण्याचें ठरलें. त्या प्रमाणें तुह्मी मजला ता० १७-८-१ ई० रोजीं खरेदी लिहून देऊन ता० २५-८-११ ई० रोजीं नोंदून दिलें व पट्टेखतही ता० २५-८-११ ई० रोजी लिहून देउन नोंदून दिलें परंतु वास्तवीक जें शेत खुद्द माझे नांवानीं आहे त्या शेताचे स० नं० ए० गुं० आकार रु० हे मला खरेदी दिलेल्या दस्ताऐवजांत बरोबर लिहून देण्यास पाहिजे होतें तसेंच जे शेत मी पट्टयानीं घेतलें आहे व ज्याचे खाते पुंजाजीचें नांवें आहे त्या शेताचे ही स० नं० ए० गुं० आ० रु० हेही बरोबर पाहिजे होतें परंतु तुह्मी मुद्दाम मला फसविण्या करितां माझे खरेदीचे दस्ताऐवजांत पट्टेखतांतील शेताचा सर्वे नंबर ए० गुं० आ० रु० लिहून दिले व पट्टेखतांत खरेदी घ्यावयाच्या शेताचा सर्वे नं० ए० गुं० आ० रु० हे लिहून दिले ही तुमची विश्वास घाताची चूक मला दोन्ही शेतांचे सर्वे नं० ए० गुंठे माहीत नसल्यामुळें माहीत झाली नाहीं व दोन्ही सालीम शेतें माझ्याच ताब्यांत असल्यामुळें उघडकीस आले नाहीं कारण खातेदाराच्या नांवानीं असलेल्या शेतांच्या नावावरून मला असे वाटले कीं तुह्मी लिहून दिलेलें स० नं० ए० गुंठे बरोबर असावेत कारण कीं खरेदी खतांत व पट्टेखतांत स्पष्ट खातेदाराची नांवे लिहिलेली आहेत. ह्मणून मला संशय आला नाहीं. परंतु यंदा जेव्हां राईट ऑफ रिकार्ड मोजणी वाले साहेब यांचे कडे जेव्हां चवकशी झाली तेव्हां तुमची लबाडी उघडकीस आली तेव्हां तुह्मास चार चौघा समक्ष ह्मटले असतां तुह्मी पंचा समक्ष कबूल केलें की मी माझें इमान बुडवत नाहीं व जरी तुमचे खरेदीखतांत व पट्टेखतांत सर्वे नंबर ए० गुंठे याची अदला बदली झाली तरी मी तुह्मास आतां ही तुमचा दस्ताऐवज दुरस्त करून देतो. त्या प्रमाणें तुह्मास ह्मटले असतां तुह्मी थापा देतां करितां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझा खरेदीचा दस्ताऐवज दुरस्त करून द्यावे असें न केल्यास कायद्या प्रमाणें तुमचेवर विश्वास घाता बद्दल फौजदारी व दिवाणी करून कोर्टखर्च भरून घेतला जाईल कळावे. ता० दस्तुर खुद्द

सही

बाबनसा बंडुसा सोनार राहणार बाळापूर

नो० नं० १५

नोटीस

नोटीस बेशमी महादु वल्लद अर्जुन कुणबी राहाणार रोहण तालुका खामगाव

यांसः—

खाली सही करणाराकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी तारिख १२ मे १९१३ चे वऱ्हाडसमाचारांतून दिलेली नोटीस साफ खोटी असून सर्वे नंबर २४ ७३.१९० बद्दल स्टांप तुह्मीच आणून लिहवला. नंतर १२ दिवसांनीं तो दस्ताऐवज नोंदला व वरील शेताचा ताबाही तुह्मी जाणून आह्मास दिला. फक्त नंबर जरी चुकला असतां तरी ताबा देण्याचे वेळेंस तो तुह्मी कसा दिला. वगैरे वरून लोकांचे सांगण्यावरुन आमची नुकसानी व्हावी या हेतुनें तुह्मी वरील भानगड उपस्थित केली आहे. खरीदीचे रुपये पूर्ण तुह्माला पावले आहेत. तरी असें करणे तुह्मास गैर आहे. जर आतां लबाडीनें २४ चे जागीं २५ नंबर टाकण्याचे भानगडींत तुह्मी पडाल तर तुह्मावर योग्य कोर्टांत काम चालवून आमचे नुकसानी बद्दल रक्कम तुमचें जवळून घेतली जाईल आणि विश्वास घाता बद्दल व या नोटीशी बद्दलचा सर्व खर्चही घेतला जाईल कळावे तारिख २६-५ १३

सही

अबदुल्लाखां वल्लद जरीफखां दस्तूर खुद्द (सही उर्दुत)

नो० नं० १६

नोटीस

नोटीस बेशमी गुल्लु लक्ष्मण मालक गुल्लु धोंडोबा परदेशी कासार दुकान कारंजा तालुका मुर्तीजापुर जिल्हा आकोला

यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमचे दुकानावरून महीनखत रुपये १३२ एकशे बत्तीसचे काढले त्याला आज सुमारें चार वर्षे होऊन गेली व त्या महीनखताचे रुपये ही फिटले त्यानंतर मी, आपणास दस्तैवज मागीतला असतां आज देतों उद्या देतो ह्मणून थापा देता आता माझे कडे तुमचे महीनखताचे वगैरे कोणतेही देणें राहिले नसून उलट [illegible] माझे सासऱ्याचे नवकरी [illegible] तुमचे कडे घेणें राहिले आहेत त्याचा तपशील माझा सासरा नामे भगवंत सोनबा कासार याचे कार्तीक शुद्ध १ रोजी रुपये ४३ तुमचे खात्यवर जमा आहेत वपुढें. कार्तीक शुद्ध पाडव्या पासून फाग व॥ आमावशापर्यंत माहे ५ दरमाह १२ रुपये प्रमणें रुपये ६० एकुण रुपये १०३ निघाले त्यांत त्यानीं ६८ ॥।-। तुमचे कडून उचललें ते वजा जाता बाकी ३४८=॥। तुमचे कडेस घेणें राहिले व माझे स्वतःचे नवकरीबद्दल कार्तीक शुद्ध १ रोजी तुमचे देणे फिटून रुपये २६ घेणे निघाले व पुढें कार्तीक शुद्ध पाडव्या पासून फाग व॥ आमावशे पर्यंत माहे ५ दरमाहा रुपये १२ प्रमाणें रुपये ६० एकुण रु. ८६ तुमचे कडेस निघाले त्यापैकी ३१ रुपये ॥- नव आणे आह्मी उचलले ते वजा जाता तुमचे कडेस रुपये ५४।= घेणे निघाले व माझे सासऱ्याचे रुपये ३४८=॥। घेणे निघाले ते व माझे मिळून ८८ रुपये ॥-॥। तुमचे कडेस घेणे निघाले ते रुपये ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत आह्मा देऊन व आमचा महीनखताचा स्टांपही द्यावा व आमची पावती घ्यावी असें न केल्यास रीती प्रमाणें तुमचेवर फिर्याद करावी लागेल. व मग या नोटीसीचा व कोर्टाचा खर्च तुह्मावर बसेल कळावे तारिख २७ ५-१९१३ दस्तुर खुद्द

सही

विठ्ठलराव व्यंकटराव कासार राहाणार कारंजा दस्तुर खुद्द

नो० नं० १७

नोटीस

नोटीस बेशमी राघोजी वल्लद नारायण भोरे राहाणार ह्मैसपुर तालुका आकोला

यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे पासून तारिख २२-४-१३ ईसवी रोजी रक्कम रुपये पंधराशाचे खरीदीखत लिहून घेऊन बुं. नं. १ अ. नं. १४३३ १३ यांस नोंदून घेतलें आणि आह्मा बायकांना भरण्याच्या बाबतींत फ[illegible] कडेस गोविंदा वल्लद दत्तू [illegible] रुपये तेराशे निघत नसे[illegible] जवळ जवळ निघतात असें [illegible] तेराशे रुपयाचा खोटा हव[illegible] आणि नगदी दोनशे रुपये [illegible] हून घेतले परंतु आह्मास [illegible] रुपये दिले या प्रकारचें [illegible] बीन मोबादल्याचे खरेदी [illegible] हें असें करणें तुमच्या [illegible] नाहीं त्या खरीदी [illegible] किस्तकारी करूनये [illegible] ही नोटीस पावल्या [illegible] आंत भरण्याचे [illegible] आणून द्यावे आणि आमचे पासून नोंदुन घ्यावी असें न कराल तर दिलेले खरीदीखत रद्द समजलें सदरहु शेत आह्मी दुसऱ्यास खरेदी आणि तुह्मी आह्मास फसविलें यांज तुमचेवर फौजदारींत काम चालऊं तारिख २७-५-१३ ईसवी दस्तुर बापुजी पी० रा० आकोला

सही

सखु मर्द हरी रा० तांदळी ता० बाळापुर नि० [illegible]

बायजी मर्द धनु रा० ता० आकोला नि० [illegible]

नो० नं० १८

नोटीस

नोटीस बेशमी बाजीराव वल्लद बा[illegible] जात तीळोले कुणबी आडनाव धोठे [illegible] वणी तालुके वणी जील्हे यवत[illegible]

यांस

खाली सही करणार ईजकडून नो[illegible] देण्यांत येतें कीं. तूं माझा लग्नाचा [illegible] असून लग्न जाहलेस सुमारे २५ पंचवीस जाहले तेव्हां पासोन म[illegible] आपले घरी चांगले प्रकारे वागवीले अ[illegible] सुमारे ५ पांच वर्षें जाहले तूं प[illegible] दुसरी बायको केल्यामुळें मला घ[illegible] मारहाण करून बाहेर काढून दीले [illegible] माझे आंगावरील जे डागीने होते [illegible] हीसकून घेतले त्यामुळें मी अ[illegible] अईबापाचें घरी राहुन कांहीं दिवस नी[illegible] केला पुढे त्याची शक्ती मला पोसण्य[illegible] नसल्यामुळें मी तीन ३ वर्षें लोकांचे [illegible] काढून आपला नीरवाह करीत आहे. [illegible] या नोटीसीनें कळवीते कीं तीन व[illegible] मी अंदाज रुपये ३०० तीनशे लो[illegible] कर्ज काढून खाल्ले त्याजबद्दल त्या लो[illegible] रुपये देऊन त्यांची पावती मजला द्या आणी मग मी तुझे घरी नांदण्यास त[illegible] आहे परंतु तूं चांगल प्रकारें च्यारचव[illegible] रीतीभाती प्रमाणे वागवीन मारहाण कर[illegible] नाहीं. असें प्रकारचा जामीन रुपये २० दोन हजारचा लायक देऊन त्याने ह्म[illegible] जामीनदार यानें करारनामा रजीष्टर क[illegible] द्यावा आणी तो ही नोटीस पोहे[illegible] पासोन कींवा प्रसीद्ध झाले पासोन [illegible] दिवसांचे आंत करावा तसे तुझे [illegible] न [illegible] परलोकवासी [illegible] तेलंग, किंवा मि. दयाराम गिडुमल यां[illegible] च्यासारख्या सुधारकाग्रणीच्या सुंदर [illegible] मोहक व्याख्यानांनीं अथवा लेखांनीं सामा[illegible] जिक सुधारणेचें पाऊल जितकें पुढें पड[illegible] आहे त्यापेक्षां त्यांच्या अवसानघातकी कृत्यां[illegible] तें अधिकमागें पडलें आहे ही गो[illegible] त्यांचे अंधभक्त कबूल न करोत, प[illegible] ज्याला पाहण्यास डोळे आहेत व वि[illegible] करण्यास बुद्धि आहे ते निःशंकपणें कबू[illegible] करतील. यांना सुधारकाग्रणी हें नांव दे[illegible] ह्मणजे सुधारणापक्षाची निवळ थट्टा अ[illegible] यांनीं सुधारणापक्षाचें जेवढें नुकसान के[illegible] आहे तेवढें उघडपणें सामाजिक सुधारणे[illegible] विरोध करणाऱ्या लेखकांनीं व वक्त्या[illegible] खात्रीनें केलेलें नाहीं. प्रस्तुतच्या उदाहरण[illegible]

Regd. NO N. 150

वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७] आकोला-- सोमवार तारीख ९ माहे जून सन १९१३ इ० [अंक २२

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचना:- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीस त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. ठेवीमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक / G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ / एजंट
नं १

मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या **आकोले आणि उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६½ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक / G. A. Phillips.
आकोला २१-९-१० / एजंट
नो० नं० २

हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाट लावाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. ताबडतोब दूर होतात. किं. रु. १८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मुंबरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ३

जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें (मंदीराचें) काम बांधण्याचे सुरूं आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामी संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती कउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल कर्ते नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात म्हणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी. **व्यवस्थापक**

रामचंद्र कृष्णाजी पाटील

नो० नं० ४

—सीतागीत—किं. २ आणे

शाळा खात्यानें मंजूर केलेलें, मनोरंजन, केसरी, आनंद वगैरेनीं उत्तम अभिप्राय दिलेलें, मुद्दाम स्त्रियांकरितां सोप्या व चटकदार चालीवर रचलेलें.

अडीच आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

कर्ता:--- गणेश दिनकर आठवले
घर नं. ६७२ सदाशिवपेठ
नो० नं० ५ पुणें सिटी.

निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वाहिवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्यांना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझें मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचें देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे. भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगानियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. ६

वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन

ठिकाणीं अत्यंत तामसीपणा ही त्यांच्या शिकवणींत आहे. शिवाय तुकारामाला गुरु करावयाचें म्हणजे तुकारामाच्या चारित्र्याचें अनुकरण करावयाचें कीं त्यांच्या शिकवणीप्रमाणें वागण्याचा यत्न करावयाचा तें अगोदर ठरलें पाहिजे. त्यांच्या चारित्र्याचें अनुकरण करावयाचें हा उद्देश असला तर तुकारामाला गुरु करणारास चाणाक्षपणानें प्रपंच कधीं करतां यावयाचा नाहीं. खुद्द तुकाराम प्रापंचिक या दृष्टीनें कोणालाही अनुकरणीय वाटणार नाहींत. प्रपंचांत राहणाराने कोणत्या गोष्टी करूंनयेत हें मात्र तुकारामाच्या अयशस्वी प्रपंचावरून शिकतां येईल. त्यांच्या शिकवणीला गुरु

उन्हाळ्याकरितां

लिमलेटच्या वड्या

१६ वड्यांचे बाटलीस ८ आणे पोष्टखर्च माफ. ६ बाटल्या घेणारास एक बाटली फुकट. खात्री करितां एकच मागवा.

डि. व्ही. राजवाडे बुधवार पेठ पुणें सिटी
नो० नं० ८

अपूर्व लाभ! अपूर्व संधी!! अपूर्व संत्री!!!

उत्तम कलप.

जर तुझाला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहीत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखें मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे. एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त म्हणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे.

ट. ह. निराळा

आमचा पत्ता

हजरत मौलाना आशके यादानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई

नो० नं० ९

रामबाण उपाय.

रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आम्ही आमच्या औषधाची खात्री पटावी म्हणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंशय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा म्हणजे खात्री होईल. नमुन्याच्या अगदी निराळ्या [illegible] परलोकवासी रा[illegible] तेलंग, किंवा मि. दयाराम गिडुमल यांच्यासारख्या सुधारकाग्रणीच्या सुंदर व मोहक व्याख्यानांनीं अथवा लेखांनीं सामाजिक सुधारणेंचें पाऊल जितकें पुढें पडलें आहे त्यापेक्षां त्यांच्या अवसानघातकी कृत्यांनीं तें अधिकमागें पडलें आहे ही गोष्ट त्यांचे अंधभक्त कबूल न करोत, पण ज्याला पाहण्यास डोळे आहेत व विचार करण्यास बुद्धि आहे ते निःशंकपणें कबूल करतील. यांना सुधारकाग्रणी हें नांव देणें म्हणजे सुधारणापक्षाची निवळ थट्टा आहे यांनीं सुधारणापक्षाचें जेवढें नुकसान केलें आहे तेवढें उघडपणें सामाजिक सुधारणेला विरोध करणाऱ्या लेखकांनीं व वक्त्यांनी खात्रीनें केलेलें नाहीं. प्रस्तुतच्या उदाहरणांत

लवकरच प्रसिद्ध होईल!
सामाजिक जगाचें खरें खरें चित्र.

चक्रव्यूह

(एक पंचाकी गद्य नाटक.)

लेखक

रामचंद्र यशवंत केसकर.

राणी संयोगिता, ग्रामसमंध, विलासिनी, कें) व देवीचा खून, सासूबाईची , प्रदर्शनाचें प्रायःचित, इत्यादि ांचा कर्ता.

किंमत १० आणे मात्र जून ३० चे नांवें नोंदविणारास ६ आणे ट० निराळा.

रा० य० केसकर अमरावती

नो० नं० २२

अजब करामत.

बालक्षुधा निवारण– लहान मुलांस वर घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें दि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम कारी आहे. मुलें हौसेनें घेतात. १ तो० ८२ आणे.

हेमसुधा– धुपणी हा रोग पुष्कळ ांना जडतो. यावर खात्रीचा उपाय मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत ते. या औषधानें कसलीही धुपणी ांशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा गरमी यावर ही याचा तात्काल गुण . कित्येकांची खात्री झाली आहे ० १ बाटलीस ३ रु०

कामधेनुगुटिका– अलीकडील निरानि- या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी ात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध . पुष्कळांना अनुभव आला आहे. ० ३ गोळ्यास ८६ आणे.

ानकीबाई रानडे ॅ ॲण्ड मिड्वाईफ. सांगली,

नो० नं० २३

जाहिरात

नवीन शाळा

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ शुद्ध ५ शके १८३५ प्रमादी

नोंदणी खातें

सन १९१२ चा वार्षिक रिपोर्ट रा रा० रुस्तुमजी फर्दुनजी इन्स्पेक्टर-जनरल यांनीं फार सुंदर लिहिला आहे. या खात्याची उत्तरोत्तर भरभराटी आहे इतकेंच नाहीं तर मागील सर्व वर्षा पेक्षां १९१२ च्या भरतीची मर्यादरेषा अती विस्तृत व फार उंच वर गेलेली आहे. राजश्री रुस्तुमजी साहेब लिहितात कीं आणखी एक वर्ष शेतीभाती संबंधानें अबादानीचें गेलें आणि या प्रांतामधून सांपत्तिक उन्नतीचा प्रवाह जो एक सारखा गेल्या कांहीं वर्षा पासून वाढता आहे तो तसाच अव्यहतपणें वाढत चालला आहे आणि त्याचें प्रतिबिंब १९१२ च्या नोंदणीच्या आंकड्या मध्यें पूर्ण पणें उतरलेलें आहे. १९०९ सालीं नोंदणीचे आंकडे फार मोठे आणि तेवढे मोठे आंकडे पुर्वी कधींच नव्हते, पण १९०९ सालचा हा अपूर्वपणा १९१२ सालीं जसा उद्योगधंदा विपूल वाढला तसा अस्तास गेला.

एकंदर ८९,५५२ दस्ताऐवज नोंदण्यांत आले. १९११ च्या आंकड्यापेक्षां हा आंकडा जवळ जमळ १० हजारांनीं वाढलेला आहे. एकंदर मध्यप्रांताचे जिल्हे १८ व वऱ्हाडचे ४ मिळून २२ आहेत. त्या पैकीं शिवनी, दमा, बैतुल व नरसिंगपूर येथील संख्या गुदस्ता पेक्षां थोडथोडी कमीच आहे मुख्य वाढ वऱ्हाड प्रांतांतच आहे. आणि ज्या दस्ताऐवजांची नोंदणी कायद्यानें आवश्यक आहे अशा ७९,९०० पैकीं ५११४७ वऱ्हाडांतले दस्ताऐवज ह्मणजे बक्षीसपत्रें, खरेदखतें, गहाणखतें, कौलपट्टे इत्यादि कागदच पुष्कळ आहेत. ज्या संबंधानें नोंदणीची सक्ती आहे असे कागदपत्र नोंदविण्याकडे वऱ्हाडांतील लोका पेक्षां मध्यप्रांतांतील लोकांचा ओढा विशेष दिसतो. ज्या जिनगी संबंधानें एकंदर खतें, दस्तऐवज वगैरे नोंदविण्यांत आले त्या

कल्पना केली तर न्नगीची ठोकळ किंमत ४८५ एकद्वि- यंत्रानें काम केल्यासयांश लक्ष आहे; पण या किंमतीच्या नीची कापणी २२५ रुपयात [illegible] तर्चे काम मनुष्यांच्या हातून करवून घेतल्यास ६३० रु० खर्च येतो. हा अजमास मजुरीचा दर माणशीं रोज चार आणे धरून केलेला आहे, पण हंगामाच्या दिवसांत चार आणे काय पण सहा सहा आणे मजुरी देऊन ही माणसें काम करण्यास मिळत नाहींत याचा अनुभव प्रत्येक शेतकऱ्याला आहेच. सारांश, गव्हाच्या कापणीला या यंत्रासारखें सुलभ व सोयीचें दुसरें साधन नाहीं. हरभरा, मसूर वगैरे धान्यांची कापणी मात्र या यंत्रानें चांगलीशी होत नाहीं येवढा या यंत्रांत दोष आहे. पण हळूं हळूं हा दोष ही कोणी कल्पक गृहस्थ काढून टाकील अशी उमेद

कर बसविल्या शिवा चालावयाचेंच नाहीं होतें. पण मि० लॉ कर बसविण्याचा आ नाहीं असे अगोदरच अंतःकरणांस स्वस्थता का बसविणें भाग विरुद्ध ओरड करून सहज पाडाव आपणा विरुद्ध पक्षाला मोठी मि० लाइडजॉर्ज यांच मि० लॉइडजॉर्ज यां व्यापारावरच सगळी बजेटाची रचना

दर २५ सभासदामध्यें राहणार आहे. प्रांताची सुपिकता, दांडगी व्यापारवृद्धि, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतां वऱ्हाडाला कायदे-कौन्सिलांत जसें अग्रस्थान मिळावयास पाहिजे तसें देण्याकडे आमच्या स्थानिक सरकारची तात्विक दृष्टी लवकरच वळेल अशी आह्मी उमेद बाळगतों.

कौलपट्याच्या बाबतींत वऱ्हाडांत हे कागद ७२२५ आदल्या वर्षीं होते ते १९१२ त ८८९९ पर्यंत वाढले आहेत. ही वाढ कां झाली याचें कारण राजश्री रुस्तुमजी साहेब असें दाखवितात कीं पुष्कळशी शेती शेतकरी लोकाखेरीज इतर लोकांच्या हातीं आहे आणि शेतीच्या उदीमाला उत्तरोत्तर खर्च अधिकाधीक लागतो ह्मणून लोक नफ्याच्या ठरीव रकमेवर लोक आपली शेती शेतकरीवर्गाकडे लावून काढूं लागले आहेत आणि त्यामुळें कौलपट्यांची संख्या वाढत चालली आहे. या अनुभवाच्या गोष्टीकडे सरकारचें लक्ष विशेष आहे आणि शेतकरी वर्ग खालावत चालला आहे ह्मणून रयतवारीच्या पद्धतींत कांहीं फेरफार करण्याचा सरकारी विचार चालूं आहे. नफ्यानें शेती देते वेळीं साऱ्याच्या अमुक एका पटीपेक्षां अधिक रकमेला लावण्याची कायद्यानें मनाई करण्याकडे विशेष कल आहे असें लोक बोलतात. सरकारला वाटतें कीं आपल्या शेतीची सुधारणा व्हावी! व कबजेदार शेतीवाल्यांनीं शेती घरी वाहावी ह्मणजे शेतकरी लोक सुधरूं लागतील आणि अबकारी दुकानाच्या मक्त्याप्रमाणें शेतीच्या वहितीचा हक्क विकण्याला कांहीं तरी प्रत्यवाय होईल तर बरें!

नोंदणी खात्याचे एकंदर उत्पन्न ३,७५,८८० रुपये असून त्या खात्या निमित्त सरकारला जो आमला ठेवावा लागतो त्याचा खर्च १९१२ सालीं ,३३ ४४७ रुपये लागला. एकंदरीनें नोंदणी खातें ह्मणजे सरकारी १७५००० रु. उत्पन्नाची बाब आहे.

अमेरिकेंतली राज्यसुधारणा

युरोपांतलें तुर्की बाल्कन युद्ध संपून तहनाम्यावर बाल्कन संघ व तुर्कस्थान यांच्या सह्या झाल्या. तथापि येवढ्यानें युरोपांत शांतता प्रस्थापित होईल असें मानणें चुकीचें होईल. कारण तहनाम्यानें मुख्य मुख्य वादग्रस्त गोष्टींचा तेवढा निकाल लावला आहे, तरी किरकोळ बाबी अद्याप दग्रस्तच आहे आणि या किरकोळ बींना केव्हां गंभीर स्वरूप प्राप्त होईल चा कोणालाच कांहीं नेम सांगतां येत हीं. युरोपांत या प्रमाणें कांहीं अंशी शाततेचें मूळ कायमच राहिलें आहे. च वेळीं अमेरिकेनें मात्र आपल्या राजतींत सुधारणा करण्याचें पूर्णपणें मनावर तलेलें दिसत आहे. अमेरिकेचे नवे प्रेसिट डॉ० विल्सन यांचा प्रवेश 'श्वेतमंदरांत होतो न होतो तोंच त्यांनीं अगोदर जून ठेवलेल्या सुधारणांना कृतीचें स्वरूप ण्याला उपक्रम केला आहे. त्या देशाच्या उद्योगाच्या रक्षणार्थ आणि नव्या उद्योगांना उत्तेजन देण्यासाठीं परदेशाहून येणाऱ्या तयार किंवा अर्धवट तयार मालावर भारी जकात घेण्याचा प्रघात तेथील रिपब्लिकन पक्षानें चालूं केला होता. त्याचा परिणाम असा झाला कीं भांडवलवाल्यांनीं संघ करून एकेक उद्योग आपले हातीं घेतला व मालाच्या किंमती वाटेल तशा चढविल्या गरीबांचे त्यामुळें हाल होऊं लागले, आणि पैशाकडे पैसा जाऊं लागला. अमेरिकेंत थोडक्या काळांत जे अनेक धन संपन्न लोक कोट्याधीश होऊन बसले याचें रहस्य या संघांत आहे. या संघाच्या विरुद्ध लवकरच तक्रारी सुरू झाल्या. पण 'द्रव्येण सर्वे वशः' हा मानवी स्वभावाचा धर्म अमेरिकेंतही असल्यामुळें गरिबांची इतके दिवस दाद लागली नाहीं. यंदा डेमोक्रॅटिक पक्षाचे डॉ० विल्सन हे प्रेसिडेंट पदारूढ झाल्यापासून या गरीब वर्गाला आपली दाद आतां लागेल असें वाटूं लागलें. माजी प्रे० रुझवेल्ट व टाफ्ट या दोघांनीं ही गरिबांविषयीं सहानुभूति नुसती पोकळ शद्बानीं दाखविली होती. पण प्रे० विल्सन यांचें असें मत आहे कीं अमेरिकेच्या उद्योगधंद्याच्या रक्षणार्थ किंवा उत्तेजनार्थ भारी जकात ठेवण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून त्यांनीं हातीं अधिकार येतांच अगोदर जकातीचे दर कमी केले. या नवीन योजनेंत बराच सारासार विचार ठेविला आहे. कारण कीं ज्या पदार्थांची गरज गरीब व धनवान यांना सारखीच लागणारी आहे असें पदार्थ ह्मणजे खाद्यें, व पेयें, कागद, शेतकीचीं आउतें, कापड चोपड वगैरेवरची जकात अजिबात उठवून जवाहीर उंचीकापड, व चैनीचे पदार्थ यांवरच दर वाढविले आहेत. अफू व ची जकात दुप्पट केली आहे. दारू व तंबाखू यावरची जकात पूर्वीं इतकीच ठेवली आहे. अमेरिकेच्या नौकानयनाच्या उद्योगाला उत्तेजन देण्यासाठीं अमेरिकन जहाजांतून मालाची नेआण करणारास सवलत ठेविली आहे. अमेरिकेच्या नव्या प्रेसिडेंटानें हें काम मोठ्या धैर्यानें हातीं घेतल्यापासून इतर राष्ट्रांच्या पोटांत दुखूं लागलें आहे. तथापि लक्षावधि गरीब लोक डॉ० विल्सन यांस आशिर्वाद देत आहेत. याचा राजनीतीवर काय परिणाम घडतो तें आतां पाहणें आहे.

शेतकऱ्यांच्या उपयोगाची माहिती.

हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळें अमेरिकेंत नवीनच निघालेल्या एका यंत्रामुळें त्याला स्वतःचा बराच फायदा करून घेतां येण्यासारखा आहे. हें यंत्र ह्मणजे धान्याची मळणी करणारें यंत्र होय. आतांपर्यंतची इकडची शेतकऱ्यांची वहिवाट अशी आहे कीं हंगाम आला ह्मणजे पिकाची कापणी करावयाची व कापून आणिलेलीं कणसें मळ्यांत दुसरी कडे नेऊन तेथें मोठ्या प्रयासानें बैलांच्या व माणसांच्या श्रमानें त्यांची मळणी करावयाची. याला कित्येक दिवस खपावें लागे तेव्हां येवढ्याशा शेतांतल्या पिकाची मळणी होई. अमेरिकेंत गेल्या तीन वर्षांपासून जें एक नवें यंत्र निघालें आहे

त्याच्या योगानें दहा तासांत पंचवीस तीस एकर जमिनीवरील पिकांची मळणी उत्तम प्रकारें करतां येते, आणि या यंत्रानें हल्लींच्या एक चतुर्थांश खर्चांत काम होतें.

शेतांतल्या पिकाच्या कापणीचें काम ही यंत्राच्या योगानें करण्याचा प्रचार इकडे सुरूं होईल तर अलीकडे बैल वगैरे गुरांची संख्या कमी झालेल्या हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांची फार सोय होईल ही गोष्ट मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांच्या नजरेला आज बरेंच दिवसांपासून आली आहे व असें एखादे सोयींचें यंत्र पैदा करण्या विषयीं त्यांची खटपट सुरूं आहे. कापणीचीं पुष्कळशीं यंत्रें सध्या विद्यमान आहेत. त्यांचा उपयोग सदर खात्यानें इकडे करून पाहिला आहे. पण सर्व प्रकारें सोयीचें असें यंत्र आढळण्यांत आलें नाहीं. ह्मणून इकडच्या स्थिती ला सोयींचें होईल अशा रीतीचें एक यंत्र या अधिकाऱ्यांना नवीन च तयार करावें लागलें व या यंत्राचा अनुभव हुसंगाबाद येथें करून पाहण्यांत आला. हें यंत्र अनुमानाप्रमाणें सर्वोत्कृष्ट टरलें. या यंत्राचें नांव नर्मदा—रीपर असें आहे. या यंत्रानें दोनशें एकर जमिनीवरल्या पिकाची कापणी करण्यांत आली व ती उत्तम प्रकारें झाली अशी त्या यंत्राचा प्रयोग प्रत्यक्ष पाहणाराची ही खात्री झाली. हा नर्मदा—रीपर वजनांत अतिशय हलका असून कापणी करणारी सुरी ३॥। फुट लांबीची आहे. हें यंत्र जॅनवॉलेस आणि कंपनी तयार करून देते. त्याची किंमत व आणण्याचा खर्च वगैरे मिळून हुसंगाबादेपर्यंत दोनशे रुपये लागतात हें यंत्र गव्हाच्या कापणीला फार उत्तम आहे अशी अनुभवांती खात्री झालेली आहे. या यंत्रानें एका दिवसांत सात आठ एकर जमिनीची कापणी होऊं शकते. हें यंत्र चालविण्याला बैलाच्या दोन जोड्या पुरेशा होतात. यंत्रानें काम करण्याला दोन व कापलेलें धान्य गोळा करून पेंड्या बांधण्याला सात माणसें लागतात. हेंच काम आपल्या जुन्या रीतीनें करण्याला ३९ माणसांची जरूरी असते. ह्मणजे या यंत्राच्या योगानें २६ माणसांचें श्रम व खर्च हीं वाचतात. कापणीचें काम दोन महिने चाललें अशी कल्पना केली तर तेवढ्या वेळांत या यंत्रानें काम केल्यास ४२० एकर जमिनीची कापणी २२९ रुपयांत होते, तेंच काम मनुष्यांच्या हातून करवून घेतल्यास ६३० रु० खर्च येतो. हा अनुमान मजुरीचा दर माणशीं रोज चार आणे धरून केलेला आहे, पण हंगामाच्या दिवसांत चार आणे काय पण सहा सहा आणे मजुरी देऊन ही माणसें काम करण्यास मिळत नाहींत याचा अनुभव प्रत्येक शेतकऱ्याला आहेच. सारांश, गव्हाच्या कापणीला या यंत्रासारखें सुलभ व सोयीचें दुसरें साधन नाहीं. हरभरा, मसूर वगैरे धान्यांची कापणी मात्र या यंत्रानें चांगलीशी होत नाहीं येवढा या यंत्रांत दोष आहे. पण हळूं हळूं हा दोष ही कोणी कसबी गृहस्थ काढून टाकील अशी उमेद आहे. जेथें गव्हाचें पीक आहे अशा ठिकाणीं तरी शेतकऱ्यांनीं या नर्मदा—रीपरचा उपयोग अवश्य करून पाहाण्याजोगा आहे.

अलीकडे महाराष्ट्र व कर्नाटक वगैरे प्रांतांतल्या लोकांना लोखंडी नांगरापासून होणारा उपयोग कळूं लागल्यापासून पुष्कळ लोकांनीं लोखंडी नांगर आणविले आहेत. परंतु शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळें तो नांगर त्याना योग्य रीतीनें चालवितां न आल्यामुळें त्यापासून व्हावा तसा उपयोग होत नाहीं. अशा लोकांनीं पुढील गोष्टी ध्यानांत ठेवाव्या—सर्व नांगर न हालतां अगदीं बसून चालला पाहिजे. ह्मणजे नांगराच्या दांडीखालीं जी लोखंडी पट्टी असते तिच्या तळाची पुढची व मागची बाजू नांगरलेल्या तासांत भुईसरपट चालली पाहिजे. मागची बाजु किंचित् जरी उचलेली दिसू लागली तरी नांगर चालावा तसा चालत नाहीं असें समजावें. प्रत्येक जोडीपैकीं एक बैल पूर्वीचे तास धरून चालला असतां व नांगराचे हातावर आंत किंवा बाहेर दाब नसतांना नांगराची नांगरले, ल्या जमिनीतच अथवा बिन नांगरलेल्या जमिनीकडे धावण्याची प्रवृत्ति नसावी. तात्पर्य कीं नांगराच्या दोन हातांपैकीं एका हाताला नांगरणाराच्या एका हातानें नांगराला खडा, दगड अगर ढेंकूळ लागलें असतां डगमगूं नये एवढा आधार दिला असतां नांगर अगदीं बसून आंत किंवा बाहेर न जातां व फट्टे न सोडतां सारख्या खोलीचे व रुंदीचे चौकोनीं तास कापीत गेला पाहिजे, व हाकणारास अगदीं प्रयास पडतां कामा नये.

मि० लाइटजॉर्ज यांचें बजेट

इंग्लंडच्या बजेटाची चर्चा हिंदुस्थान वासी यांनीं करण्यापासून कांहीं लाभ नाहीं ही गोष्ट खरी आहे. तथापि विलायती पत्रें त्या बजेटा संबंधानें जी टीका करीत आहेत तिजपासून मनुष्य स्वभावाचें वैचित्र्य मात्र फार उत्तम प्रकारें दिसतें. मानसशास्त्राचें सूक्ष्म अध्ययन करणारास या टिकेंत पुष्कळ गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत, आणि याच दृष्टीनें तिकडील पत्रांची टीका वाचण्यासारखी आहे. मि० लॉइड जार्ज यांनीं जेव्हां आपलें बजेट पार्लमेंटपुढें सादर केलें तेव्हां एज्युकेशनबिल, पेनशन बिल व औषधपाण्याच्या फुकट योजनेचें बिल वगैरे सुधारणांमुळें खर्च वाढल्यामुळें नवीन कर बसविल्या शिवाय या फडनवीसाचें चालावयाचेंच नाहीं असें सर्वांना वाटलें होतें. पण मि० लॉईट जॉर्ज यांनीं नवीन कर बसविण्याचा आपला बिलकुल विचार नाहीं असे अगोदरच सांगून ठेवलेल्यांच्या अंतःकरणांस स्वस्थता आणिली. नवीन कर बसविणें भाग पडले ह्मणजे त्या विरुद्ध ओरड करून लिबरल पक्षाचा सहज पाडाव आपणास करतां येईल अशी विरुद्ध पक्षाला मोठी उमेद होती. पण ती मि० लाइडजॉर्ज यांच्या आश्वासनानें खचली मि० लॅइडजॉर्ज यांनीं इंग्लंडच्या वाढत्या व्यापारावरच सगळी भिस्त ठेवून आपल्या बजेटाची रचना केली. तरी विचाऱ्याच्या कपाळची टिका सुटली नाहीं ती नाहींच. आतां विरुद्ध पत्रें निराळाच रोख ठेवून टीका करीत आहेत. टाइम्स पत्र ह्मणतें कीं हें बजेट सट्टेबाजांचें आहे. मॉर्निंग पोस्ट ह्मणते कीं नाणें बाजाराच्या नियमाला अनुसरून अंदाजपत्रक बनविलें आहे. एक्सप्रेस पत्र ह्मणतें कीं मि० लाइडजॉर्ज यांनीं यांत जुगारीचें कौशल्य दाखविलें आहे. कित्येक तर नवीन कर बसाविले नाहींत ह्मणून हळहळत आहेत. मनुष्य स्वभावाचें वैचित्र्य ह्मणतात तें हेंच!

अपूर्व मीमांसा

थोड्या दिवसांपूर्वी हिंदुस्थानांत सर्वत्र जी अशांतता दिसत होती तिची मीमांसा आजपर्यंत अनेकांनीं अनेक प्रकारें केली अहे. पण हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलाचे माजी मेंबर सरअँड्रयू विंगेट के. सि. आय. ई. यांनीं विलायतेंतल्या मुलींच्या माहिती साठीं या विषयावर लिहिलेल्या लेखांत जी मीमांसा केली अहे ती खरोखर अपूर्व आहे. ते ह्मणतात कीं सती जाण्याची, चाल सरकारनें सक्तीनें बंद केली त्यामुळें लोकांच्या स्वातंत्र्याची झालेली हानी भरून काढण्यासाठीं हलक्या जातीच्या वर्गाची होत असलेली प्रगती थांबविण्यासाठीं, ब्राह्मण जातीला वर्चस्व मिळविण्यासाठीं, व हिंदुस्थानांतल्या ख्रिस्ती लोकांना मार्गे खेचण्या साठीं ही अशांतता उत्पन्न झाली होती- यां पैकीं स्वतःला वर्चस्व मिळविण्याचा ब्राह्मणांचा कावा ओळखल्याबद्दल लंडन टाइम्सचे लेखक मि० चिरोल यांना जर सरकारनें 'सर' किताब दिला. तर त्याच्या चोपट महत्वाचा हा शोध लाविल्या बद्दल सरकार सर ए. विंगेट साहेबास काय बक्षीस देतात तें पाहणें आहे.

प्रपंच कीं परमार्थ

पुण्याच्या वसंतव्याख्यान मालिकेंत तुकाराम महाराज सध्याच्या काळाला योग्य गुरू होत कीं नाहीं या विषयावर आज दोन तीन वर्षें वाद चालला आहे- तुकाराम महाराजाचे कित्येक भक्त असें ह्मणत असतात कीं महाराज हल्लींच्या काळांत सुद्धां उत्तम गुरु होत- कारण कीं त्यांची शिकवणी अशी आहे कीं तुझी दैवी गुण संपादन करा ह्मणजे ते गुण तुझांला प्रपंचांत व परमार्थाचे कामींही उपयोगीं पडतील- याच्या उलट पक्षाचें ह्मणणें दैवी गुण संपादण्याचा उपदेश केलेला नाहीं- कित्येक ठिकाणीं अत्यंत तामसीपणा ही त्यांच्या शिकवणींत आहे. शिवाय तुकारामाला गुरु करावयाचें ह्मणजे तुकारामाच्या चारित्र्याचें अनुकरण करावयाचें कीं त्यांच्या शिकवणीप्रमाणें वागण्याचा यत्न करावयाचा तें अगोदर ठरलें पाहिजे. त्यांच्या चारित्र्याचें अनुकरण करावयाचें हा उद्देश असला तर तुकारामाला गुरु करणारास चाणाक्षपणानें प्रपंच कधीं करतां यावयाचा नाहीं. खुद्द तुकाराम प्रापंचिक या दृष्टीनें कोणालाही अनुकरणीय वाटणार नाहींत. प्रपंचांत राहणाराने कोणत्या गोष्टी करूंनयेत हें मात्र तुकारामाच्या अयशस्वी प्रपंचावरून शिकतां येईल. त्यांच्या शिकवणीला गुरु करावयाचें असलें तर गोष्ट निराळी आहे. येथें सुद्धां अनेक अडचणी आहेत. त्यांतली मुख्य अडचण ह्मणजे तुकारामाच्या निरनिराळ्या काळच्या व निरनिराळ्या मनःस्थितींतल्या उद्गारांत मेळ नाहीं. तेव्हां कोणती शिकवणी ग्राह्य व कोणती त्याज्य मानावयाची हा मोठा प्रश्नच आहे. आह्मांला वाटतें कीं या दुसऱ्या आक्षेपांत बरेंच तथ्य आहे. आपण सगळे प्रपंची आहें. प्रपंचाचा त्याग करून सर्वांनीं विरक्त बनणें हें शक्यही नाहीं व इष्टही नाहीं. अशा स्थितींत तुकारामा सारख्या प्रपंच करण्यांत अयशस्वी ठरलेल्या तुकारामाचा कित्ता आपल्या अगदीं उपयोगाचा नाहीं. प्रपंच साधून परमार्थाचा लाभ करण्याचा मार्ग दाखवील तेच गुरु आह्मांला सध्याचे काळीं योग्य होय. ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं त्यासाठीं पुण्याच्या विद्वान मंडळीला वर्ष दोन वर्षें वादांत घालविण्याची अवश्यकता कां वाटावी तेंच आह्मांस कळत नाहीं.

सामाजिक अधःपात

मुंबई इलाख्यांतील एक सुधारकाग्रणी विद्वान्, विचारी व लोकांचे मार्ग दर्शक मि. दयाराम गिडुमल यांच्या सामाजिक अधःपाताची बातमी ऐकून आश्चर्य चकित होणार नाहीं असा मनुष्य विरळा आढळेल. मि. दयाराम यांनीं सरकार सेवेंत सेशन्सजजाच्या हुद्याचें काम आज कित्येक वर्षें उत्तम प्रकारें केलें आहे. न्या. मू. चंदावरकर यांचे अगोदरपासून हाय कोर्ट-जजाचें जागेवर त्यांचा हक्क होता. पण त्यांना वरिष्ठ न्यायमंदिरांत विराजमान होण्याचा योग आला नाहीं. तथापि लोकांच्या हृदयमंदिरांत त्यांनीं आपलें स्वच्छिल, बाणेदारपणा, आणि सुधारणातत्वाविषयीं अढळ श्रद्धा इ० गुणांनीं उच्च आसन पटकाविलें होतें. अशा गृहस्थाच्या हातून आपल्या वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीं एका बीस वर्षाच्या तरुणीचें पाणिग्रहण आणि तेंही प्रथम पत्नी विद्यमान असतां करण्याचें कृत्य घडलें हें कोणाला ही संभवनीय वाटलें नव्हतें. पण सामाजिक सुधारणेचा इतिहास आमच्या देशांत दुर्दैवानें अशाच असंभवनीय कृत्यांनीं भरलेला आहे. सामाजिक सुधारणा लोकांना अप्रिय होण्याची इतर कारणें कोणतीही असोत, पण सर्वांत प्रबळ कारण सुधारकाग्रणीच्या वर्तनांतला दुटप्पीपणा हें आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परलोकवासी सनदे तेलंग, किंवा मि. दयाराम गिडुमल यांच्यासारख्या सुधारकाग्रणीच्या सुंदर व मोहक व्याख्यानांनीं अथवा लेखांनीं सामाजिक सुधारणेचें पाऊल जितकें पुढें पडलें आहे त्यापेक्षां त्यांच्या अवसानघातकी कृत्यांनीं तें अधिकमागें पडलें आहे ही गोष्ट त्यांचे अंधभक्त कबूल न करोत, पण ज्याला पाहण्यास डोळे आहेत व विचार करण्यास बुद्धि आहे ते निःशंकपणें कबूल करतील. यांना सुधारकाग्रणी हें नांव देणें ह्मणजे सुधारणापक्षाची निव्वळ थट्टा आहे यांनीं सुधारणापक्षाचें जेवढें नुकसान केलें आहे तेवढें उघडपणें सामाजिक सुधारणेला विरोध करणाऱ्या लेखकांनीं व वक्त्यांनी खात्रीनें केलेलें नाहीं. प्रस्तुतच्या उदाहरणांत

. दयाराम यांनीं आपल्या हातानें जो
माजिक अधःपात संपादन केला आहे
केवळ व्यक्तिविषयक नसून सामाजिक
वारणेचा अधःपात होय असें मोठ्या
खानें ह्मणावें लागतें.

आगगाड्या वरले संप

गेल्या सबंध आठवड्यांत लोकांच्या तोंडीं
कडे तिकडे जी. आय. पी. व मद्रास
वे वरील संपाच्या गोष्टी होत्या. जी.
य. पी. रेलवेवर कोणावळा; रायचूर,
तपुरी, खांडवा, बडनेरा, नागपूर, भुसा-
ठ, व सोलापूर इ० स्टेशनांवरील गार्ड,
यव्हर, सिग्नल देणारे या लोकांनीं संप
रून दोन तीन दिवस रेलवेचें काम
हुतेक बंद पडलें होतें. हा संप कर-
ाला या लोकांना वस्तुतः स्वतःचें असें
हीं कारण नव्हतें. ह्मणजे जी. आय.
. रेलवेच्या अधिकाऱ्यां विरुद्ध त्यांच्या
हीं तक्रारी नव्हत्या, किंवा आपला पगार
ढवून घ्यावा, अगर कामाचें ओझें हलकें
रून घ्यावें अशा इच्छेनेंही तो करण्यांत
ला नव्हता. तर केवळ मद्रास रेलवेवर
र्ड व ड्रायव्हर यांच्या कांहीं वाजवी
कारी त्यांनीं रेलवे अधिकाऱ्यांच्या काना-
पुष्कळ दिवसांपासून घातल्या असतां
अधिकारी तिकडे दुर्लक्ष करीत आले
मध्यस्थाच्या मार्फत या वादाचा निकाल
वून घेण्यास ते तयार असतां ती त्यांची
जवी मागणी कबूल करण्यास रेलवे
धिकारी कबूल होईनात, ह्मणून मद्रास
वे वरील लोकांनीं संप केला, तेव्हां
पल्या समव्यवसायी बंधू विषयींची सहा-
ुति व्यक्त करण्याकरितां जी. आय. पी.
ील लोकांनीं संप केला होता. मद्रास
वेवरच्या लोकांना असंतुष्ट होण्याला मात्र
पूर कारणें होतीं. व त्या रेलवेच्या
टानीं अखेरपर्यंत केलेलें वर्तन सर्वथा
णीय होतें. आश्चर्य हें कीं रेलवेसंबं-
ची व्यवस्था सुरळीत चालूं ठेवण्यासाठीं
लोकांच्या फिर्यादी ऐकून त्यांच्या तक्रारी
करण्यासाठीं नेमलेल्या रेलवे बोर्डानें
त्र यावेळीं आपल्या कर्तव्याविषयीं यत्-
चितुही जागृति दाखविली नाहीं. संप
त्यांनीं बोर्डाला तारेच्याद्वारें सर्व स्थिति
च्या अगोदरपासून व नंतरही वेळोवेळीं
ठविली असतां बोर्डानें त्या तारांचें
भर उत्तरसुद्धां पाठविण्याची तसदी
ली नाहीं. यामुळें चिडून जाऊन रेलवे
ल [illegible] अमाल[illegible] सोसायटी
[illegible] नेग[illegible]
ाची जी संस्था आहे तिच्या मुख्य
टणीसांनीं साऱ्या हिंदुस्थानभर संप कर-
चा हुकुम सोडला. या हुकुमाप्रमाणें
आय. पी. वरील पुष्कळशा आणि
रोहिलखंड वरील थोड्याशा लोकांनीं
करून मद्रासच्या लोकांविषयीं सहानु-
व्यक्त केली. हा संप फार दिवस
ला नाहीं, व उत्तर हिंदुस्थान, बंगाल,
ब, वगैरे प्रांतांतून फारसा पसरला नाहीं
सुदैवाची गोष्ट ह्मटली पाहिजे. पण
पसरला असता तर लोकांची केवढी
ोय व व्यापाराची केवढी हानि झाली
ती! आणखी हा येवढा अनर्थ केवळ
स रेलवेच्या एजंटाच्या चढेल व हट्टी
वर्तनामुळें ही गोष्ट ध्यानांत घेऊन हिंदु-
स्थानसरकारनें असा प्रकार पुनः कोठें होऊं
नये ह्मणून त्या एजंटाच्या डोळ्यांत चांगलें
चरचरीत अंजन घालावयास पाहिजे आहे.
मद्रास रेलवेवरील संपवाल्यांच्या सहानुभूती
खातर जी. आय पी. वरील हजार दोन
हजार लोकांनीं तरी संप केला ही गोष्ट
देखील हिंदुस्थानांत अपूर्वच ह्मटली पाहिजे
व संघशक्ति इकडे हळूंहळूं डोकावून पाहूं
लागली आहे या गोष्टीचें हें एक
प्रत्यंतरच आहे.

गायरानें

गुरांना चरण्यासाठीं पुरेशीं गायरानें
नसल्यामुळें वर्षानुवर्षें त्यांची उपासमार होत
आहे, आणि त्यांच्यात भाण नराहिल्यामुळें
एखादें अवर्षण येतांच तीं पटापट मृत्युमुखीं
पडतात. सध्या जी दुध तुपाची महागाई
झाली आहे व शेतीच्या कामासाठीं लाग-
णाऱ्या बैलांचा तुटवडा भासत आहे त्याच्या
मुळाशीं गायरानांची कमतरता ही गोष्ट आहे. ही
उणीव दूर करणें हें भारतीयांचे आद्यक-
र्तव्य होय. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं
या गोष्टीकडे राजकीय पुढाऱ्यांचें लक्ष
जावें तसें अद्याप गेलेलें नाहीं आणि त्या-
मुळेंच त्यांना जागृत करण्याचें कर्तव्य भा-
रतीय गोरक्षण सभेचे चालक मि० जसा-
वाला यांना करावें लागत आहे. मि०
जसावाला यांनीं अर्जद्वारां हिंदुस्थानसरका
रच्या कानावर ही गोष्ट घातली आहे.
मि० जसावाला यांनीं सरकारला अशी वि-
नंती केली आहे की दर ३०० बिघ्यां-
मागें कमींत कमी १५ बिघे जमीन गा-
यरानें ह्मणून राखण्यांत यावी ह्या अर्जांत
केलेली विनंती सरकारानें मान्य केली नाहीं
तरी निरुत्साह न होता त्यांनीं तीच वि
नंती स्टेट सेक्रेटरी साहेबास केली आहे
हिंदुस्थानला निर्मळ स्वराज्य पाहिजे कीं
वसाहतीचें स्वराज्य पाहिजे या विषयीं
व्यर्थ काथ्याकूट करीत बसण्या पेक्षां मि०
जसावाला यांच्या सारखें एखाद्या सार्वज
निक व तात्कालीक उपयोगाचा एखादा विषय
हातीं घेऊन त्या संबंधानें व्यावहारीक सु-
चना अर्जद्वारें करण्यापासून अधिक फायदा
आहे. हा प्रश्न नुसता दूध तूप खाण्याचा
नाहीं. गुरांची संख्या दिवसें दिवस ऱ्हास
पावत चालली आहे. दुभत्या जनावरांच्या
कमतरतमुळें लहान मुलांच्या मृत्यूंची संख्या
ही वाढत्या प्रमाणावर आहे हें आपण
पाहत आहों. अर्थात ही राष्ट्रीय हिताहिताची
[illegible] गोष्ट आहे. पंचवीसतीस
[illegible]
वर्षांपूर्वी गायरानांचा विस्तार केवढा असे
व आतां तो किती संकुचित आहे हें
पाहिलें म्हणजे पूर्वीची प्रजा सुदृढ कां
असे व हल्लींची ती तशी कां नाहीं
याचीही एक उपपत्ति लागते. सारांश, या
गायरानाच्या प्रश्नांशीं पुष्कळ गोष्टी संबद्ध
आहेत. त्या सर्वांचा विचार करून मि०
जसावाला यांच्या अर्जास सर्व प्रांतांतल्या
लोकांनीं आपल्या नैतिकसामर्थ्यानें पुष्टीकरण
देणें अवश्य आहे. हा प्रश्न एका व्यक्तीचा'
एका समाजाचा, एका प्रांताचा, किंवा एका
पक्षाचा नाहीं. तो सार्वदेशिक असून अत्यंत
निकडीचा आहे. तेव्हां मि० जसावाला
यांच्या अर्जांत केलेली विनंति स्टेटसेक्रेटरी
साहेबांकडून तरी मान्य व्हावी म्हणून अशा
तऱ्हेचे अर्ज प्रत्येक प्रांतांतल्या पुढारी
मंडळी कडून पाठविण्यांत येतील व जरूर
पडल्यास इंग्लंडांतल्या ब्रिटिश कांग्रेसकमिटी
कडून स्टेटसेक्रेटरी साहेबांकडे एक डेप्यूटेशनही
जाईल अशी अपेक्षा करणें गैरवाजवी
होणार नाहीं.

वऱ्हाडवृत्त.

हवामानः— गेल्या शनिवारीं वर्षाका-
लाच्या पहिल्या मृग नक्षत्राला प्रारंभ
दिवसा दोन प्रहरीं झाला. या सुमाराचें
वातावरण पर्जन्याला अनुकूल आहे. आणि
गेल्या सप्तकांतील हवामानाच्या बातम्या
अशा आहेत कीं सर्व हिंदुस्थानवर वादळें
तुफानें, गारांची वृष्टी, मोठ्या जोराचे
पाऊस इत्यादि नाना प्रकार कमीजास्त
[illegible] दाणादाण करून सोडीत
आहेत. कोठें इंच, अर्धा इंच अशाच
प्रमाणावर पाऊस होत आहे पण पर्जन्याला
आंतून मोठा जोर दिसतो. याला कांहीं
जण छोटी बरसात ह्मणतात व कांहींजण
ह्मणतात कीं हा खरोखरीचा पावसाळा
आहे असें अरबी समुद्रांतील पावसाचे वारे
सूचवीत आहेत. तिकडून येणाऱ्या आगबोटी
पावसाला अनुकूळ असेच आपले अनुभव
सांगतात.

वऱ्हाडांतील उन्हाळ्याचें मान अगदींच
कमी झालें आहे- पारा ७६ अंशा पर्यंत
उतरतो आणि १०३ अंशापेक्षां अधिक
चढत नाहीं. बहुतेक ठिकाणीं थोडथोडा
पाऊस पडला असून हवेंत थंडोसा येत
असल्याचा चांगला अनुभव येतो. मेघ अगदीं
खालच्या वातावरणांत उतरून आपला
जलसंचय पृथ्वीवर रिता करण्याच्या रगांत
स्वच्छंदानें रममाण होत असतात, वीजा
इतक्या चमकत असतात कीं रात्रींच्या
नक्षत्रशून्य कृष्ण आकाशांत देखील एक
सारखा चौफेर क्षितीजांच्या बाजूनें प्रकाश
खेळता असलेला दृष्टीस पडतो आणि
वारा थंडगार जोराचा सुटतो आणि
आसमंतांतील भूमीचा सुगंध चोहोंकडे प्रसर-
ण्याचा उद्योग करीत असतो. गर्द मेघछाया
पडते, सर्व प्रदेश निवांत असतो,
आणि उकाड्यानें कांहीं काल गुदमरल्या
सारखें होतें तेव्हां तेव्हां प्रत्यक्ष पर्जन्य
होई पर्यंत शांतताच वाटत नाहीं. यंदाचें
वातावरणाचें चक्र गेल्या १०-१२ वर्षा
सारखें दिसत नाहीं. चालू चक्र निरा
ळ्याच स्वरूपाचें आहे आणि [illegible]
वर्षाकाल उत्तम होऊन सर्वत्र आबादानी
व धनधान्य समृद्धि होईल असें भविष्य
ज्योतिर्विद सांगू लागले आहेत. आणि याचा
संबंध ते सूर्यबिंबा वरील डाग अगदीं
अत्यंत कमी झाले आहेत या गोष्टीशी जुळवूं
पहात आहेत.

येथील सिव्हील सर्जन क्याप्टन रेनी
हे येत्या २९ जून पासून २१ महिन्यांच्या
मोठ्या रजेवर जात आहेत.

रा. रा. जवाहिरलाल प्रधान अबकारी
एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस जब पुरा-
हून यवतमाळास बदलण्यांत आलें.

रा. रा. मी० अनवर अली एक्स्ट्रा
असि. कमिशनर, उमरावती हे आपल्या
पुत्राच्या मरणामुळें रजेवर अगोदर गेल्या
कारणानें त्यांची तीन महिन्यांची रजा
मंजूर झाली आहे.

रा. रा. इ. सी. गिबसन असि. कमिशनर
यांनी वाशिम सबडिव्हीजनचा चार्ज घेतला.

आणि रा. रा. डब्ल्यू जी स्लेनी एक्स्ट्रा
असि. कमि. हे आकोल्यास लवकरच
येतील.

रा. रा. नारायण रामराव गुप्ते, तह-
शीलदार यास खामगांवास नेमण्यांत आलें.

रा. रा. दोराबशहा एदलजी संजाना
यांस खामगांवाहून वणी येथें बदलून
वणीचे तहशीलदार रा. रा. रामकृष्ण अमृत
देशपांडे यांस ३ महिन्यांची हक्काची रजा
देण्यांत आली.

रा. रा. पुंडरीक ज्ञानेश्वर जोशी मुनसफ
यांस वर्धेहून यवतमाळ येथें बदललें.

संप-संपाची धामधूम संपत आली असून
जी. आय. पी. वरील सर्व व्यवहार
[illegible] मा अडाणी
पूर्ववत् सूरळीत चालूं लागले आहेत.

मेजर प्लौडन साहेब डिपुटी कमिशनर
यांस त्यांच्याच कुत्र्यानें दंश केला व तो
पुढें पिसाळला ह्मणून संशयनिवृत्तिसाठीं ते
औषधोपचाराकरितां कासोली येथें गेले
आहेत ते लवकरच परत येणार आहेत.

वाढ दिवस—ता. २० जून हा व्हाइसराय
लार्ड हार्डिन्ज यांचा वाढदिवस आहे ह्मणून
त्यांच्या जीवावरील अरिष्ट टळल्या संबंधानें
सर्व राष्ट्र हा दिवस सोन्यासारखा आनंदो-
त्सवांनीं संस्मरणीय करीत आहेत इंडियाच्या
इतिहासांत हा दिवस नमूद राहील आणि
लार्ड हार्डिन्ज यांचे सर्वत्र धन्यवाद
निघत राहतील.

गेल्या वाढदिवसाच्या पदवीदानामध्यें आमच्या
वऱ्हाडच्या वाटणीस दोन पदव्या आल्या
आहेत ही आनंदाची गोष्ट होय. रायल
कमिशन मधील आमल्या प्रांताचे कमिशनर
राजश्री स्लॉय यांच्या निंदाव्यंजक अभिप्राया
प्रमाणें खालील गृहस्थ सरकारनें फुगविलेले
शिरोमणी नसून राजमान्य तसेच लोकमान्य
आहेतः--

खान बहादूर सोराबजी शापूरजी, ए-
क्स्ट्रा असि० कमिशनर, आकोला
आणि रावसाहेब बळवंतराव रामचंद्र लांडगे
यवतमाळ या उभयतांचें आह्मी मोठ्या
मनोभावानें अभिनंदन करितों.

आकोला बाजारभाव

हुंडी दर्शनी		९९।।।≡
सोनें		२४८=॥
चांदी		७५
जवारी नवी	८२ ते	९०
गहुं काठे	१००	११०
गहुं बनशी	११५	१२०
चणे	४॥	४॥-
तेल		८।।।
सरकी		८।=
तुप	१७॥	१८
कापुस	६४	६५
रुई आकोला जीन		९०

नोटीस

नोटीस बेशमी मल्हारराव खुशालराव देशमुख कजबे जळगांव ता। मजकूर जिल्हा बुलडाणा यांस।—

नोटीस देणार गदाधर गणेश राहणार जळगांव ता। मजकूर जिल्हा बुलडाणा यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं मी तुह्मास ता० १६ मे १९१२ इसवी रोजीं नोटीस लिहून ती ता० १७।५।१३ इसवी रोजीं जळगांव पेष्टांतून रजिस्टर करून पाठविली होती ती तुह्मी न स्वीकारतां परत केली सबब या नोटीशीं द्वारें तुह्मांस कळविण्यांत येत आहे कीं, आह्मी सन १९०१ सालांत विकत घेतलेली मिळकत खालीं वर्णन केलेली भाड्याचें ठरावानें तुह्मी घेऊन भाडेपट्टा लिहून दिला तो कजबे जळगांव पैकीं खेलखासा बु। ता। जळगांव जि. बुलडाणे येथील घर चुनेगचीं हवेली तीनमजली दिवाणखान्यासह अबाराचे दरवाज्याचे बाजुनें देवडी आहे तीनसुद्धां, या पैकीं चौकाचे खांब दुमजली माडीसह खांब ३२ व ओसरी तीनमजली कवेलूसह एकंदर खांब १८ व स्वयंपाक घराचे खांब ९ व चौकापुढील मध्यभाग चें घर तीनमजली कवेलूसह खांब ३६ दिवाणखान्याचे खांब १८ शिवाय देवडी खांब ४ व दरवाज्याचे खांब ६ एकंदर खांब १११ आबाराची लांबी पूर्व पश्चिम हात ७० दक्षिण उत्तर हात ७८ अजमासे चहुदिवालीचे आंतील सुद्धां एकच आबार असून याची चतुःसीमा पुर्वेस सडक पश्चिमेस निंबाजी व रूपराव यांचीं घरें दक्षिणेस गल्लीचा रस्ता उत्तरेस हिदायतखां व सरदारखां यांचीं घरें. या चतुःसीमेंतील जागा इमल्यासह याचा दर्शनी भाग पूर्वेस व मागील बाजूस पश्चिमेस वापर असलेला दरवाजा आहे आबारांत आड तीन व निंबाचें झाड एक आहे त्यासह सदर्हू घर आमचे मालकीचें खरेदीखतावरून असलेलें तुह्मी आमचेपासून दरसाल रुपये २६ अक्षरी छत्तीस रुपये भाड्याचे ठरावानें भाड्यानें घेऊन ता० ९ आगष्ट सन १९०१ ईसवी रोजीं वरील घराचा ताबा आह्मापासून घेऊन पटेखत रजिष्टर करून दिलें व त्या ठरावा प्रमाणें ता० ९।८।१९०१ ते ता० ९।८।१९०२ पावेतोंचें एक वर्षाचें भाडें ही तुह्मी आह्मांस नगदी दिलें आहे आतां ते दिवसापासून तुह्मी भाडे आह्मांस दिलें नाहीं तें तुमचेकडेस येणें आहे या नोटीसीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं भाडेपट्ट्यांत लिहून दिलेले शर्तीं प्रमाणें तुह्मी जागा आमची खाली करून तारीख १०।८।१९१३ ईसवीचें आंत निदान त्या तारखेस तरी आमचें ताब्यांत देऊन जागा ताब्यांत अलीं घेतले बद्दल आमची पावती घ्यावी व शिवाय कायदा प्रमाणें जितके वर्षाचें भाडें आह्मास मिळणें योग्य आहे त्या सालचे भाड्याचे पैशाबद्दल ही आमची पावती घ्यावी व आह्मास रक्कम पोहचती करावी वरील मुदतींत तुमचे कडुन वरलिहीलेप्रमाणे व्यवस्था न झाल्यास आह्मास तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करावा लागेल. व तुह्मापासून सर्व खर्च वसूल करावा लागेल. व पैसेही वसूल करणे भाग होईल करीतां ही नोटीस तुह्मास दिली आहे या शिवाय आणखी आमचे मालकीची मिळकत तुमचे ताब्यांत आहे ती येणें प्रमाणें :—

मौजे वायाळ प्रगणे व तालुके जळगांव जिल्हा बुलडाणा येथील शेत सर्वे नंबर ५३ पैकीं एकर गुंठे ७८२७ आकार रु १३ सालीम शेत विहिरी सुद्धां.

मौजे रसूलपूर प्रगणें व तालूके जळगांव जिल्हा बुलडाणा येथील शेत सर्वे नंबर ८ एकर ४ गुंठे १० आकार रुपये ५ चे सालीम शेत ही मिळकत फसली सन १३१४ सालीं आमचे पासून हिंमतराव बाबूराव यांनी भाड्यानी केली व पट्टेखत लिहून दिलें तीं मिळकत सन १९०५ सालीं पुन्हा परत आह्मास हिंमतरावनें द्यावयास पाहिजे असून हिंमतराव यांचे संमतीनें ही मिळकत तुह्मी आपलें ताब्यात गैर हक्कमानें घेतली आहे व ते दिवसा पासून तुह्मी त्या मिळकतीवर गैर हक्कानें कबजा करीत आहांत तरी ही नोटीस पावल्या पासून सदरहु मिळकत व तीन सालची नुकसानीची रक्कम दरसाल रुपये १९० दिडशें प्रमाणें सन १३२० १३२१।२२ फसली बद्दल रुपये ४९० साडेचारशे आह्यास नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत द्यावे व आमचे सहीची पावती घ्यावी तसें न केल्यास या संबंधीं ही तुमचेवर योग्य कोर्टात दावा करावा लागेल. व सर्व खर्चाबद्दल तुह्मास जबाबदार धरले जाईल. वगैरे ही नोटीस तुह्मास दिली आहे. ता० २८-५-१९१३ ई०

सही

नो० नं० २५ गदाधर गणेश दस्तूर खुद

नोटीस

नोटीस बेशमी महमद इसब व महमद हुसेन मुा रा० हात तालुके बाळापूर यांस—

खालीं सही करणार खैरातीखा बा। महेतापखा मुा रा० हात तालुके बाळापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची ता० १९।५।१३ ची वऱ्हाडसमाचारातील नोटीस दिली ती पावली त्यांत जो तुह्मी मजकूर लिहिला आहे तो सर्व खोटा लिहिला मजला. त्याजबद्दल कांहींच माहित नाहीं. निवळ मी गरीब मनुष्य पोरवय असल्यावरून मला बुडविण्याकारितां तुह्मी हे खोटे काम उभारले आहे तरी याप्रमाणें पुन्हा खोट्या नोटीसा देऊं नये दिल्यास त्याजबद्दल योग्य कोर्ट मार्फत तुमचा बंदोबस्त केला जाईल कळावें ह्या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल ता. ४।६।१९१३ सही

खैरातीखा बा। महेतापखा मुा

नो० नं०२६ नि० खुद

जाहीर नोटीस

कवती मर्द विठोबा रा० गोंदापूर इजकडून:—

नोटीस देण्यांत येतें कीं, मी एप्रील१९१३ मध्यें शामराव बा। नारायण कुणबी रा० गोंदापूर यास एक मृत्युपत्र करुन नोंदून दिले आहे. परंतु ते मृत्युपत्र माझे इच्छेविरुद्ध झालेलें असल्यामुळें ह्या नोटीसीनें तें मी रद्द करित आहे. वास्तविक मला मृत्युपत्र करण्याचा अधिकार नाहीं परंतु ते मी अडाणीपणामुळें केलेले आहे तरी ते रद्द समजावे. कळावे आज तारीख ६-६-१३ इसवी दस्तुर वामन अमृत जोशी रा० आकोला सही

कवती मर्द विठोबा

नो नं. २७ निशानी बांगडी

कापूस- तक्ता- साप्ताहिक- ३१ मे १९१३ पर्यंत

जिल्हा.	वर्ष	काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता.३१।५।१३ पर्यंतचा आठवडा	कापसाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून	रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. ३१।५।१३ पर्यंतचा आठवडा	रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून	गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी. — ता० ३१।५।१३ पर्यंतचा आठवडा	बांधलेली गठ्ठी. — ता. १।१०।१२ पासून आज तागाईत
उमरावती	चालू साल	२,२७९	१६६२६६	८१४	२२,६७४	३,४५७	१७३,२४१
	गुदस्त	२१८	२४३३१०	३२३	२७५०६	....	.
	तिगस्त	१,१६४	२१०३४७	३१९	१२९५४	....	
यवतमाळ	चालू साल	९	१३२२१६	२१७	२०,६७९	३२४	८९,८३३
	गुदस्त	....	१४१४९६	३५	११,९२२	....	....
	तिगस्त	६	४०,३३३	२२	१३५०४	....	....
अकोला	चालू साल	९२३	१९६६२६	१,२९८	४८३२०	२,५२२	१८१७७४
	गुदस्त	८७	१८१८३६	५९०	५१३९३	....	....
	तिगस्त	४३८	१०१३१४	७२९	२४८८१	....	....
बुलढाणा	चालू साल	३५५	९६,५००	१२८	११,१०९	१,२३५	१२९६९०
	गुदस्त	१४	१२०८७२	४५	९१७६	....	....
	तिगस्त	४८१	११८७११	१९१	६,८४६	....	....
एकूण वऱ्हाड	चालू साल	३,५६६	५५२६०८	२,४५७	१०२७८२	७,५३८	५७०,५३८
	गुदस्त	३१९	६८९५१४	९९३	९९९९६	....	....
	तिगस्त	२,०८९	३७०७०५	१,२५७	५८,१८५	....	....

टीप —चालू सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १ जून १९१२ व ३ जून १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
२१ ४२

सी. यू. बीन्स.
डायरेक्टर आफ आग्रिकलचर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

अमूल्य संधी ! अप्रतीम नासिक चूर्ण !! अमुल्य रत्न.

टि. सि.

सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकाच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. आल्किडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि एतद्देशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.

मस्तकशूल, ज्ञानतंतूंची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानसिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक. गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशा प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे लोक प्रिय सुगंधी तपकीर केवल एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभरित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
' डझन डबीस २–६–० " " " ०–६–०

(सुचना) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत लिहुन कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील ' किंवा तसें न केल्यास **अडिचरुपयांस** पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० ११ पार्क टाऊन पोष्ट' **मद्रास**

जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत. शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत. हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी म्हणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास

नो. नं. १२

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा

डॉ० वामन गोपाळ यांचा

आयोडाईज्ड सार्सापारिला.

हा सार्सापारिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत " सर्वोत्तम " अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाळ खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १३

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANy
Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the ' Oriental ' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the ' Oriental ' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceasr of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental ' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 14

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

नोटीस

नोटीस बेशमी सकु मर्द कचरु व महादु वल्लद कचरु करांगळे राहाणार पिंपळगांव राजा तालुका मलकापुर

यांसः--

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते की माझा नवरा आज ७ ८ वर्षें झालीं मरण पावला त्या दिवसापासोन तुह्मी शेत सर्वे नंबर १८१ व १८५ हे वाहात आहात. ही जमीन माझे नवऱ्याचे मालकीचे असून माझे नवऱ्यानींच संपादन केलेली आहे. वसदरहु जमीनीबद्दल चालूं सालचे रिकार्डस्ऑफराईटचे रजीस्टरांत माझा मुलगा संपत व अज्ञान पालन करणार अई अशी नोंद झालेली आहे. व ती तुमचे हातानींच झालेली आहे. महादु माझे नवऱ्याचा भाऊ असून तुह्मास १०-१२ वर्षा पासून कचरु यांस दत्तक दिलेलें आहे. व तुह्मी ते दिवशी पासून तेथेंच राहात आहा व तुह्मी महादु कचरु असें नावाहि लिहित आहा. तरी आतां सदरहूनंबरावर तुमचा मुळीच हक्क नसून व आतां तुमचा माझाही मुळीच संबंध राहिला नाहीं. तुह्मी मजला माझा नवरा मेल्यापासून खाण्यापिण्यास देत नाहीं. सदरहु जमीन मी आतां वामन गणेश कुळकर्णी यांस ५ वर्षें भाडेपट्यानीं दिली आहे. तरी तुह्मी आतां लोकांपाशी असें ह्मणत आहां कीं सदरहु जमीन मजजवळ ताबेगहाण आहे. परंतु रिकार्डसऑफराइटचे नोंदीचे वेळेस तुह्मी ते दाखविलें नाहीं. या वरून असें वाटतें कीं माझे नवऱ्यानीं तुमचे रुपये दिलेले आहेत आतां तुमचे मनांत बेमानकी दिसत आहे. तरी तुह्मी नोटीस पावल्यापासून चार दिवसाचे आंत तुमचे जवळ ताबे गहाण आहे तें मला दाखवावे नाहीं तर पुढें तें रद्द असे व तुह्मी माझा नवरा मेल्यापासून माझ्य जमीनीचे उत्पन्न घेत आहात तरी तुह्मास त्या बद्दल जे पंच सांगतील त्या प्रमाणें आजपर्यंत रक्कम चार दिवसाचे आंत भरून द्यावी अगर न दिल्यास तुमचेवर कोर्टांत फिर्याद करून कोर्टखर्चा सुद्धां रक्कम भरून घेतली जाईल आतां पुढें तुह्मी ताब्यास भाडेपट करणारांस कोणतेंही तऱ्हेचा अटकाव केल्यास तुमचेवर कायदेशीर फौजदारी केली जाईल कळावे तारिख २८-५ १३ई०

सही

संपत वलद सुपडाजी सातव अज्ञान पालन करणार अई चीनका बाई मर्द सुपडाजी सातव रा० पिंपळगांवराजा नी० खु० हातची बांगडी

नो० नं० १५

नोटीस

नोटीस बेशमी गोविंद कडताजी पाटील रा० मु आलेगांव ता० बाळापुर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माकडे मौजे पिंपरडोळी येथील शेत सर्वे नंबर २८ याज बद्दल सर्व तऱ्हेची व्यवस्था करणें तुह्मी आप्त ह्मणून मी तुह्माकडे सोपविली होती तरी त्या प्रमाणें माझें काम तुमचे कडून योग्य प्रकारें कोणतेच न झाल्यानें. व माझे नुकसानीकडे तुमचे लक्ष असल्यानें आज तारखे पुढें माझ्या वरील इस्टेटीमध्ये तुह्मी बिलकूल हात घालूंनये. व तिची कोणतीच व्यवस्था करूनये. या पुढें सर्व तऱ्हेची व्यवस्था करण्यास रोडजी व० शिवराम यांस नेमिले आहे. तुह्मावर कोणतेच प्रकारचा आमचा विश्वास नाहीं. आमचे कोणतेच कार्यांत या पुढें हात घातल्यास तुह्मास जबाबदार धरले जाईल. कळावे तारिख ३-६-१९१३ ई

सही

दत्तु नरसाजी कुणबी अज्ञान पालन करणार आई तानाई मर्द नरसाजी राहाणार आलेगांव निशाणी आंगठा

नो० नं० १६

नाटीस

गोपाळ गणुबा गुरव रा० मोरगांव भाकऱ्याचें ता० आकोला यांस —

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्याशीं सुमारे तीन वर्षें झाली मी मोहतीर लावला आहे. तुह्मी एक वर्ष मला फक्त वागविलें पुढें राजी कुंभारीण हिजला काढून तिच्याशीं तुह्मी संसार करू लागलात मी दोन वर्षें झाली माझे बापाचे घरीं आहे. तुह्मास माझे बापाकडून व इतर लोकाकडून बरेंचवेळा सदरहु "राजी कुंभारीण" हिजला सोडून देण्या बद्दल कळविलें व माझे बापानें तुह्मास शेगांव येथें बोलाविलें व चार लोका समक्ष तुह्मास सांगितलें परंतु तुह्मी त्या वेळीं जबाब दिला कीं आठदहा दिवसांत तुमचे मुलीस ह्मणजे (मला) फारकत देतो असें सांगितलें त्या प्रमाणें अद्याप केलें नाहीं तरी या नोटीसीनें कळविते की माझे दोन वर्षाचे खाण्या पिण्याचा व वस्त्राचा दरसाल ६० रुपये साठ प्रमाणें १२० एकशे वीस रुपये व राजी कुंभारीण हिजला सोडून देण्या बद्दल व मजला मारहाण कोणत्याही प्रकारचें दुःख न देण्या बद्दल चारलोका समक्ष पंचास एक करारनामा लिहून देऊन मला घेऊन जावे असें आपण न केल्यास तुमचा मजवर नवरेपणाचा कोणतेही प्रकारचा हक्क मुळीच राहणार नाहीं व मी हीच फारकत समजून दुसरा घरठाव करीन तरी ह्याचा जबाब ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत द्यावा न दिल्यास माझे मर्जीप्रमाणें मी दुसरा नवरा करीन करितां मुद्दाम कळविलें आहे. कळावे तारीख २९-५-१९१३ इसवी

सही

१ झुमकी मर्द गोपाळ गुरवीण वा॥ शेगांव निशानी आंगठा व बांगडी दस्तुर वासुदेव वामन पी० रा० आकोला

नो० नं० १७

नोटीस

नोटीस बेशमी महादाजी वा॥ मलहारजी वारीक रा० मौजे सवन ता० इंगोली मोगलाई पोष्ट वाशीम यांसः—

नोटीस देणार बजाई मर्द माहादाजी वारीक रा० मौजे ऊकळी जहागीर ता० वाशीम. इजकडूनः—

नोटीस देण्यांत येते की तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न झाल्यास सुमारें २५ वर्षें झालीं तेव्हां पासून तुह्मी मजला आपले घरीं नेऊन नांदवीत नाहीं व अन्नवस्त्र ही देत नाहीं ह्मणून मी आपले आइबापाचे घरीं राहून निर्वाह करिते व माझे अन्नवस्त्राबद्दल लोकांचे मजवर ५०० पांचशें रुपये कर्ज झाले आहे व तुह्मी दुसऱ्या बायकोबरोबर संसार करिता सबब या नोटिसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत मजवर झालेले अन्नवस्त्राचा ५०० रुपये तुह्मी देऊन मजला घेवून जाणें कारण पुष्कळ वेळां पंचलोकांनीं मजला घेऊन जाण्याबद्दल सांगितलें परंतु तुह्मी मजला नेत नाहीं सबब वरील मुदतींत ५०० रुपये देऊन मजला घेऊन जाणें नाहींतर हीच फारकती समजून मी दुसरा घरोबा करीन. मग तुमची कोणतेच प्रकारें तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावे ता० १६-४ १३

सही

बजाई मर्द महादाजी हिची निशानी असे

नो० नं० १८

नोटीस

नोटीस बेशमी गमी मर्द किसन सावळे महार रा० आडगांव ता. आकोट ईस—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी चुलती असून तुझा नवरा ह्मणजे माझा चुलता सरासरीं ८ महिन्यापूर्वीं वारला. आतां गांवगाड्याचें उत्पन्नांत तुझा ८५८४ पैचा हिस्सा असून माझा ८१०८८ पैचा आहे. तुझा इरादा सांप्रत बाहेरचा कोणाचा मुलगा दत्तक घेण्याचा असून ही उत्पन्नाची बाब बाहेर घालविण्याचा आहे. आमच्यापैकीं कोणी दत्तक घेण्याचा नाहीं. तरी या नोटिशीनें कळवितों कीं शक्य तितके आह्मास सोडून दुसऱ्यास दत्तक घेणें तुला योग्य नाहीं. व कायद्यानेंही तें योग्य नाहीं. तरी तुझ्या अशा करण्यानें आमच्या हक्कास बाध येणार नाहीं. त्वां अन्नवस्त्र घेऊन सुखानें आमच्या कडेस रहावे. तुझ्या दोन्ही मुलींची लग्नें करावयास मी तयार आहे. असें न करितां त्वां स्वमतानें आमच्या मता विरुद्ध वर्तन केल्यास रितीप्रमाणें हक्काकरितां योग्य कोर्टांत दावा आणावा लागेल. ता० ३-६-१३

सही

श्रावण हरजी माहार सावळे रा० अडगांव ता० आकोट जिल्हा आकोला द० खु०

जयराम सोनाजी माहार सावळे रा० अडगांव ता० आकोट जिल्हा आकोला नि० खु०

नो० नं० १९

नोटीस

नोटीस. गणू घोरसाड व कुऱ्हाड ता. मुर्तिजापूर पो. ... खालीं सही करणारा क... देण्यांत येते कीं; तुमची ... मुलाला दिली व त्या बद्दल ... झाला त्यांत मी मुलीस सु... रुपयाचे डागीने वाहीले अ... विचार सोयरीक फिरविण्याच... तरी हें करणें तुह्मास उचीत... या प्रकारें माझें सुमारें झा... प्रित्यर्थ ५० रूपयांचे नुकसान... आहे. आतां मी तुमची ... मुलास करावयास कबूल आहे. प... आपला इनकार दिसतो त्या अ... नोटीस दिली जाते कीं. जन... धरून लग्न लाऊन टाकावें. ही नोटीस पावल्या पासून ... आंत मला झालेला खर्च व ... व या नोटीसीचा खर्च मला ... माझी पावती घ्यावी. नाहीं ... कोर्टांत फिर्याद करून सर्व ... केले जातील ता० २९ मे...

सहीची निशानी आंग...

शिवराम व. बीरमल ...

रा. इरगव्हाण ता...

नो० नं० २०

नोटीस

नोटीस बेशमी — विठोबा ... सेळकीर राहणार वडगांव त... पो. मोताळा यांसः—

नोटीस देणार रामचंद्र ता... रा. शेंबे खुर्द ता. मलकापूर याजकडून नोटिशीनें कळविण्या... माझी आतेबहीण नामे पुती ... शेळकी ही आपली लग्नाची ब... तिला आपण सरासरी नऊ ... टाकून दिलें आहे. व आप... गंधर्वाची बायको केली आहे, ... माझे घरीं आहे. मी माझे बहि... एक दोन वेळ आपले घरीं ... तर आपण तिला मोठ्या जूल... मारठोक करून घरांतून हांकू... करितां मी गरीब मनुष्य अ... नऊ वर्षें झालीं तिला अन्नवस्त्र करीत आहे. त्याजबद्दल कमीतक ४५० रूपये खर्च येतो आत... तिजला पोसवत नाहीं. व तिच... व्यर्थ चालला आहे. तरी ही नोटी... आठ दिवसांचे आंत म... ...ज करण्यास रूपये ४५० ...र तूं किंवा मारुती द्यावी अ... व्यवहार केला तर ... असून कायद्याच्या दृष्टीनें खुलासा ... ...नें बातल फारकत समजून तिज... ...नवरा करून देईन मग आपल... प्रकारचा हक्क राहणार नाहीं. बद्दल दावा करून कोर्टाचा ... खर्च सुद्धां भरून घेईन कळावे ता... १३ ई.

रामचंद्र तानकू पाटील शेंबे ...

नो- नं २१

Regd. NO N. 150

वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७] आकोला-- सोमवार तारीख १६ माहे जून सन १९१३ इ० [अंक २३

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।९।०९ — G. A. Phillips. एजंट

नं १

मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या **आकोले आणि उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६½ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक, आकोला २१-९-१० — G. A. Phillips. एजंट

नो० नं० २

जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें (मंदिराचें) काम बांधण्याचे सुरू आहे यास लागणारा खर्च फार अपून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें काम संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल कर्ते नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात म्हणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी.

व्यवस्थापक
रामचंद्र कृष्णाजी पाटील
नो० नं० ३

वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां **डोळे तपासून** सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ४ आकोला

अपूर्व लाभ! अपूर्व संधी!! अपूर्व संधी !!!

उत्तम कलप.

—:-*-:-*-:—

जर तुह्माला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहींत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखे मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे. एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त म्हणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे.

ट. ह. निराळा

आमचा पत्ता
हजरत मौलाना आशके यामदानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई

नो० नं० ५

अजब करामत.

बालक्षुधा निवारण- लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हौसेनें घेतात. किं० १ तो० ४२ आणे.

हेमसुधा- धुपणी हा रोग पुष्कळ स्त्रियाना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

कामधेनुगुटिका- अलीकडील निराने राळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ४६ आणे.

जानकीबाई रानडे
नर्स अॅण्ड मिड्वाईफ. — सांगली,

नो० नं० ६

रामबाण उपाय

रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी म्हणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंशय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा म्हणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८॥ ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल खर्चीपुरतीच आहे

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. म्हणजे त्या पासून त्वचे संबंधी रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ८ ख. सह ॥=पर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डीत कृपाराम
८ नंदीबागानलेन पो. सालकिया जि. हावरा.

त्याबद्दल करणाला

नोटीस

रा. रा. मारुती विठोबा टिकार राहणार पाटखेडें तालुका आकोला यांसः

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मारोती उदेभान' या नांवा खालीं वऱ्हाड समाचार पत्रांतून ता० १५ मे १९१३ च्या तारखेची नोटीस दिली ओहस. तिच्यांतील सर्व मजकूर खोटा आहे. तूं उदेभानचा लेक नाहींस माझी सवत उमाबाई इला फसवून दत्तक मुलगा असल्या विषयीची गोष्ट पुढें आणू पहात आहेस. पण या रितीनें तूं उदेभानचा मुलगा किंवा वारस होऊं शकत नाहींस. मी सवत उमाबाईला कळवून बापुना उर्फ शिवराम याला हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेतला आहे; आणि तोच मयत उदेभान याचा कायदेशीर व योग्य वारस आहे. हा दत्तक मुलगा अज्ञान असल्या कारणानें मी त्याच्या शरिराची व जिन्नगीची पालनकर्ती आहे. एक दत्तविधान झाल्यानंतर तुह्मी उमाबाईला पुढें करून स्वतःच्या दुसऱ्या दत्तकपणाचा मजकूर कसातरी उभा केला आहे; पण ही तुमची उठावणी व्यर्थ असून बेकायदा व अन्यायाची आहे. तुमची नोटीस व जाहिरात मी या लेखानें रद्द करिते आणि मी दत्तक मुलगा घेतल्यापासून सर्व जिन्नगीची वहिवाट शिवराम वल्लद उदेभान घेत्रे अज्ञान पालन करणार आई लुंगी या संज्ञेनें करीत आहे. तुह्मी या उपर जिन्नगीवर हक्क दाखवाल तो रद्द व बातल आहे; तुह्मी अन्यायानें व दांडगाईनें जिन्नगीच्या व्यवस्थेला जोखम लावाल तर तुह्मावर फौजदारी करण्यांत येईल.

तसेंच उमाबाई मर्द उदेभान घोतरे हलाही या लेखानें जाहीर करिते कीं तूं मारुतीला दत्तक घेण्याची खटपट केली असल्यास ती रद्द आहे. तूं फक्त अनुभवाची घनीन आहेस आणि त्याप्रमाणें तुझ्या पोटापाण्याची योग्य तजवीज करण्यास मी खंबीर आहे. याउपर तूं किंवा मारुती यानें जिन्नगी संबंधानें व्यवहार केला तर तो मला अमान्य असून कायद्याच्या दृष्टीनें व अज्ञानाच्या कल्याणाच्या दृष्टीनें बातल व पोकळ समजला जाईल; व जिन्नगी त्या संबंधानें कोणत्याही प्रकारें जबाबदार राहणार नाहीं. कळावें. ता० ८-६-१९ ३ ई.

सही
लुंगी मर्द उदेभान घोत्रे राहणार
मौजे पाटखेड पोष्ट राजंद
तालुका आकोला निशानी
खुद हातची बांगडी असे.

नो० नं० ८

नोटीस

ाणकाई मर्द गोविंदा तुपकरी ठाकरे
ार उगव तालुका आकोला

इसः—

कीं सही करणार इजकडून कळविण्यांत
की तूं धाकटी सवत असून दुसऱ्या
ड लोकांच्या सल्ल्यानें सध्यां तूं जिन्न
ा अफरातफर मांडली आहेस. कधीं
काराचें कर्ज फेडण्याचें मिष दाखवून
नथूच्या गंधर्वाचें कारण पुढें करून
लोभाच्या गोष्टी सांगून येणें प्रकारें
सरासरी सहाशे साडे सहाशे रुपये
तीचा माल लांबविला आहेस आणि
त विचारावें तर उडवाउडवीचीं उत्तरें
ा किंवा अपमानाच्या व कमी पणाच्या
ो करितेस. तुझ्या अंगावरील ४ तोळे
याच्या वस्तु व १५० रुपये भार चांदी
ा त्या देखील आतां कोठें दिसत
ांत नथूच्या गंधर्वाचा बहाणा करून
या, पुतळ्या, नथ व मुदी मिळून
० रुपये किंमतीचे दागिने तूं लांबवि-
. तशीच म्हैस व दमणी दोन्ही किंमत
े १०० ही तूं नथूच्या हवाली
ोस. अशी वेबंदशाही मांडली आहेस
णि तुझा हेतु मला बुडवून दुसरा घर-
ा करण्याचा दिसतो. या नोटिशीनें
ळविते कीं ही नोटीस पोचल्या तारखे
ून ८ दिवसांच्या आंत वरील सर्व
जवस्तु व इतर जिन्नस तूं गोडीगुलाबीनें
त आण, तसेंच तूं कापूस २ खंडी
ून आलेले १६० रुपये देखील लांबविले
हेस ते परत घेऊन ये. नाहींतर तुला
ांत राहू न देतां चालूं साळीं शेतीच्या
ाला हात लावू देणार नाही व शेतींत
य ठेवूं देणार नाहीं. या नोटिसीचा
र्व तुझ्यावर पडेल. व इतर नुकसानी
या हिश्यांतून भरून घेईन. कळावें
० ७ जून १९१३ इसवी.

सही

रुखमाई मर्द गोविंदा ठाकरे (रा.
हल्लीं चांदूर ता० आकोला
येथें रा० रा० किसन
बापुजी टेकाळे यांचे घरीं)
निशानी बांगडी

नो० नं० ९

नोटीस

नोटीस बेशमी ता ी मर्द रोडी माळी रा.
ांबेटाकळी तालुके बाळापुर जिल्हा आकोला
नकडून रोडी व॥ कृष्णा जाधव माळी राहणार
ांबेटाकळी तालुके व जिल्हा सदर यांस
ळावें कीं,

मी तुमची लग्नाची बायको असून
ुह्मी आज तीन वर्षापासून टाकून दिले
ाहे. तुह्मी आंबेटाकळी गांव सोडून
ोठे गेले पत्ता नाहीं तरी या नोटिशीनें
ाहीर करण्यांत येतें कीं, आठ दिवसाचे आंत
ुह्मी येऊन घेऊन जाणे अगर फारकत
ेणे. असें वरील मुदतींत न केल्यास
ीच फारकत समजून दुसरा गंधर्व कर-
णार आहे. मग तुमचा कांहीं हक्क राह-
णार नाहीं. ह्मणून ही नोटीस दिली सही
कळावें तारीख २ माहे जून सन १९१३ ई.

दस्तुर

जगन्नाथ विठ्ठल ब्राह्मण रा० खामगांव

सही

सहीची निशाणी तानी मर्द रोडी
जाधव माळी इचा निशाणीचा
आंगठा असे.

साक्ष

मलाजी वल्लद महादु द० खु०
१ नारायण व॥ मताजी माळी
रा० पोहूर नि० रेघ

नो० नं० १०

नोटीस

नोटीस बेशमी कडतु वल्लद रामजी
नवलकार धनगर राहाणार वडगांव पोष्ट
तेल्हारा यांसः—

खालीं सही करणार भिमी मर्द कडतु
धनगर राहाणार वडगांव हली मुकाम
रवंदळ इजकडून नोटीस देण्यांत येते कीं
मी तुमची लग्नाची बायको असून लग्न
झाल्यापासून दोन तीन मुलें होईपर्यंत
तुह्मी मला वागविले हल्लीं सरासरी दोन
वर्षें झाली तुह्मी मला माझ्या आई बापाचे
घरी बिन अन्यायानें आणून घातले मी
अबला ह्मणून तुमचे ह्मणण्याप्रमाणें बापाचे
घरीं राहिले पुढें मध्यंतरी मी आपण हो-
ऊन दोन वेळा तुमचे घरी नांदण्यास
आली असतां तुह्मी मला असें ह्मटलें कीं
मी लोकांच्या घरी साळानें राहू. पोट
भरतो तुला कोठून घालूं ? असें ह्मणून
परत पाठविले दुसऱ्यानें आली असतां
चारपंचासमक्ष तुह्मी मला घरांतून हाकून
दिले तेव्हांपासून मी लोकाचे कर्ज काढून
आई बापाचे आश्रयानें पोट भरले आतां
दिवस फार कठीण ह्मणून माझ्यानें पोट
भरवत नाहीं व मला कोणी कर्जही देत
नाहीं सबब नोटीस देणें भाग पडले तरी
आतां तुह्मी मलाजे लोकांचें कर्ज झाले
ते रुपये ७५ देऊन घेऊन जावे मी
नांदण्यास तयार आहे. जर आपणास मला
मुळींच वागविणें नसेल तर ही नोटीस
पावल्यापासून १५ दिवसाचें आंत आपण
माझा कांहीं निकाल तरी करावा मुदतीचे आंत
आपण माझा निकाल न केल्यास दिलेली
नोटीस हीच फारकती समजून मी दुसरा
घरठाव करीन पुढें तुमची कोणत्याही त-
ऱ्हेची तक्रार ऐकली जाणार नाहीं ही
नोटीस दिली सही तारिख ७-६-१९१३ ई.
दस्तुर मारोती व० विठोबा रा० आकोला

सही

१ भिमी मर्द कडतु नवलकार ध-
नगर मुक्काम वडगांव हल्ली
मुक्काम रवंदळ निशाणी हा-
तची बांगडी

नो० नं० ११

क्रमांतून पार
मूढ ठरता

नोटीस

नोटीस बेशमी महादु वल्लद बाबुशा
धनगर राहाणार कानशिवणी पोस्ट कान-
शिवणी तालुका आकोला

यां :—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस
देण्यांत येते कीं विठु वलद ल मण ध-
नगर राहाणार बोरगांव खुर्द यानें तुह्मास
कसबे पातुर नंदापूर येथील शेत स. नं.
२१० एकर ९ गुंठे ३३ आकार रुपये
१७ हें शेत ३०० रुपयास लहान ग-
हाण करून दिले. सदर्हु रुपयांचा भरणा
श्रावण मोऱ्याचे हवाल्याचे रुपये तुह्मी
११८ दिले बाकीचा भरणा तुमचे कडून
मिळाला नाहीं. बाकीच्या भरण्या बद्दल
तुह्मी त्यांस स्टांप करून देण्याचे कबुल
केलें. सदरहु शेत मी उभ्या पिका समेत
विठु याजपासून विकत घेतलें. तुमचे लहा-
गणाचा तंटा मिटावा ह्मणून मी कानशि-
वणी येथें येऊन चार चौघा देखत नारा-
यण गोविंद सोनार याचें घरीं २५०
रुपयास तुमच्या संमतीनें चारचौघांनीं तंटा
मिटाविला. पुढें १–२ दिवसांनीं मी रुपये
घेऊन आलो व तुमचा तपास करितां
तुह्मी परगांवीं गेल्याचे समजले ह्मणून
सदरहु रकम नारायण सोनार यांजपाशीं
अनामत ठेविली व मी आपले घरीं वाप-
स आलो. सदरहु गोष्ट विठु यांस सम-
जल्यावरून त्यानें २५० रुपये रकम
तुह्माला देण्याची मनाई केली व सक्त
ताकिद दिली कीं तुह्मी फक्त त्यांस
११८ रुपये द्यावे जास्त दिल्यास त्याब-
द्दल मी जबाबदार नाहीं. ह्मणून सदरहु
रकम मी नारायण सोनार यांजपासून
तुमचे समक्ष वापस आणली. तरी ही
नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसाचे
आंत येऊन माझ्या पासून ११८ रुपये
घेऊन मला पावती द्यावी व लहान गहाण
वापस द्यावें. असें मुदतींत नकेल्यास तुह्मी
रुपये नेईपर्यंत तुह्मास व्याज नामिळतां
दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें
व्याज तुमचे रुपयांतून कटती केले जा-
तील. या नोटीसीचा जबाब ही नोटीस
प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत द्यावा-
न दिल्यास तुह्मास ही नोटीस कबूल
आहे असें समजून योग्य तजवीज कर-
ण्यांत येईल. कळावें तारिख २-६-१३

सही

सदाशिव निंबाजी पटवारी बोरगांव
खुर्द दस्तूर खुद

नो. नं. १२

नोटीस

रा० गुलशेरखां वल्लद सुलतानखां मुस-
लमान रा. पारपेठ मलकापुर यांसः—

खालीं सही करणार यांज कडून नो-
टीस देण्यांत येते कीं माझे पोटीं पुत्र
संतान नसून कायते तीन ३ मुली आहेत.
माझा वृद्धापकाळ असल्यानें मजला पोषण
करण्याचे तुह्मी कबूल केल्यावरून मी
माझे मधवी मुली बरोबर तुमचें लग्न
लावून देऊन घरजावाई राहण्याचें कबूल
करून घेतले असतां तुह्मी लग्न झालेवर कांहीं
दिवसांनीं माझे येथून निघून आपले बायकोसह
आपले भावाचे येथें गेलेवर कांहीं दिवसांनीं
सणा निमित्त मी माझे मुलीस माझे घरीं तुमचे
सल्यानें आणले असतां त्यांस आज ५-६
वर्षें झालींत तर तुह्मी माझें घरीं राहूं
इछीत नसून तुमचे बायकोसही घेऊन
जात नाहीं. बरेंच वेळा ह्मटलें परंतु निर-
र्थक. शिवाय तुह्मीं माझे स्वतःचें सोन्या
चांदीचे डागीनें व नगदी रुपये मिळून
सोडव्यांशीचे घेऊन गेलें. तेही अद्याप देत
नाहीं. तुमचे बायकोस पोसण्यास आजपर्यंत
मजला २०० रुपये खर्च आला. सध्या
माझी मुलगी वयांत आली असून तिचा
संसार बुडत आहे. वरून तुह्मी नोटीस
पावल्या पासून आठदिवसांचें आंत वरील
रुपये २८२॥ चारपंचा समक्ष मजला
देऊन माझी रसीद घेणें व आपले बाय-
कोसही घेऊन जाणे. तसे तुह्मी न केल्यास
हीच फारकती समजून माझे मुलीस मी
दुसरें ठिकाणीं उठवून देईन मग तुमचा
नवरेपणाचा हक्क माझे मुलीवर राहणार
नाहीं. ह्यास्तव नोटीस देण्यांत आली आहे.
कळावे. तारीख १-६-१३

सही

शेखकरीम वल्लद शेखरमजानी नि०
खुद दस्तूर मोहनसिंह रुपसिंह रघुवंशी
मलकापूर [बरार]

नो नं. १३

जाहिरात

सर्वत्र लोकांस आणि रा० रा० गिर-
धारीलाल यशवंतलाल अगरवाले रा० तेल्हारे

यांसः—

या लेखावरून खाली सही करणार
असें जाहीर करितात कीं ता० २१
फेब्रुवारी १९१२ रोजीं आह्मी सदरहु
गिरधारीलाल यशवंतलाल अगरवाले आणि
जोरावरमल्ल भिवराज मारवाडी उभयतां
राहणार तेल्हारे यांस कुलमुखत्यार नेमून
नेमून त्यांच्या अधिकाराची नोंद कुलमुखत्यार
नाम्यांत लिहून नेंदून ठेवलेली आहे. आतां
आह्मी वरील दोघा पैकीं जोरावरमल्ल यांस
कायम ठेवून फक्त गिरधारीलाल यांस
मुखत्यारी वरून काढून त्यांचा कुलमुख-
त्यारनाम्या अन्वयें दिलेले सर्व अधिकार
काढून घेतले आहेत. या पुढें कोणी ही
सदरहु मुखत्यार नाम्याच्याअन्वयें रा०
गिरधारीलाल यांच्या बरोबर आमच्या
संबंधानें कांहींएक व्यवहार करू नये व
गिरिधारीलाल यांस या लेखानें तसें
करण्याची मनाई केलेली आहे. कळावे
ता० १०।६।१९१३ ई०

सही(मारवाडींत)

रामचंद्र चुनिलाल दस्तुर खुद
नो० नं० १४

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ शुद्ध १३ शके १८३५ प्रमादी

त्रिदोष

हिंदुस्थान देशाच्या सद्यःकालीन राजकीय सामाजिक, धार्मिक, औद्योगिक इ० स्थितीचा विचार करणारांच्या मनःस्थितीवरून जर वर्गीकरण केलें तर माणसांचे दोन वर्ग करतां येतात. एक भविष्यकाल उज्ज्वल आहे असें म्हणणारांचा व दुसरा निराशावादी लोकांचा. पहिल्या वर्गाला पाहिजे तर आपण आशावादी हें नांव देऊं. या दोन वर्गांपैकीं पहिल्याचा विचार आपणांस आज कर्तव्य नाहीं. निराशावादी लोकांच्या म्हणण्याचा पुष्कळ वेळां विपरीत अर्थ होत असतो. म्हणून त्यांच्या मताचें स्पष्टीकरण या अंकीं करीत आहों. हे विचार आमचे आहेत असा मात्र गैरसमज कोणी करून घेऊं नये.

निराशावादी सर्व प्रकारच्या सुधारणांना विरुद्ध आहेत असा एक आक्षेप त्यांचेवर करण्यांत येत असतो. या आक्षेपाला त्यांच्याकडून जें उत्तर देण्यांत येतें तें हें कीं आम्ही सुधारणेला विरुद्ध नाहीं. देश रसातळाला जात चालला आहे. त्याला वर उचलण्याच्या प्रयत्नाला आम्ही विरोध कसा करूं? अमचा प्रश्न येवढाच आहे कीं हे सुधारणेचे प्रयत्न सध्यां करणारे कोण आहेत? पूर्वीच्या काळीं प्रजेच्या उन्नती अवनती बद्दलची सर्व जबाबदारी राजावर असे. पण आमचे राज्यकर्ते विधर्मी असल्यानें ही जबाबदारी त्यांच्यावर येऊं शकत नाहीं. आमच्या लोकांनींच करावें तर त्यांच्यांत कोणता त्राण उरला आहे? आमच्या देशाच्या प्रकृतीला त्रिदोषाची बाधा झालेली उघड दिसत आहे. हा त्रिदोष म्हणजे परकीय लोकाची स्पर्धा, कजेदलालीं व विशिष्ट प्रकारची शिक्षणपद्धति यांचा संकर होय. आमच्या लोकांच्या हातचा व्यापार गेला, धंदे गेले, गुरांना चरण्यास गायरानें नाहींशीं झालीं, मांसभक्षकांच्या तडाख्यांत सांपडून लक्षावधि गुरें मेलीं, देशांतील कारागिरीचा लोप झाला, नोकरी किंवा शेती यांवाचून लोकांना तरणोपाय राहिला नाहीं. नोकरींतलीं हीं लष्कर, आरमार, वगैरे कित्येक खातीं आमच्या लोकांसाठीं अजीबात बंदच! सारांश परकीय व्यापाऱ्यांची स्पर्धा व वर्णभेदाचें साम्राज्य यापुढें आमचे लोक लाचार झाले आहेत. त्रिदोषांपैकीं हा मुख्य पहिला दोष होय. आतां दुसरा दोष कजेदलालीची वाढ. पूर्वी आमच्या तंट्यांचा निकाल लावून घ्यावयाला पैसे पडत नसत किंवा लांब कोर्टे जावेंही लागत नसे. ग्रामपंचायत, पाटील, महाजन, शंकराचार्य हींच आमचीं कोर्टें कचेऱ्या व हायकोर्टें होतीं. त्यांच्यापुढें जाण्यास स्टांपाची गरज नव्हती. वकिलांची फी, समन्स लावण्याची फी, दरख्वास्तीच्या नकलाची फी वगैरे कांहीं पडत नसे. साक्षीदार भत्त्यावांचूनच येत. वकील बॉरिस्टर, ब्यारिस्टर हीं नांवें सुद्धा ऐकून ठाऊक नव्हतीं. अर्थात कज्जे वाढाविण्यापासून कोणाचाच आर्थिक फायदा नव्हता. उलट आपला कामधंदा सोडून साक्ष देण्यास जाण्याचा कंटाळा असल्यामुळें तंटे जितके आपसांत मिटतील तितके मिटविण्याचा सगळे जण यत्न करीत. पण आतां कज्जे वाढवून आपला फायदा करून घेण्याचा धंदाच झाला आहे. व या धंद्याला सरकार व लोक दोहोंकडून ही प्रतिष्ठित मानण्यांत येऊं लागलें आहे. याचा परिणाम हल्लीं दिसत आहे त्याहून निराळा होणें शक्य आहे काय? गोरे जज्ज व ब्यारिस्टर यांच्या तिजोऱ्या गरीब प्रजेच्या पैशानें भरल्यावर प्रजा निःसत्त्व आणि गरीब झाली, भांडण्यांची एकदां संवय जडल्यावर तीच संवय सामाजिक व इतर गोष्टींतही दिसूं लागली व सर्व बाजूंनीं देशाच्या अधःपात झाला यांत काय नवल आहे? हा त्रिदोषापैकीं दुसरा दोष. तिसरा दोष विचित्र शिक्षणपद्धति. आह्मां लोकाना सरकारी म्हणा किंवा खाजगी म्हणा शाळांतून कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळत असतें? परचक्रापासून स्वतःचें रक्षण करण्याचें सामर्थ्य अंगीं प्राप्त होईल असें शिक्षण निर्बुद्ध पशुपक्षी सुद्धां आपल्या संततीला देत असतात. स्वतःचें रक्षण ज्याला करितां येत नाहीं. तो मनुष्य कसला असें अशिक्षित रानटी माणसें सुद्धां समजतात. देशाच्या संरक्षणार्थ आयतेवेळीं उपयोगी पडावें म्हणून जर्मनी, फ्रान्स, वगैरे राष्ट्रें सक्तीचें लष्करी शिक्षण देशांतल्या तरुणांना देत असतात, व हीच पद्धति इंग्लंडानें उचलावी असा लॉर्ड राबर्टस प्रभृति वीरांनीं विलायतेंत अट्टहास चालविला आहे. पण हा अट्टहास विलायते पुरताच! हिंदुस्थानें मात्र स्वसंरक्षणासाठीं विलायतेच्या तोंडाकडे पाहिले पाहिजे. सारांश आह्मांस लष्करी शिक्षण मिळण्याची तूर्त तरी कांहीं आशा नाहीं. तीच गोष्ट धर्म शिक्षणाची. सरकारनें धर्माच्या बाबतींत हात न घालण्याचा निश्चय केला आहे तो फार चांगला आहे. पण त्यामुळें झालें आहे काय? तर सरकारी शाळेंत सरकारच्या वरील नियमामुळें धर्मशिक्षण मिळत नाहीं, आणि घरीं आया अशिक्षित असल्यामुळें व बापास जीवनार्थ कलहामुळें फुरसत न झाल्याकारणानें तेही मुलाच्या धर्म शिक्षणाकडे पाहत नाहीं. मग मुलें धर्माची कुचेष्टा करणारीं तरी निघतात, नाहींतर दांभिक तरी होतात यांत काय आश्चर्य आहे! बरें व्यावहारिक शिक्षणाकडे पाहावें तर तें तरी शाळांतून मिळतें काय? प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतला अभ्यासक्रम जितक्या वर्षांचा म्हणून ठरविला आहे त्यापेक्षां कमी अवकाशांत तो होणें शक्य नाहीं काय? व ज्यांचा मुलांना व्यवहारांत कांहीं उपयोग नाहीं असे अनेक विषय त्या शिक्षणक्रमांत निष्कारण ठेवण्यांत आलेले नाहींत काय? व ज्यांचा व्यवहारांत अतिशय उपयोग असे विषय वगळले गेले नाहींत काय? अशा शिक्षणक्रमांतून पार पडलेले विद्यार्थी व्यवहारांत मूढ ठरतात असा अनुभव पदोपदीं नाहीं? इतर सगळीं राष्ट्रें जीवनसंग्रामांत नेटानें आमच्यावर सरशी करून पुढें जातात, अशी स्थिति आहे कीं नाहीं? ही नामुष्की टाळण्याचा मुख्य उपाय म्हणजे औद्योगिक शिक्षणाच्या शाळांची संख्या वाढली पाहिजे. अशा शाळा दरगांवास, किंवा शहरास एकेक तर राहोच, पण एकेका जिल्ह्याला किंवहुना प्रांताला तरी एकेक आहे काय? या शाळांत जाण्याची मुलांना बुद्धि व्हावी अशा प्रकारचें उत्तेजन सरकार कडून व लोकांकडून मिळत असतें काय? आमच्या उमरावतीच्या औद्योगिक शाळेचेंच उदाहरण घेऊं. या शाळेंतल शिक्षणक्रम पुरा करून पार पडलेल्यांना वऱ्हाडच्या बाहेर उदाहरणार्थ मुंबईकडे कोणी विचारीत नाहींत, खुद्द सरकार सुद्धां ह्यांच्या परीक्षेच्या सार्टिफिकीटाला मान देत नाहीं, अशानें औद्योगिक शाळेच्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर अनिष्ट परिणाम घडत आहे. या शाळे प्रीत्यर्थ हजारों रुपये दरसाल खर्च होत असतां केवळ सार्टिफिकीटाला इतरत्र मान नसल्यामुळें या शाळेला विद्यार्थी मिळत नाहीं. तेव्हां अशा प्रकारची विचित्र शिक्षणपद्धति हा आमच्या देशाला झालेल्या त्रिदोषापैकीं एक मुख्य दोष कां गणिला जाऊं नये?

वरील निराशावाद्याच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य असेल तरी या त्रिदोषाची बाधा यापुढें तरी होऊं नये म्हणून सरकार व देशांतले पुढारी यथाशक्ति प्रयत्न करीत आहेत. हे प्रयत्न व्हावें तसें जोरानें होत नसले किंवा त्यांचें दृष्यफल अद्याप विशेषसें दाखवितां आलें नाहीं तरी त्यामुळें अगदी निराशाजनक स्थिति आहे असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. सर्व दिशांनीं सुधारणेचे यत्न सुरू आहेत व अगदीं मंदगतीनें कां होईना पण प्रगतीच्या मार्गांत देशाचें पाऊल पुढें पुढें पडत आहे हें शुभ चिन्हच म्हटलें पाहिजे, येवढेंच तूर्त आह्मांस या संबंधानें म्हणावयाचें आहे. उमरावतीच्या टेकनिकल इन्स्टिटयूट संबंधानें जी अडचण वर दाखविण्यांत आली आहे ती अगदीं खरी आहे व तिच्याकडे आमच्या प्रांतिक अधिकाऱ्यांचें लक्ष लवकर जाईल व ही शाळा भरभराटीस आणण्याची योग्य तजवीज लवकरच होईल अशी आह्मी उमेद बाळगतों. ही आमची अशा निष्फळ होऊं देऊं नये अशी प्रांतिक अधिकाऱ्यांस आमची सविनय प्रार्थना आहे

पदव्यांची खैरात.

गेल्या तीन चार वर्षांत नूतन वर्षारंभ दरबार, किंवा बादशहाचा वाढदिवस वगैरे निमित्तानें हिंदुस्थानांत जी पदव्यांची खैरात होत आली आहे तिच्याकडे पाहिलें म्हणजे सरकारला अशी सूचना करावीशी वाटते कीं या पदव्यांचा जर खरोखर कांहीं मान राखावयाचा असेल तर त्या देण्यांत सारासार विचार करण्याची व हात आखडता घेण्याची बरीच जरूरी आहे. पाणिनीनें ज्याप्रमाणें श्वानां, युवानों, मघवा वगैरे लहानथोरांना एका सूत्रानें बद्ध करून टाकल्याबद्दल एका रसिक कवीनें त्या वैय्याकरणाला सारासार विचारशून्यतेचें सर्टिफिकेट दिलें तसें या पदवीदानाचे संबंधांत सरकारचे न व्हावें, सरकारनें दिलेल्या बहुमानाच्या पदव्या खऱ्या थोर योग्यतेच्या माणसांसच प्राप्त व्हाव्या आणि या पदव्या देण्याचा सरकारचा उच्च हेतु सफल व्हावा अशा हेतूनेंच वरील सूचना आह्मी करीत आहों. दुसरी गोष्ट गेल्या ३ जून रोजीं म्हणजे बादशहाच्या वाढदिवशीं प्रसिद्ध झालेल्या मोठाल्या पदव्यांकडे बारकाईनें पाहिलें म्हणजे असें दिसून येईल कीं त्या मिळविणारांत सरकारी अधिकाऱ्यांचीच संख्या विशेष आहे. सरकारी नोकरी उत्तमरीतीनें बजावणाऱ्यांना सरकार पगाराची बढती देतें व मोठाल्या हुद्यांवर चढवितें. तेव्हां या रूपानें त्यांच्या कामगिरीचें योग्य बक्षीस त्यांना अगोदरच मिळालेलें असतें. पण जे खाजगी गृहस्थ निरपेक्षबुद्धीनें उत्तम नागरिकाचीं किंवा परोपकाराचीं कृत्यें करतात, त्यांची योग्यता आपण जाणत आहों हें दाखविण्याशिवाय त्यांना पदव्या देण्याशिवाय सरकारपाशीं दुसरें कांहीं साधन नसतें. तेव्हां या पदव्या अशा लोकांनाच विशेषतः मिळाल्या पाहिजेत. पण तत्वतः ही गोष्ट खरी असली तरी वस्तुस्थिति या मूळ उद्देशाला धरून नाहीं. यासाठीं तिच्यांत सुधारणा होणें इष्ट आहे. तिसरी गोष्ट या पदवीदानांत सर्व प्रांतांतल्या, व सर्व व्यवसायांतल्या परोपकारी लोकांचा समावेश व्हावयास पाहिजे. पण तो तसा होत नाहीं. परवाच्या पदव्यांच्या यादींतच आमच्या वऱ्हाडप्रांताला बहुतेक अनीबात वगळल्यासारखें झालेलें आहे. असें न होतां ही याद जितकी निर्दोष व सार्वत्रिक होईल तितकी सरकारची गुणग्राहकता अधिक व्यक्त होईल येवढेंच आह्मांला नम्रपणें सरकारला सुचवावयाचें आहे. चवथी गोष्ट हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षणासारख्या इष्ट सुधारणेला व स्त्रियांच्या हातून होणाऱ्या उपयुक्तकृत्यांला उत्तेजन देण्याचा उत्तम मार्ग म्हणजे अशीं कृत्यें करणाऱ्या स्त्रियांचा सरकारनें बहुमान करणें हा होय. पण पदव्यांची यादी तयार करतांना या गोष्टीकडे अधिकाऱ्यांचें लक्ष जावें तितकें गेलेलें दिसत नाहीं यापुढें तरी उत्तरोत्तर या सर्व बाबतींत सुधारणा दिसून येईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

फ्रान्सांतला असंतोष

फ्रान्स देशच्या राज्यपद्धतीनें असा एक नियम ठरविला आहे कीं त्या देशांतल्या प्रत्येक तरुणानें निदान दोन वर्षें सैन्यांत राहून लष्करी शिक्षण घेतलें पाहिजे. या नियमामुळें त्या देशांत प्रसंग पडल्यास अध्यर्धा रात्रीं लष्करी कामाला उपयोगीं पडतील असे लक्षावधि लोक आज तयार आहेत थोड्या दिवसांपुर्वी तेथील सरकारला असें वाटलें कीं ही दोन वर्षांची शिक्षणाची मुदत थोडी आहे. म्हणून त्यांनीं ती तीन वर्षांची केली. ती वाढाविल्या बरोबर फ्रान्सांत एकदम मोठी गडबड उडून गेली. तेथील लोकांनीं एक प्रचंड सभा भरवून या गोष्टीचा निषेध केला. लोकांत उत्पन्न झालेला हा असंतोष त्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगून कमी करावा म्हणून कांहीं लष्कर

अधिकारी मुद्दाम त्या सभेला गेले व त्यांनीं स्वदेशरक्षणाचे पवित्र कार्यासाठीं स्वार्थ त्याग करण्याचा उपदेश करून लोकांत कर्तव्या-विषयींची जागृति उत्पन्न करण्यासारखें उत्तम वक्तृत्वपूर्ण भाषणें केलीं. पण फ्रेंच लोकांच्या मनावर त्या भाषणांचा कांहीं परिणाम झाला नाहीं. व असंतोषाचें बीज जें एकदां रुजलें तें रुजलेंच. फ्रान्स मधल्या असंतोषाशीं आह्मां हिंदुस्थानवासीयांना कांहीं कर्तव्य नाहीं हें खरें; तथापि या लहानशा गोष्टी वरून आह्मांला ही पुष्कळ शिक ण्यासारखें आहे येवढ्याच साठीं ही गोष्ट येथें सांगितली आहे. फ्रांन्स देश गेल्या पंचवीस तीस वर्षांत अतिशय विलासी बनत चालला आहे ह्मणून इतर राष्ट्रें त्याचा उपहास करीत असतात. त्या लोकांचें ठायीं स्वाभिमान स्वदेशाभिमान नाहीं असें नाहीं. हिंदुस्थानच्या मानानें तर हे गुण त्यांच्या अं-गीं शतपटीनें अधिक आहेत असें असताही केवळ शांततासुखाची व विलासाची चटक लागल्यामुळें त्यांना स्वतःच्या देशासाठीं दोन वर्षांच्या जागीं तीन वर्षें लष्करीसेवा क-रण्यास लावतांच त्यांचीं मनें बिथरलीं. विलास प्रियतेच्या योगानें मनुष्याचें मन कसें भ्रष्टता पावतें त्याचें हें उदाहरण आहे. जेथें अगोदरच दोन वर्षांच्या लष्करी शिक्षणाची सक्ती आहे अशा फ्रान्स देशाची ही गोष्ट. मग ज्या आमच्या देशांतल्या लोकांना सरकारनें लष्करी व्यवसायाचा मार्ग बहुतेक बंद करून टाकला आहे व निःशस्त्रही केलें आहे; तेथें युद्धाविषयींची परा.मुखता व नाट्य, संगीत, वगैरे ल-लितकलाविषयींची लोलुपता या जोडगोळी-नें आमच्या लोकांत किती मानसिक अध:-पात झाला असेल, व आमच्या राष्ट्रीय अभ्युदयाच्या कल्पना कशा अंधुक झाल्या असतील त्याची कल्पनाच केली पाहिजे. अर्से होणें हें सरकारला व प्रजेलाही इष्ट नाहीं. ह्मणून आमच्या लोकांना लष्करी शिक्षण देण्याची अवश्यकता सरकारनें लव-कर ओळखावी अशी आमची सरकारला अत्यंत नम्रपणाची राजनिष्ठापूर्वक आग्रहाची विनंति आहे.

पुरूषांनों, सावध रहा !

आमच्या देशांत बायका नुकता कोठें स्त्री शिक्षणाचा आनामा शिकूं लागल्या आहेत. ह्मणून उगाच कोणी बायकांना नावें ठेवील तर तें शिकलेल्या बायकांना खपा-यचें नाहीं हो! मागें 'मनोरंजना' च्या एका अंकांत बायकांनीं गृहव्यवस्था ठेवावी या विषयीं एका पुरुषलेखकानीं चार गोष्टी सांगितल्या होत्या. त्याला श्री० सौ० 'कुसुम' या लेखकेनें मेच्या अंकांत रोख ठोक जबाब दिला आहे. त्याचा भावार्थ असा आहे कीं पुरुषांना गृहव्यवस्थेची उठाठेव कोणीं सांगितली आहे? बायकांनीं असं वागावं, तसं करावं, अशा लांब जिभा काढून सांगणाऱ्या पुरुषांनीं अगोदर स्वतःचें वर्तन सुधारावें. बायको पुष्कळ टापटीपीची आणि दक्ष असली, पण नवरोबा ह्मणजे शुद्ध बैलोबा असले तर तिनें आपला सुग्रणपणा कसा दाखवावयाचा? पुरुषांनीं कौंसिलांचीं, म्युनिसिपालिट्यांचीं किंवा लष्करच्या भाकऱ्या भाजण्यासारखीं इतर कामें सुचतात, पण घरचा बाजार, हिशेबटिशेब, वेळचेवेळीं येणें, मुलांच्या शिक्षणाकडे पाहणें, घराची स्वच्छता राखणें इ० गोष्टी करण्याचें सुचूं नये हें आश्चर्य नाहीं काय? या गृहव्यवस्थेच्या गोष्टी नाहींत काय? यांत पुरुषांनीं बायकांवर सगळीं कामें लोटून ऐदीपणानें राहणें याला संसाराची भागिदारी ह्मणतां येईल काय? ज्याला स्वतःच्या घराची नीट व्यवस्था राखतां येत नाहीं, तो देशाच्या राज्यकार-भाराच्या उलाढाली अशा कराव्या अन तशा कराव्या ह्मणून सुचविणा याला काय ह्मणावयाचें! सौ० कुसुम यांच्या लेखाचा हा मथितार्थ वाचून कित्येक पुरु-षांच्या अंगाला कंप सुटेल. पण अतांच अशी भीती बाळगण्याचें कारण नाहीं. सौ० कुसुम या कांहीं मताभिलाषी स्त्रियांच्या चमूंतल्या नाहींत; आणि हिंदुस्थानांत मता-भिलाषी स्त्रियांचा पक्ष निर्माण व्हावयाचाच असला तर तो प्रसंग पुरुष असे कंपीत झाल्यानें थोडाच टळणार आहे? पण सौ० कुसुम यांच्या लेखापासून या पुढें वारा कोणत्या दिशेनें वाहूं लागणार आहे तें मात्र कळून येईल, आणि तें कळल्यावर तरी पुरुषांनीं सावध राहावें आणि स्त्रियां-विषयीं कांहीं लिहिणें किंवा बोलणें झालें तर फार जपून लिहावें व बोलावें येवढा इषारा तूर्त बस आहे.

योजकस्तत्र दुर्लभः

ईश्वरानें मनुष्याच्या सुखाचीं साधनें जिकडे तिकडे विपुलतेनें पसरून ठेविलीं आहेत. फक्त माणसानें आपल्या अंगांतला आळस झाडून आणि ईश्वरदत्त बुद्धीचा उपयोग करून तीं नुसतीं गोळा कर-ण्यास लागावें ह्मणजे झालें. वायु, पाणी विद्युत् यांचे उपयोग आमचे शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या प्रकारें करून घेतला आहे, पण सूर्यासारख्या तेजोराशीचा मात्र अद्याप व्हावा तितका फायदा मनुष्य जातीनें अद्याप मिळविला नाहीं. सूर्यप्रकाशाचा उपयोग फोटो-ग्राफींत फक्त करून घेतला आहे. सूर्याच्या अंगच्या उष्णतेचा तर तितका ही करून घेतलेला दिसत नाहीं थोडेवर्षांपूर्वी काशी-च्या एका कल्पक पंडितानें सूर्याचें किरण आरशांच्या साधनानें एका केंद्रांत आणून त्यापासून उत्पन्न झालेल्या उष्णतेनें स्वयंपाक करण्याचें 'भानुताप' नांवाचे एक यंत्र तयार केलें होतें. पुढें तें यंत्र प्रचारांत कां आलें नाहीं तें कळत नाहीं. सायंटिफिक अमेरिकन नांवाच्या शास्त्रीयविषयक पत्रांत सूर्याच्या उष्णतेचा दुसरा एक फायदा सुच-विण्यांत आला आहे. तो असा कीं काचेचा एक मोठा हौद करावा व त्यांत पाणी भरावें. या हौदांतल्या पाण्यावर सूर्यप्रका-शाचें किरण एका केंद्रांत पडतील अशी तजवीज केल्यानें हें पाणी तापेल. या तापलेल्या पाण्याच्या वाफेनें विहिरींतून वर पाणी काढणारा बंब चालवितां येईल. पवन चक्कीपेक्षां ही भानुतापचक्की अधिक नियमितरीतीनें चालेल. सुर्याची उष्णता सांठवून ठेवण्याची कांहीं तजवीज करण्याकडे पुष्कळ शास्त्रज्ञांची बुद्धि लागली आहे.

वऱ्हाडवृत्त.

हवामान—या सप्तकांत दोन तीन दिवस पाऊस चांगला झाला. सर्व देश-भर हा पर्जन्य असल्यामुळें हवेंत शीतलता व थंडोसा आलेला आहे. गेल्या शनिवारा-पासून वारा जोराचा सुटतो, रात्रीं शुभ्र चांदणें पडतें, व दिवसा ऊनही कडक असतें. दोन ऋतूंच्या या संधिकालावर पर्जन्य चांगला जोराचा होईल तर रोग-राईला स्थान न मिळतां सर्व खळमळ वाहून जाईल.

श्री शृंगेरी पिठाचे प्रतिनिधी श्री सुब्रह्मण्य स्वामी, संस्थान श्री शिवगंगा यांनीं येथील बेडर प्रकरणाचा निकाल गेल्या वैशाख शुद्ध १३ ला दिला आहे कीं रा. रा. देवीराम कोंडजी शिवचरण लखाराम राजाराम काले पेनशनर सुभेदार भीमसेन लक्ष्मण जरांडे मास्तर इत्यादिकांच्या जातीच्या लोकांचे घरीं मराठे कुणब्याप्रमाणें धर्म-कृत्यें ब्रह्मवृंदानीं चालविण्यास हरकत नाहीं. हा निर्णय श्री संकेश्वर व करवीर स्वामींच्या ठरावाला धरूनच आहे. आतां आमचा ब्रह्मवृंद वरील शास्त्रोक्त निर्णयाला अनुस-रून मनाचा थोरपणा व्यक्त करितील आणि येथील दुही मोडून वरील गृहस्थ मंडळीस अपल्या तीर्थप्रसादानें पूनीत करितील असा पूर्ण भरंवसा आहे.

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. स्टानिअन सेकंड आडिशनल जुडीशिअल कमिशनर यांच्या रजेंत त्या न्यायासनाचा बहुमान रा. रा. जे. सी. मित्र बारिस्टर, नागपूर यांस देण्यांत येत आहे. सर बोस यांच्या मागून त्या स्था-नाला सप्तात्र अशेच मध्य प्रांतांतील गृहस्थ निवडण्यांत आलें हें उत्तम होय; पण अशा नेमणुकीच्या वेळीं वऱ्हाडांतील एखाद्या कायदेपं-डिताची निवड झाली असती तर आह्मांस विशेष आनंद झाला असता.

वऱ्हाड व मध्यप्रांत यां मधील दिवाणी कचेऱ्या आज रोजीं खुल्या होतील. त्यांस देण्यांत येणारी उन्हाळ्याची सुट्टी हवामा-नाला धरून नसतें तेव्हां त्याची दुरुस्ती करण्याकडे सर हेनरी ड्रेकब्राकमन लक्ष्य पुरवितील तर लोकांस खेर सौख्य होईल,

आकोल्याच्या पाण्यासंबंधाच्या प्रश्नाचा निकाल सर बेंजामिन राबर्टसन फार चौकसपणानें करीत आहेत आणि ८।१० लक्षाच्या खर्चामुळें हा प्रश्न बाजूला पडणार होता पण आतां पुनः आशा वाटते कीं कापशीला तलाव वगैरेचीं कामें लवकरच सुरूं करण्यांत येतील, मेजर प्रौडन यांस अशा गोष्टीचा मोठा आनंद वाटेल.

रा० रा० स्लेनी साहेब एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं येथील कामाचा चार्ज या आठवड्यांत घेतला.

येत्या शुक्रवारीं लार्ड हार्डिंग यांच्या वाढदिवसा निमित्त सार्वजनिक सुट्टी असून प्रा[illegible] शाळांतील विद्यार्थ्यांचे खेळ वगैरे [illegible] येऊन त्यांस खाऊ व तसबिरा [illegible]ण्यांत येतील.

रा० रा० मोइनुद्दीनखान डेपुटीकमिशनर यवतमाळ यांस सहा माहिन्यांची रजा देण्यांत आली.

रा० रा० सखाराम गणेश परांजपे असि० सर्जन यांची बदली बैतुलास होऊन येथें रा० रा० भास्कर रामचंद्र चांदोरकर असि० सर्जन यांस आकोल्यास बदलण्यांत आलें.

रा. रा० संतसींग सब इनस्पेक्टर यांस उमरावती जिल्ह्यांतच सर्कल इनस्पेक्टर करण्यांत आलें.

रा. रा. मकसूद अहमद सब-इनस्पेक्टर यवतमाळ यास त्याच जिल्ह्यांत सर्कल इनस्पेक्टर नेमण्यांत आलें.

नागपूर युनिव्हरसिटी करितां छिंदवाडाही हवाशीर जागा मुक्रर करणार असल्या विषयींची बातमी नागपुर टाईम्स कर्ते प्रसिद्ध करितात. वर्षोत्सव व्याख्यानमाला पुनः सुरूं करावी आणि काहींसा काल वाग्यज्ञाकडे अर्पण करावा असा उत्कृष्ट संकल्प येथील कांहीं तरुण सदगृहस्थांनीं केला असून ते त्या उद्योगाच्या मागें लागले आहेत.

वर्तमानसार

अतिवृष्टीमुळें बुधवारीं रात्रीं आलेल्या महापुरासंबंधानें मुंबईत आलेल्या एका खासगी तारेवरून समजतें कीं, पर्जन्य अतोनात पडल्यामुळें पालीठाणा येथील नदीचें पाणी चढून रेलवे स्टेशनाच्या आवा-रांत शिरलें व रेलवे स्टेशन व त्याचें आवार पाण्यांत बुडून गेलें. मुंबईतील कापसाचे व्यापारी सर वसनजी त्रिकमजी व मि. खेतरसी खताऊ यांच्या देणगीनें स्थापन झालेला विधवाश्रम व जैन बोर्डिंग स्कूल महापुरांत सांपडून वाहून गेलें. बोर्डिंगस्कूलमधील ४२ विद्यार्थ्यांनीं झाडावर चढून आपले प्राण वांचविले व बाकीचे पुरांत वाहून गेलें. विधवाश्रमांतील बहुतेक विधवा स्त्रिया पुरांत सांपडून वाहून गेल्याचें समजतें. शहरांतील सुमारें तीन-चतुर्थांश घरें कोसळून पडलीं आहेत व सुमारें तीनशें माणसें प्राणास मुकलीं आहेत असें समजतें. पालिठाणा हे जैन लोकांचें पवित्र स्थान असून तेथें जैन लोकांनीं सुंदर मंदिरें बांधलेलीं आहेत. या महापुराच्या बातमीमुळें मुंबई येथिल जैन मंडळींत मोठी अस्वस्थता उत्पन्न झाली आहे.

एका तारेवरून समजतें कीं, पालिठाणा येथें गेल्या बुधवारीं महापुरांत कित्येक संबंध कुटुंबेंचीं कुटुंबे प्राणास मुकलीं आहेत. विधवा आश्रम पडून वाहून गेला व त्यांतील २५ विधवा स्त्रिया प्राणास मुकल्या आहेत. बोर्डिंगस्कूलमधील ४२ मुलांपैकीं २० मुलांचे प्राण झाडावर चढल्यामुळें बचावले. एकंदर किती माणसें प्राणास मुकलीं, त्याचा बरोबर आकडा अद्याप समजत नाहीं. पण सुमारें ३०० माणसें मरण पावलीं असावींत असा अंदाज आहे. अतिपर्जन्यामुळें दसा कुंडला लाइन वाहून गेली आहे.

नोटीस

नोटीस बेशमी सकाराम व० भोपाजी पाटील राहाणार मौजे घामनी तालुका मंगरुळपीर जिल्हा आकोला

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देणार केवजी वलद रामजी जात कुणबी नेमानें राहाणार मौजे हळद तालुका मंगरुळपीर जिल्हा आकोला आपणास नोटीस देण्यात येते कीं मी मौजे साकरडोह इजारा प्रगणें गीरोली ता० मंगरूळपीर जि० आकोला येथील शेत सर्वे नं० २८ यांतील निम्मे हिश्याबद्दल बळीराम भगाजी भोयर रा० साकरडोह याजवर आग्रक्रियेबद्दल दिवाणी कोर्टात दावा करण्या करीतां तुह्मांस मुखत्यार दिले आहे तरी या नोटीसीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं त्या आग्रक्रियेच्या दाव्याबद्दल बळीराम भगाजी याचा व आमचा आपसांत निकाल झाला आहे त्याबद्दल कांहीं तक्रार राहिली नाहीं करीतां तुह्मी दावा कोर्टात चालऊ नये व या दाव्याबद्दल तुह्माला जे मुखत्यार पत्र दिले आहे तें या नोटीसीनें रद्द केलें आहे कळावें ता- ५-६-१३ ई.

द० नारायण रामासा महाजन मानोरा

सही

केवजी वा रामजी द० खु०

राहणार मौजे हळद.

नो० नं० १५

नोटीस

नोटीस बेशमी शेख सलाउद्दीन वा॥ शेख रमजान रा० नांदुरा ता० मलकापूर

यांस.—

खालीं सही करणारी कडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज सरासरी २ वर्षे झालीं. आपण कांहीं दिवस प्रतिपाळ करून मला अन्यायानें आपण माझे माहेरीं नेऊन दिलें. व माझ्या परवानगी शिवाय दुसरें लग्न केलें मी आपला निर्वाह ७ महिन्यापासून मझे माहेरी कर्ज काढून करीत आहे. तर आपण माझी सर्व अव्यवस्था तोडून मला न्यावें. मी येण्यास तयार आहे. दुसरें मझी आपणास माझ्या महेराच्या हक्काची मागणी आहे. तरी आपण आतां पर्यंतचें माझें कर्ज देऊन मला माझा महेराचा हक्क देऊन त्वरित नेण्याची व्यवस्था करावी. माझ्या महेराचा हक्क २५०० रुपये ठरला आहे. माझे अंगावरील डागीनें माझ्या आईनें व भावानें दिले होते त्याच्यावर तुमचा कोणतेंच प्रकारें हक्क नाहीं. ता० ११।६।१९१३

सही

लालची मर्द सलाऊद्दीन रा० नांदुरा

सयद जमालचा महल्ला हिची

नि० बांगडी

नो० नं० १६

नोटीस

नोटीस बेशमी सरदारखां वलद गुलाम दस्तगीरखां रा० रसुलपुरा ता० जळगांव

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे पुतणे आहांत ह्मणजे तुमचे वडील हे माझे व्याही होते तुह्मी ५ भाऊ २ बहिणी व तुमच्या २ सावत्र आया येणें प्रमाणें घरचीं माणसें आहेत. अशा दृष्टिनें पाहातां वडिलार्जित इस्टेटींत तुमचा हक्क सुमारें दोन आण्याचा आहे वडिलोपार्जित इस्टेट सुमारें ५०० एकर जमीन असून ती आजरोजीं तुह्मी सज्ञान ह्मणून तुमचे नावें आहे. तुमचीं सर्व भावंडे अज्ञान आहेत त्या शिवाय घरें ५ जोड्या १० सुमारें गाई ४० ह्मसी वगारें २० घोड्या ८ गाड्या व दमण्या ५ आणि इतर भांडे सोने चांदी वगैरे जंगम माल व नगदी ४॥ हजार रूपये कन्हयालाल मारवाडी यांचे जवळ ठेवलेलें या शिवाय गहाणदारीनें दुसऱ्याच्या तुमच्या जवळ असलेल्या इस्टेटी व खाजगी जमा वगैरे तुमच्या जवळ आहे. आंतां तुह्मी सज्ञान असल्यानें सदर्हु इस्टेट व वारस तुमचे स्वाधीन आहेत. व त्यांचें योग्य पालन करणें व त्याची इस्टेट कायम ठेवणें तद्वत त्यांचा मान ठेवणें हें तुमचें कर्तव्य आहे. आतां तुह्मी बरेचसें कर्ज काढण्याचे घाडस करीत आहात. तरी हें करणें त्या वारसाचे फायद्याचे दृष्टिनें वाईट आहे. तरी तुमच्या त्या इस्टेटींतील २ आणे हिस्सा ओळखून या पुढें तुह्मी कर्ज काढूंनये. काढल्यास त्या बद्दलची जबाबदारी तुमचेवर अगर तुमचे हिश्यावर आहे. तसेंच कोणी साहुकार यांनींही वरील इसमा जवळून वरील वारसाची इस्टेट कोणी गहाण खरेदी घेऊंनये अगर कर्ज देऊंनये. दिल्यास त्या बद्दलची जबाबदारी त्यांचे कडेस राहील इस्टेटीवर राहणार नाहीं कळावे ता० ३० मे १९१३ ईसवी

सही

आमद रसूल वलद अबदुल कादर

पाटील राहाणार तिकोडी पो०

नांदुरा ता० मलकापुर

नो० नं० १७

नोटीस

नोटीस बेशमी काजी सलाउद्दीन साव खान बहादूर नांदुरा २ मुनशी खाजा निजामुद्दीन राहणार आकोट जि० आकोला

या उभयतांस:—

खालीं सही करणारीकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माला माझ्या खाजगी व सरकारी कामा करितां आम मुखत्यारपत्र मी दिलें होतें. तरी तुमचे कडून मला योग्य हिशेब मिळत नसल्यानें आज तारखे पासून तें रद्द केलें आहे. यापुढें माझें तर्फे तुह्मी कोणतेंही काम करूं नये केल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर आहे व मागील सर्व हिशेब मला सर्व समजाऊन द्यावा. कळावे ता० ४-६-१३ ई०

सही

अवलिया बेगम मर्द राफियोद्दीन

उर्फ गबरूमिया मनसबदार

इनामदार आकोट तर्फे मुख्त्यार गुलामहुसेन इंजिनियर आकोट जिल्हा अकोला गरपुर

नो० नं० १८

कापूस-- तक्ता- साप्ताहिक- ७ जुन १९१३ पर्यंत

जिल्हा.	वर्ष	काटन मार्केट आयात कापसाच्या गाड्यांची संख्या ता.७।६।१३ पर्यंतचा आठवडा	कापसाच्या गाड्यांची संख्या १।१०।१२ पासून	रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या ता. ७।६।१३ पर्यंतचा आठवडा	रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या १।१०।१२ पासून	गठ्ठे बांधण्याचे प्रेस बांधलेली गठडी. ता० ७।६।१३ पर्यंतचा आठवडा	बांधलेली गठडी. ता. १।१०।१२ पासून आज तागाईत
उमरावती	चालू साल	९९४	१६७२२०	४८६	२३,१६१	३,४१०	१७७,८९१
	गुदस्त	७८	२४९३८८	१८०	२७६८६	....	.
	तिगस्त	९४०	११०८८७	२२२	१३१७६	....	
यवतमाळ	चालू साल	....	१३३२१६	११२	२०,७९१	....	८९,८३३
	गुदस्त	....	१४१४९६	....	११,९२२	....	....
	तिगस्त	९	४०,३४२	५६	१३,५६०	....	....
आकोला	चालू साल	३३३	१५६९५९	१,०५५	४९३७५	२८५२	१८४६०७
	गुदस्त	२६	१८१८६२	२०६	५१५९	....	....
	तिगस्त	१६९	१०१४८३	११६५	२६०४६	....	....
बुलढाणा	चालु साल	७२	९६,५७२	१८५	११,२९४	९८५	१३०९९६
	गुदस्त	९७	१२०९६९	१८६	९३६२	....	....
	तिगस्त	४६२	११९,७३	२२५	७,०७१	....	....
एकूण वऱ्हाड	चालू साल	१,३५९	५५३९६७	१,८३८	१०४६२१	७,२४७	५७९,३७७
	गुदस्त	२०१	६८९७१५	५७२	१००५६९	....	....
	तिगस्त	१,१८०	३७१८८५	१,६६८	५९,८५३	....	....

टीप—चालू सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ८ जून १९१२ व १० जून १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
२१ ५२

सी. यू. वीस्स.
डायरेक्टर आफ आग्रिकलचर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

अमूल्य संधी ! अप्रतीम नासिक चूर्ण !! अमुल्य रत्न.

टि. सि.

सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकाच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. आल्किडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या श्रेष्ठयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि उतदेशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.

मस्तकशूल, ज्ञानतंतूची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानासिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळाल्या व नित्य मेळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशा प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे लोक प्रिय सुगंधी तपकीर केवल एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभरित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
" डझन डबीस २–६–० " " " ०–६–०

(सुचना) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत लिहुन कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील' किंवा तसें न केल्यास **अडिचरुपयांस** पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० २८ पार्क टाऊन पोष्ट' **मद्रास**

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास

नो. नं. २९

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा

डॉ० वामन गोपाळ यांचा
आयोडाईज्ड सार्सापारिला.

हा सार्सापारिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठराविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाळ खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० ३०

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANy
Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceasr of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 31

जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत. शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आम्हाकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळाविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी म्हणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७] आकोला-- सोमवार तारीख २३ माहे जून सन १९१३ इ० [अंक २४

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक / G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ / एजंट
नं १

मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या **सोन्याच्या** चिपा मुंबई बँकच्या **आकोले आणि उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९½ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक / G. A. Phillips.
आकोला २१-९-१० / एजंट.
नं० २

जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें (मंदिराचें) काम बांधण्याचे सुरूं आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. **वर्गणीचें** कामी संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल कर्तें नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात म्हणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्याला संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी. **व्यवस्थापक.**

रामचंद्र कृष्णाजी पाटील
नो० नं० ३

वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां **डोळे तपासून** सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ४ आकोला

अपूर्व लाभ ! अपूर्व संधी ! ! अपूर्व संधी !!!

उत्तम कलप.

—:-*-:-*-:—

जर तुह्माला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहीत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखें मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे. एक पेटी ६ महिने पुरते. त्यांच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त म्हणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे.

ट. ह. निराळा

आमचा **पत्ता**

हजरत मौलाना आशके यादानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई

नो० नं० ५

अजब करामत.

बालक्षुधा निवारण- लहान मुलांस वर दूध बालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हौसेनें घेतात. किं० १ तो० ४२ आणे.

हेममुधा- धुपणी हा रोग पुष्कळ स्त्रियाना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

कामधेनुगुटिका- अलीकडील निरानिराळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ४६ आणे.

जानकीबाई रानडे / सांगली,
नर्स अॅण्ड मिड्वाईफ.
नो० नं० ६

रामबाण उपाय.

रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी म्हणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा म्हणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ४= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे.

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. म्हणजे त्या पासून त्वचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥=सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डीत कृपाराम
४ नंदीबागानलेन पो. सालकिया जि. हावरा.

नो० नं० ७

नोटीस

नोटीस देणें बळवंता वा॥ भावासिंगणे रा० मौजे आगेफळ ता० मेहेकर जि० बुलडाणा यांसः-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते की तुझी माझे लग्न नवरे असून तुमचें माझें लग्न होण्या बारा वर्षांचेवर काळ झाला. त्या दिवसापासून तुझी मजला नांदविण्यास नेत नाहीं. मी तुमचा कांहीं अपराध किंवा नुकसान केलें नाहीं असें असून तुह मजला नांदवीत नाहीं. मी वयांत येऊन बरेच दिवस झाले तुझी कां नेत नाहीं या कारणही सांगत नाहीं. करितां या नोटिसीनें असें कळविते कीं तुझी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत माझे बापाचे घरीं येऊन माझें अन्नवस्त्रा बद्दल दरमहा रुपये ४ प्रमाणें आज पावेतो खर्च चुकऊन देऊन मजला नांदविण्यास घेऊन जावे. मी येण्यास तयार आहे असें न केल्यास मी हीच फारकत समजून दुसरा गंधर्वाचा नवरा करीन तुमची कोणतीही सबब ऐकणार नाहीं. व तुमचे नवरे पणाचा हक्क चालणार नाहीं. मी यापूर्वी पोष्टानें तुह्मास नोटीस दिली होती. ही नोटीस लिहून दिली सही ता. १८।९।१३ इ० द० नारायण श्रीपत खडके फत्तेखेडी

सही
सुज्ञानी मर्द बळवंता सिंगणे रा० गोरेगांव ता० मेहेकर इची हातची बांगडी मु. फत्तेखेडी
नो० नं० ८

NOTICE

The Berar Victoria Memorial Tecknical Institute, Amraoti.

The new section commence from the 17 June 1913. The admission examination will be held on the 16th June in (1) English reading, explanation, Grammer & analysis as laid down for the 6th Standard (2) English Composition (3) Arithmetic & Algribra & (4) Simple free hand drawing.

Scholarships for desiring students. No fees.

The Course of instruction is Mechanical Enginnering & extends over three years. Detailed prospectus on application to the Superindent of the Institute.

R. N. Mudholkar
Honorary Secretary
No N. 9

नोटीस

टीस बेशमी शेख रमजान वल्द
सलाबद्दीन रा. नांदुरा ता. मलकापूर

ली सही करणारा कडून नोटीस दे-
येते कीं हाशम वल्द शेख हुसेन यांचें
स० नंबर २३० आकार रुपये २५
९ गुंठे २४ यांतील हिस्सा ४आण्या-
ी खरीदी घेतला. घेताना मला कांहीं
ची गरज लागल्यानें मी तुझास हात
रुपये मागीतले परंतु तुझी दिले नाहीं.
आपण अशा ठरावानें रुपये दिले कीं
रीदी आपण उभयतांच्या नावें ठेवुं.
ज्या वेळेस तुझीं माझे रुपये द्याल.
मी तुमच्या नांवाची जमीन पुनः
खरीदीनें परत देईल. पैकीं १००
पंचासमोर तुझास पावले आहेत व १००
देणे आहेत थोड्या दिवसापुर्वी मी
रुपये घेउन माझी मला खरीदी
करण्या विषयीं विनंती केली. परंतु
आज उद्या करीत थापा देत आहांत.
री तुमचे व माझे विनसल्यामुळें
मला १ खोटी नोटीस दिली होती.
पंचा समोर झालेली गोष्ट तुह्माला
वितां येणार नाहीं. तरी माझे जवळून
० रुपये घेऊन माझा हिस्सा मला
ी द्यावा. येणे प्रमाणें १९ दिवसांत
लें कडून व्यवस्था न झाल्यास योग्य
त दावा आणावा लागेल कळावें ता०
जून १९१३

सही
करीमखां वल्द अजीमखां मु०
नांदुरा टीनाची दुकान.
नो. नं. ६४

नोटीस

टीस बेशमी अहेलाई मर्द रावजी जिरे
रा० जनुन ता० खामगांव.
ईस.—

मी खालीं सही करणार याजकडून
शीलीनें कळविण्यांत येते कीं तूं माझी
ाची बायको असून लग्न झाल्यास १६
झालें त्यांत ४ वर्षें तूं मझे
राहून संसार करून तुजला माझे
ची एक मुलगी झाली व तुझा व
ा कधीच तंटावैगेरे झाला नसून
ा भाऊ माझे पश्चात येऊन तूं आ-
ईचें घरीं गेली त्यास बरेच
स झाले. मी व माझाभाऊ आनंदा
ने आह्मी २–४ वेळा चार चौघासह
न तुजला नेण्या करितां आलो असतां
ठवीत नाही असे साफ सांगीतलें न
ठविण्याचें कारण विचारितां कारणही
गत नाहीं. करितां तुजला नोटिसीनें
ळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून
९ दिवसांचे आंत अंगावरील डागिन्या-
ह यावे मी तुजला वागविण्यास राजी
हि तुझी आई, भाऊ, व गोपाळराव
डंग, संपत गोविंदा असे तुजला गंध-
नें देऊन पैसे खाण्याचे खटपटींत आहेत
से समजलें व तूं न आलीस तर
र्टमार्फत तुजला ताब्यांत घेऊं व तुज
ाही घेण्याकरितां आलो होतो त्यावेळीं
तुजला व तुझें आईस व भावास येथें
राहिल्यास आमचेकडुन क्रि० प्रो० कोड
कलम ४८८ प्रमाणें अन्नवस्त्रावद्दल आमचे
कडून पैसा व फारकती मुळीच मिळणार
नाहीं नोटिसीप्रमाणें न केल्यास कोर्टखर्च
व नोटीसीचा खर्च तुझे आईभावापासून
कोर्टमार्फत घेतला जाईल कळावें तारीख
२०-५-१३

सही
रावजी वल्द नारायण माळी रा०
पहूर द० खु०
नो० नं०१५

नोटीस

नोटीस बेशमी ओंकार वल्द तुळजाजी
पाटील रा० पाळोदी ता० आकोला
पो० आगर यास:—

खाली सही करणाराकडुन नोटीस देण्यांत
येते कीं शेत सर्वे नंबर १७ एकर ३८२६
ही इस्टेट मी अज्ञान ह्मणून गांवच्या
पचांनीं तुमच्या स्वाधीन करून माझ्या
अन्नवस्त्राची तरतूद ठेवण्यास सांगितलें.
तुह्मी थोडे दिवस मला अन्नवस्त्र दिलें व
पुढें तेंही बंद केलें. नुकत्याच झालेल्या
मोजणीच्या वेळेस पटवाऱ्यानें माझ्या नांवाची
नोंद केली असतां तुह्मी तक्रार केली.
मी माझे वतीनें किसनराव पांडोबा, सखा-
राम पाटील मोरगांवकर आणि किसनराव
बळीराम या तिघांचे समोर आपण चैत्रांत
पट्टा करून देण्याचें कबूल केलें होतें.
परंतु अद्याप आपण तो करून दिला
नाहीं. व पुढें ही देण्याचा रंग दिसत
नाहीं. तरी ही नोटीस दिली जाते कीं
आपण पट्टा करून दिल्याशिवाय शेतांत
आतें नेऊं नये. सदरहु नोटिशीचें उत्तर ८
दिवसांत देणें ह्मणजे पुढील व्यवस्था
करण्यांत येईल. कळावें ता० १२।६।१३

सही
जगू वा॥ धनू पाटील रा० पाळोदी
अ० पा० क० सखाराम वा॥
शामजी खोंड रा० पाळोदी
यांचा आंगठा

नो० नं०१६

पत्रव्यवहार

ऐच्छिक विषयांची अवश्यकता.

हिंदुस्थान देश हा शेतकी बद्दल जगप्रसिद्ध आहे. शेतीचें उत्पन्न वर व्यापारवृद्धि अवलंबून असते. याशिवाय इतर खनीज पदार्थावर—लोखंडी दगड, कच्ची चामडी, हिरडा जंगली झाडांची फळें, रोषण (तिखाडीचें) तेल (गवतापासून तयार करतात) असें अनेक व्यापाराच्या जिन्नसावर व्यापार अवलंबून आहे. हिंदुस्थान देशांत पाश्चिमात्य राष्ट्रें खुलाव्यापार पद्धतीवर व्यापार करीत आहेत. अशा मोठमाठ्या राष्ट्रांच्या उत्कर्षाच्या इतिहासाकडे लक्ष दिलें ह्मणजे असें दिसून येते कीं हिंदुस्थानाप्रमाणें एक देशीय शिक्षण पद्धती त्या राष्ट्रांत नाहीं. अमेरिका, जर्मनी, इंग्लंड, आयर्लंड, जपान वगैरे राष्ट्राकडे पाहिले तर शिक्षणाचे अनेक प्रकार आहेत. ते असे–व्यापारी, शेतकी, सुतारी, लोहारी, यांत्रिक वगैरे अनेक लहान मोठे प्रकार आहेत. हा प्रकार समोर असतांना हिंदुस्थानांत फक्त विद्या शिक्षण दिलें जाते. अलिकडे शेतकी शिक्षणाची सोय सरकारांनीं केला आहे. ती प्रांतांच्या मुख्य मुख्य ठिकाणीं केली आहे. अशा प्रकारच्या शाळा प्राथमिक शाळांला हायस्कुलाला वगैरे लागून निघणें फार महत्वाची गोष्ट आहे.

हिंदुस्थान देशांत तरी औद्योगिक शिक्षण देण्याबद्दल सरकार तयार आहे. लोकांनीं त्याचा उपयोग करून घ्यावा. निरनिराळ्या धंद्याची माहिती इतर राष्ट्रांतून आणून शिक्षण देणें महत्वाची गोष्ट आहे. व्यापारी शिक्षणाची फारच जरूरी आहे. अशा प्रकारच्या शिक्षणाची सोय करणें जरूर आहे. सरकारांना विद्वान लोकांनीं मदत देऊन निरनिराळ्या शाखा काढून शिक्षण देण्याची सोय कां लावूं नये? सरकार मदत देण्यास तयार आहेत. प्रत्येक गोष्ट सरकारांनीं करावी व लोकांनीं स्वस्थ बसावें हा प्रकार आळशी लोकांचा आहे. आळस सोडला पाहिजे. ह्मणजे ठीक होईल. या सर्व गोष्टी आह्मी आज लेखन द्वारें लोकांपुढें विचारासाठीं व विचार करून आचारांत आणण्यासाठीं मांडीत आहों.

वर दर्शविलेलें शिक्षणाचे प्रकार एकदम अमलांत आणणें कठीण आहे. पण हळू हळूं उद्योगास लागले पाहिजे यास्तव प्रथम ज्या ज्या सार्वजनिक संस्था आहेत त्यांच्या मार्फत सरकारापाशीं विनंती करून शिक्षण शाखांच्या शाळा नमुन्यादाखल उत्पन्न करण्याची योजना करावी. निरनिराळ्या शिक्षणाचे प्रकार ह्मणजे सरकारांनीं शेतकीचे कॉलेज काढलें आहे. पण हायस्कुलांतून शेतकीचे, व्यापारी शिक्षणाचे वर्ग जोडले पाहिजेत. ह्मणने त्या कॉलेजांत जास्त फायदा होईल. ज्याप्रमाणें ऑर्ट कालेजाला हायस्कुल मराठीं इंग्रजी शाळा ह्यांतून मुलें जातात त्याप्रमाणें शेतकी कालेजांत, व्यापारी कालेजांत, टेकनिकल कालेजांत, मुलें सहज जातील ह्मणजे मुलांना आपोआपच धंदेशिक्षणाची गोडी लागेल अशाप्रकारे औद्योगीक शिक्षणाची गोडी लोकांना लाविली पाहिजे. शेतकीची गोडी आहेच पण शेतीची सुधारणा होऊन उत्पन्न वाढत्या प्रमाणावर कसें होईल इकडे शेतकऱ्यांचें लक्ष्य लागलें आहे. या सर्व गोष्टी साध्य कशा होतील तर त्या खालील गोष्टी प्रमाणें.–

हायस्कुलांत इंग्रजी चौथ्या इयत्तेपासून ते मॅट्रीक वर्गापर्यंत ऐच्छिक विषय ठेवावेत कॉलेजांत ऐच्छिक विषय आहेतच. त्याच तत्वावर खालील हॉयस्कुलांत ऐच्छिक विषयाचे वर्ग निघणें जरूरीचें आहे. कारण हायस्कुलांतून कॉलेजात मुलें फार थोडीं जातात. ह्मणजे सरासरी २०।२५ शेंकडा जात असतील बाकीचीं मुलें कोणीं पांचव्या, सहाव्या अगर मॅट्रीक वर्गांत एक वर्ष राहून शाळा सोडतात. अशीं मुलें फार यास्तव अशा मुलांना ऐच्छिक विषय घेण्याची सवरत मिळाल्यास तीं मुलें इतर धंद्यांत प्रवीण होतील ज्या मुलांना जे विषय आवडतात ते शिकविल्यानें त्या मुलांचे गुण दिसून येतात अशा प्रकारच्या शाळा पाश्चिमात्य राष्ट्रांत आहेत. ह्मणून तिकडचीं मुलें हुशार असतात. हिंदुस्थानांत एकदेशीय शिक्षण असल्यानें कित्येक मुलांना इच्छेविरुद्ध अभ्यास करावा लागतो ह्मणून तीं मंद दिसतात तीं मठ वाटतात. त्यांच्या बुद्धिला जो विषय पाहिजे तो नसल्यानें कार्य ऊलट होणें साहजीक आहे. हा दोष मुलांचा नाहीं तर वडील व पालकांचा आहे. व्यापार, कला, कारखाने निराळ्या उद्योग शाखा उत्पन्न होतील. अनेक फायदे होतील यास्तव एज्युकेशन लीग, सार्वजनिक सभा औद्योगिक सभा वगैरे संस्थानीं कौसिलांत प्रश्न उत्पन्न करण्याची व्यवस्था करावी. आणि ऐच्छिक विषयांचे वर्ग हायस्कुलांना जोडण्याची व्यवस्था करावी. अशा रितीनें पद्धत शीर काम विद्वानांनीं स्वार्थ त्याग करून केलें पाहिजे.

शिक्षणाच्या खर्चासाठीं बादशाहानें जास्त पैसे दिले आहेत. त्यांचा उपयोग अशा तऱ्हेनें होईल अशी योजना झाल्यास फार चांगलें होईल. तुर्त विषय घेण्यासारखे आहेत ते:—

व्यापारी शिक्षण, शेतकीचें शिक्षण, सुतारी, लोहारी शिक्षण इतके विषय तुर्त घेणें जरूर आहे. इतर विषय चामड्याचें काम, सरकीचें तेल. गवताचें तेल (तिखाडी) रंग. वगैरे अनेक विषय आहेत. ते हळू हळूं येतीलच.

वऱ्हाड प्रांत हा ही शेतकीचा आहे. वऱ्हाड प्रांतांत ज्या ज्या संस्था आहेत त्यानीं सरकारांना ऐच्छिक विषयाचे वर्ग हायस्कुलाला जोडण्याबद्दल अर्ज करावा. कारण सध्या नवीन नवीन शाळा निघत आहेत. लोकांचें लक्ष सध्यां शिक्षणाकडे लागलें आहे. यास्तव ही संधी साधून ऐच्छिक विषयाबद्दल हा लेख लोकापुढें ठेविला आहे. याजबद्दल सर्वांनीं विचार करावा हीच विनंती आहे.

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ वद्य ९ शके १८३५ प्रमादी

राष्ट्रीय आनंदाचा दिवस

ज्या दुष्टानें गेल्या दिसेंबरात दिल्ली नगरीच्या प्रवेश समारंभाच्या मिरवणुकीचे वेळीं अखिल भरतखंडाला प्रिय झालेल्या व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज साहेबावर बांब फेकण्याचें अतिघेर व नीच कर्म केलें त्याला आपल्या कृत्याचा त्याच्या समजुती प्रमाणें असा विपरीत परिणाम होईल–त्याच्या योगानें बड्या लाट साहेबाची थोर मानसिक उदारता व सहानुभूति अधिक प्रकाशमान होईल व भारतवासि लोकांची राजानिष्ठा अधिक बद्धमूल होईल. अशी कल्पना तरी झाली असेल काय! पण तो दुष्ट, पापी, चांडाळ आज जर जिवंत असेल तर जिकडे तिकडे व्हाइसराय साहेबांच्या जन्मादिनोत्सवाप्रीत्यर्थ

चाललेले आनंदाचे प्रकार, राजनिष्ठा अधिक बद्धमूल झाल्याचीं चिन्हें, निष्पाप, निष्कलंक, आनंदाच्या केवळ मूर्तिच, व हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षाचे मुख्य स्तंभ, अशा बाल-गोपालांच्या प्रफुल्लित मुद्रा, व त्यांच्या तोंडून निघणारीं व्हाइसरायसाहेबांच्या अभिनंदनपर सुस्वर संगीत पद्यें, त्याचप्रमाणें रुग्णालयांतून दुःखितांच्या तोंडून निघणारे धन्यवादसूचक शब्द- हा सगळा प्रकार त्याला किती अपूर्व व किती अनपेक्षित वाटेल? प्रत्यक्ष आपल्या प्रिय पतीच्या जिवावर अरिष्ट ओढवलें असतां ज्या असाधारण धीमान आणि प्रशांतस्त्रीनें आपल्या अंतःकरणांतली सदयता, गांभीर्य आणि सहानुभूतिहीं ढळूं दिलीं नाहींत त्या लेडी हार्डिंज साहेबांच्या मनाची थोरवी तरी किती वर्णावी? तो अनर्थकारक प्रसंग टळल्यावर झालेल्या पहिल्याच कौंसिलाच्या बैठकींत ज्या पुरुषानें हिंदुस्थानच्या राजनिष्ठेविषयींची आपली अचलश्रद्धा जोरानें उच्चारून दाखविली व हिंदुस्थानच्या कल्याणाविषयींची आपली कळकळ रतिमात्र कमी होऊं दिली नाहीं त्या थोर व्हाइसरायसाहेबांच्या मनाची थोरवी तरी किती गावी? अशा वेळीं निराळ्या प्रकारचा एखादा पुरुष त्या थोर पदावर आरुढ असता तर दिसेंबरांत एकाव्यक्तीनें त्याच्या मुठभर साथीदारांच्या मदतीनें केलेल्या नीच कृत्याची निष्कृति भयंकर रक्तपातानें किंवा तशाच तऱ्हेच्या दुसऱ्या कांहीं कृतीनें करण्यांत आली असती. आणि तसें झालें तरी सुद्धां ती गोष्ट अपराधाची नीचता व दुष्टता लक्षांत घेतां कोणालाही अमानुष ह्मणतां आली नसती. पण व्हाइसराय लॉर्ड हार्डींज साहेबांच्या अंगची सदयता, न्यायबुद्धि, आणि दुःखिताविषयींची सहानुभूति या दैवी गुणांची श्रेष्ठता हिंदवासीय लोकांच्या मनावर आज जितकी जोरानें बिंबत आहे व तिच्या योगानें जें अदृष्ट पण हिंद व ब्रिटानिया या उभयतांच्या हिताचें महत्वाचें कार्य ईश्वरीसंकेतानें घडून येत आहे तें मग झालें नसतें. सुदैवानें तो अमंगल व अनिष्ट प्रकार टाळला व ईश्वरीसंकेतानुरूप व्हाइसराय साहेब व हिंदुस्थानचे प्रजाजन यांचीं मनें ज्या प्रेमसुत्रानें बद्ध झालीं आहेत तें प्रेमसुत्र दृढतर झालें हीच गोष्ट हिंदुस्थानांत सर्वत्र चाललेल्या आनंदोत्सवाच्या मुळाशीं आहे. या उत्सवाप्रीत्यर्थ अनेकांनीं लेडी हार्डिंजसाहेबांपाशीं द्रव्यराशि आणून दिल्या, व ज्यांना द्रव्यानुकूलता नव्हती, त्यांनीं धन्यवाद, आशीर्वाद, आणि आभारप्रदर्शन यांचे नजराणे त्यांना केले. ज्या उच्च व कृतज्ञ मनोवृत्तीनें प्रेरित होऊन ते करण्यांत आले व ज्या उदार आणि प्रेमळ मनोवृत्तीनें त्यांचा स्वीकार करण्यांत आला त्या दोन्हींचा मिलाफ असाच चिरकाल टिकून राहील व हाच मिलाफ हिंद व ब्रिटन या उभयतांच्या कल्याणास कारणीभूत होईल अशी आमची दृढ श्रद्धा आहे. हीच कृतज्ञताबुद्धी व हीच श्रद्धा आमच्याच नाहीं तर हिंदुस्थानांतल्या प्रत्येक जाणत्या पुरुषाच्या मनांत वागत आहे आणि सर्वत्र झालेले उत्सव हे उच्च भावनेचे व श्रद्धेचे बाह्योपचार किंवा प्रकाशनाचे निवळ प्रकार होत. अशा उत्सवाच्या प्रसंगीं हिंदुस्थानच्या लोकांच्या मनाची जी वास्तविक स्थिती आहे तिचें हें यत्किंचित शब्दचित्र आहे, पण खरोखर पाहतां आज लोकांच्या मनांत वागत असलेली राजनिष्ठा, कृतज्ञता, व परम पूज्य बादशाहा यांच्या प्रतिनिधीविषयीं व त्यांच्या उदारमनस्क पत्निविषयीं आदर हीं केवळ वर्णनातीत आहेत.

अपूर्व खानेसुमारी

किती केलें तरी अखेर ब्रिटीश गव्हर्नमेंट तें ब्रिटिश गव्हर्नमेंट आणि देशी संस्थानें तीं देशी संस्थानें ही गोष्ट तर खरीच, पण देशी संस्थानांचा कारभार करणारांच्या डोक्यांत प्रजाहिताचेच विचार सारखे घोळत असले व लोककल्याणाचे सद्यः कालानुरूप मार्ग त्यांना दिसत असले ह्मणजे नवीन प्रयोग करून त्यांचे अनुभव घेणें देशी संस्थानिकांना त्यांच्या राज्याच्या अल्पविस्तारामुळें व अधिकारबाहुल्यामुळें जितकें सोपें आहे तितकें खुद्द व्हाइसराय साहेबांना सुद्धां नाहीं. या मुळेंच सुधारलेल्या राष्ट्रांचें अनुकरण देशी संस्थानिकांना इच्छा असल्यास लवकर करतां येतें. म्हैसूर व त्रावणकोर संस्थानातले दसऱ्याच्या निमित्तानें भरणारे दरबार व लोक तंत्र शासन पद्धतीच्या धोरणावर चालणारीं कामें, मुफत शिक्षणाची टूम बडोदें सरकारनें काढलेला लायब्ऱ्यांची टूम, इंदूर संस्थाननें काढलेला अहिल्याश्रम, किंवा ग्वालेर संस्थानांत काढण्यांत येणारा केवळ स्त्रियांसाठीं [illegible]जायबखाना— यांच्याच जोडीला [illegible] फरीदकोट संस्थानानें काढलेली नव[illegible] सुमारीची पद्धत बसविली पाहिजे. ही सुमारी ह्मणजे नुसती शिरगणती नसून लोकांना नितीमान होण्याला लावणारी एक शाळाच ह्मटली पाहिजे. तेथील कारभाऱ्यांनीं नैतिक खानेसुमारीची एक अपूर्व पद्धत मोठ्या कल्पकतेनें बसविली आहे व वर्ष भराच्या अनुभवानें ती बरीच यशस्वीही ठरली आहे असें कळतें ही पद्धति ह्मणजे अशी की प्रत्येक गांवांतले ठळक ठळक महाजन व अधिकारी यांच्या पंचायती समोर गांवांतल्या प्रत्येक माणसाला आणून त्याचें त्याच्या आचरणानुरूप वर्गीकरण करावयाचें. तो उत्तम आचरणाचा आहे असें बहुमतानें पंचायतीनें ठरविल्यास त्याला पाहिल्या ह्मणजे नेकीकार या वर्गांत नोंदावयाचें. मध्यम प्रतीचें आचरण असल्यास सुलेहकार ह्मणजे शांति राखणारांच्या वर्गांत तो नोंदला जावयाचा, व समाजाला अनिष्ट असें वर्तन असल्यास त्याची गणना सिआकार ह्मणजे कनिष्ट वर्गांत व्हावयाची. सगळ्या पंचायती समोर आपल्या आचरणाची मिमांसा होऊन अखेर आपलें वर्तन कनिष्ट प्रकारचें ठरावें ही गोष्ट कोणालाही लज्जास्पद वाटणारच, आणि आपलें वर्तन सुधारावें अशी बुद्धि त्याला होणारच, या तत्वावर या खानेसुमारीची कल्पना बसविली आहे. सकृद्दर्शनीं ही पद्धत कल्पना सृष्टीतली दिसते. पण एक वर्षाच्या अनुभवानें असें आढळून आल्याचें त्या संस्थानच्या रिपोर्टांत ह्मटलें आहे कीं या पद्धतीमुळें पोलिसांचें काम हलकें झालें; कोर्टांतल्या कज्जांची संख्या कमी झाली, व गुन्हे कमी झाले. हें खरें असल्यास फारच अपूर्व ह्मटलें पाहिजे. तत्त्वज्ञान व प्रत्यक्ष व्यवहार यांची सांगड घालून देणाऱ्या या अपूर्व पद्धतीचा अनुभव इतर संस्थानिकांनीं ही अवश्य घेऊन पाहावा.

मोडी लिपीला मज्जाव !

मुंबई इलाख्यात ज्या ज्या ठिकाणीं मराठी भाषा न्यायमंदिरांतून चालते तेथें तेथें सगळा लेखन व्यवहार आज दोन तीन शतकें तरी मोडी लिपींत चालत आला आहे, पण गेल्या सालापासून मोडी लिपीला इंग्रज सरकारकडून मज्जाव होऊन हा सगळा व्यवहार बाळबोध लिपींत चालावा असा वटहुकुम सुटल्याचें समजतें. पूर्वीं मुसलमान बादशाही परभाषेची असतांही जी गोष्ट घडून आली नाहीं ती सुधारलेल्या इंग्रज सरकारकडून घडून यावी या बद्दल मराठी भाषेच्या हिताचिंतकास अतिशय दुःख वाटणे साहजिक आहे. मोडीलिपीविषयींचें लोकांचें निवळ अंधप्रेम येवढीच गोष्ट जर या वटहुकुमाविरुद्ध तक्रारीच्या मुळाशीं असती तरी सुद्धां हा मज्जाव होणें इष्ट नव्हतें. कारण राजकारणांत सुद्धां लोकांची आवडनिवड ही पुष्कळवेळां विचारांत घेण्याची गोष्ट असते. पण मोडीलिपीच्या पक्षाला केवळ लोकांचें प्रेम किंवा जुनी वहिवाट येवढीच एकटी गोष्ट नाहीं. तर दुसऱ्या ही पुष्कळ गोष्टी तिच्या वतीनें मांडण्यासारख्या आहेत. तिच्या इतकी जलद लिहितां येणारी व [illegible] दुसरी लिपि नाहीं ही गोष्ट नि-[illegible] कोर्टाच्या वेळेचा [illegible]ऱ्याशा [illegible] बाळबोधात व्यवहार सुरू करून पाहिला तेथला अनुभवही मोडीलिपीच्या प्रचाराला अनुकूळच आहे. रत्नागिरि जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनीं प्रथम हा अनुभव घेऊन पाहिला. पण बालबोध जलद लिहिण्याच्या आवेशांत त्या बालबोधीलाच एक प्रकारचें मोडीचें स्वरूप आल्याचें दिसून आलें. देशी संस्थानांतला अनुभव पाहिजे असल्यास इंदूर संस्थानाला विचारावें. तेथें बालबोध लिपि आज १० वर्षे प्रचारांत आहे. पण जलद लिहिलेली बालबोध लिपि मोडीपेक्षांही वाचण्यास जड जाते ही गोष्ट इंदुरच्या लोकांच्या प्रत्ययाला उत्तम प्रकारें आली आहे. असाच अनुभव इतरत्रही येणार. मोडी लिपींत अशी गैरसोय तर सरकारनें कोणती पाहिली तें कळत नाहीं. तिच्या वाचनाच्या कठीणपणामुळें एखादी गोष्ट चिटणिसांनीं भलत्या तऱ्हेनें जज्जाला समजाविली व त्यामुळें न कळत अन्याय घडला असें एखादें तरी उदाहरण घडलें आहे काय ? मोडीलिपि साहेब लोकांना वाचतां येत नाहीं ही अडचण या सर्क्युलराच्या मुळाशीं असेल अशी कित्येकांची समजूत होण्याचा संभव आहे. पण लोकांची अशी समजूत होऊं देणें ह्मणजे एका अधिकार नियुक्त व्यक्तीच्या सोयीसाठीं हजारो लोकांची गैरसोय करण्यास व आफिसाच्या कालाचा आणि द्रव्याचा अपव[illegible] करण्यास मागें घेत नाहीं असा आ[illegible] इंग्रज सरकारवर करणें आहे, आणि अ[illegible] आरोप करण्यास यत्किंचित्ही जा[illegible] इंग्रज अधिकारी देणार नाहींत अशी आम[illegible] खात्री आहे. मोडीलिपीच्या प्रचारा[illegible] मज्जाव करावा कीं नाहीं, ती लोकां[illegible] सोयीची किंवा गैरसोयीची आहे व[illegible] गोष्टी संबंधानें मत देण्याचा अधिक[illegible] वस्तुतः मराठी भाषा ज्यांची मातृभा[illegible] आहे अशांचा आहे. पण अशा कोणाकडू[illegible] मोडीलिपी बंद करण्या विषयींचा अर्ज स[illegible] कारकडे गेल्याचेंही कळलें नाहीं स[illegible] कारला मोडीलिपी बंद करण्यास असें कार[illegible] कोणतें झालें तें सरकारनें प्रेस नोटच्या द्वा[illegible] जाहिर करणें, त्यासंबंधाचीं लोकांच्या पुढ[illegible] ऱ्यांचा अभिप्राय विचारणें व नंतर विचार अंतीं ती गोष्ट निश्चित करणें हें सरकारल[illegible] युक्त आहे. ह्यासंबंधांत महाराष्ट्रसाहित्यपरिषदे मार्फत सरकारकडे एक अर्ज जावयाचा होत तो अद्याप कां गेला नाहीं तें कळत नाहीं. सातारच्या जिल्हा परिषदेनें या बाबतींत साहित्य परिषदेंत आघाडी मारली आहे. मुंबई इलाख्याचा हा संसर्ग अमच्या या प्रांताला न लागो ह्मणजे झालें.

सरकारी नौकर व मद्यपान निषेधक सभा.

सीलोनच्या सरकारानें आपल्या नोकरांस असा हुकुम फर्मावल्याचें जाहिर झालें आहे कीं त्यांच्यापैकीं कोणीही सरकारच्या परवानगीवांचून मद्यपाननिषेधक सभांशीं संबंध ठेवूं नये. ही बातमी खरी असल्यास हा हुकुम अविचाराचा आहे असें ह्मटल्यावांचून [illegible] लोकांमध्यें मद्यपानाचें व्यसन वाढावें व प्रजेच्या आरोग्याची नीतिमत्तेची आणि द्रव्याची हानी व्हावी अशी सरकारची बिलकुल इच्छा नाहीं. पण अबकारीचें उत्पन्न बुडेल या भीतीनें मद्यपाननिषेधक सभेच्या मागण्या सरकारी अधिकारी कबूल करीत नाहींत असा अगोदरच सकारण ह्मणा, निष्कारण ह्मणा, लोकांचा समज झाला आहे. तो सीलोन सरकारच्या या वट हुकुमानें दृढ होण्याचा संभव आहे. सरकारवरची जबाबदारी फार मोठी आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारा खर्च भागविण्यासाठीं उत्पन्न ही वाढतें पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. नवीन कर बसवीतां तर तिकडूनही लोक असंतुष्ट होणार त्यापेक्षां अबकारी सारख्या द्रव्यावर जबर कर ठेवलेला वाईट नाहीं, पण कमी कर ठेवून मादक द्रव्याचा प्रसार होऊं देणें मात्र योग्य नाहीं. सरकारला उत्पन्नच पाहिजे असेल तर परदेशी व देशी दारूवर हवा तेवढा जबर कर ठेवा, पण त्याचवेळीं मद्यपानाचा प्रसार कमी करणाऱ्या संस्थांना मदत करा. त्यांत जें भूषण आहे तें त्या संस्थांवर दोष दाखविण्यांत नाहीं. आह्माला खात्री आहे कीं शांतपणें विचार केल्यावर सीलोन सरकारला आपली चूक दिसून येईल व ते ती लवकरच दुरुस्त करतील.

अद्भुत शोध

ता. ६ मे रोजीं विलायतेंत रॉयल ...टरी इन्स्टिटयूटपुढें कर्नल डीन नांवाच्या ...ा शास्त्रज्ञाचें व्याख्यान झालें त्या ...ख्यानांत त्यांनीं मनुष्य दीर्घायु होण्याचा ... अद्भुत उपाय सांगितला. ते ह्मणाले ... प्राचीन काळीं मनुष्यसुद्धां चतुष्पाद ...ावरांसारखा दोन हात व दोन पाय ...मिनीला टेकून चालत असे. पण पुढें ...ला विक्षिप्तपणानें पछाडले व तो दोन ...यांवर उभा राहून चालूं लागला. त्यामुळें ...च्या उदरावर सगळा भार पडून त्याचें ...रोग्य बिघडलें, आणि त्याच्या शरीरमंदि...त रोगानें ठाणें दिलें. अजून जर तो ...र पायांवर चालण्याची संवय ठेवील तर ...र्वीप्रमाणें तो दीर्घायु होईल. या उपायानें ...ाच्या आयुष्यांत निदान वीस वर्षांची भर ...डेल असें या शोधकाचें ह्मणणें आहे. ...काळीं उठून स्नान केल्यावर कांहीं ...ाळ पर्यंत तरी चार पायांवर चालण्याचा ...यायाम करावा अशी त्याची शिफारस आहे ...ोणी कच्चीं फळें कच्या भाज्या, कच्चे ...ंद कच्चीं [न शिजविलेलीं] धान्यें खाऊन ...हण्याची शिफारस करतात, तर कोणी ...ालण्यांतही चतुष्पादांचें अनुकरण करण्याची ...शिफारस करतात. आतां आरोग्याच्या सब...ोवर नग्न राहण्याची, विवाहाची चाल ...ोडण्याची आणि पशुवत आचरण करण्याची ...शिफारस करणारा भेटण्याचा कायतो अव...काश आहे. वन्यपशूंच्या स्थितीला मनुष्य ...ोहोंचणें हा मनुष्याच्या जीविताचा आदर्श ...होऊं पाहणार आहे काय न कळे.

बंगाली लो...

रे० मि० ...ँडयूज यांनीं कविंरवींद्रनाथा संबंधानें व्हाइसराय साहेबांपुढें दिलेल्या व्याख्यानांत बंगाली लोकांविषयीं स्तुतिपर उद्गार काढलेले वाचून कित्येक आंग्लोइंडियन पत्र कर्त्यांना कसेसेंच वांटू लागलें आहे. या पत्रकर्त्यांची आह्मांला खरोखर कींव येते. पण करणार काय? जरी मेकॉले साहेबाच्या वेळेपासून तों कर्झनशाहीपर्यंत बंगाली लोकाविषयीं नालस्ती शिवाय दुसरें कांहीं ऐकूं येत नव्हतें, तरी आतां तो मनु पालटला आहे. अज्ञान, पूर्वग्रह, किंवा गैरसमजूती या अनंत काल पर्यंत टिकणें शक्य नाहीं. मेकॉले प्रभृति लेखकांनीं कांहीं ह्मटलें असले तरी रे० मि० अँडयूज, सर अॅ० म्याकडोनेल, ना० गोखले किंवा सर हेनरी कॉटन यांच्या सारख्यांनीं बंगाली लोकांनीं काढलेले स्वानुभवाचे उद्गार लोकांस पटल्यावांचून राहणार नाहींत. बंगाली लोक फार गरीब, अतिशय आदरातिथ्यशील, मनमिळाऊ, दयाळु बुद्धिमान, अंतःकरणाचे कोमल, प्रसंग विशेषीं, शूर आणि कल्पक व उद्योगी आहेत, या गोष्टींची साक्ष देण्यास हल्लींच्या काळांत शेंकडों देशी व विलायती गृहस्थपुढें येतील. शिवाय बंगाली लोकांच्या चालीरीति, त्यांचें वाङ्मय, त्यांचा प्रचलित इतिहास, व त्यांनीं चालविलेल्या संस्था याही खरी साक्ष देण्यास पुढें येतील. इतक्यांच्या साक्षीपुढें कोत्याबुद्धीच्या' व पूर्वग्रहदूषित मनाच्या लेखकांनीं केलेल्या नालस्तीची काय किंमत ठरणार आहे?

ब्रह्मी लोकांत जागृति.

लार्ड डफरिन साहेबांच्या कारकीर्दींत ब्रह्म देशचे राजे थीबो यांना पदभ्रष्ट करण्यांत येऊन तो देश हिंदुस्थानाला जोडण्यांत आला. तेव्हां पासून तिकडे हळूं हळूं शिक्षणाचा प्रसार सुरू झाला आहे. पण इंग्रजी शिक्षणरूपी वृक्षाला तिकडे लवकर फळें लागलेलीं दिसत आहेत. ब्रह्मदेशांत ब्रह्मी लोकांनीं चालविलेल्या शाळा, छापखाने व वर्तमानपत्रें यांची संख्या बरीच मोठी आहे. अलीकडे त्यांच्यांत सामाजिक सुधारणेची जागृति ही दिसूं लागली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. नुकतीच रंगून येथें ब्रह्मी लोकांची मोठी सभा त्यांच्यांतल्या अंत्यसंस्कारांत सुधारणा करण्याच्या उद्देशानें भरली होती. सभेंत काय ठराव झाला तें कळलें नाहीं. पण आपल्या अंत्य संस्कार पद्धतींत सुधारणा पाहिजे आहे व ती आपली आपणच केली पाहिजे ही जाणीव त्यांच्यांत उत्पन्न झालेली दिसत आहे हीच अगोदर अभिनंदनीय गोष्ट आहे. आमच्या हिंदु अंत्य संस्कार पद्धतींत काय थोडी सुधारणेला जागा आहे? नाना प्रकारचीं श्राद्धें व पिंडाचे प्रकार, व तीं करतांना उपासतापास, ऊन तहान, वेळीं अवेळीं जेवण व वारापावसांत थंड पाण्याचीं स्नानें इ० गोष्टीमुळें होणारे माणसाचे अवर्णनीय हाल या गोष्टी उघड्या डोळ्यांनीं दिसत असतां आमचे सुशिक्षित कसे डोळे झाकून ज...न्याचालींपुढें माना वाकवितात ह्मणजे इंग्र... एका ... ब्राह्मणमुलीला ... होत, ह्मणून तिच्या बापानें अ... पाठशाळेचे सेक्रेटरी मि० बनहट्टी करतांना त्रास पडला नाहीं व लोकांच्या जमिनी विकण्याचा प्रसंग फक्त पांचच जिल्ह्यांत आला. रयतवारी जमिनीवर नवीन वसाहती होत आहेत. बेतुल जिल्ह्यांत नवीन विहीरी खोदण्याचें काम चाललें आहे. या जिल्ह्यांतही नेमाड, चांदा, व बालाघाट या जिल्ह्यांप्रमाणें नवीन खोदलेल्या विहिरींचा लोकांना फार उपयोग झाला. या सुधारणांबरोबर सरकारी अधिकारी सेटलमेंटचें कामही करीत आहेत. पण सेटलमेंटच्या योगानें होणारी साऱ्याची वाढ लोकांना त्रासदायक किंवा डोईजड वाटत नाहीं, तोंपर्यंत तिच्या संबंधानें कुरकुर करणें वाजवी होणार नाहीं. एकंदरींत हा रेव्हेन्यु रिपोर्ट अत्यंत समाधानकारक आहे व लोकांना संतुष्ट ठेवून काम केल्या बद्दल रेव्हेन्यु खात्यांतील अधिकाऱ्यांचें अभिनंदन करणें आह्मी आपलें कर्तव्य समजतों.

रेव्हेन्यु खात्याचा कारभार.

मध्यप्रांताच्या गेल्यासालच्या रेव्हेन्यु खात्याच्या रिपोर्टांत अनेक गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या नमूद केलेल्या आहेत. वर्धा जिल्ह्यांत सरकारी अधिकाऱ्यांची सल्ला विचारण्याची व सरकारी अधिकाऱ्यांवर विश्वास टाकण्याची प्रवृत्ति लोकांत ज्यास्त दिसून आली ही आनंदाची गोष्ट तेथील मे० डेप्युटीकमिशनर साहेब यांनीं रिपोर्टांत दाखल केली आहे. प्लेगच्या बंदोबस्ताला पूर्वीं लोकांकडून अज्ञानामुळें वारंवार अडथळे होत असत. तसे आतां होत नाहींत ही दुसरी अभिनंदनीय गोष्ट आहे. तिसरी गोष्ट शेतकऱ्यांच्या गुरांना वेळीं औषधपाणी देण्यासाठीं सरकारानें जागजागीं व्हेटेरिनरी इस्पिताळें व दवाखाने काढले आहेत. त्यांचा फायदा इतके दिवस शेतकरी घेत नसत व त्यामुळें सरकारचा थोर उद्देश सिद्धिला जात नसे. पण आतां त्यांना सरकारच्या या उपकारकृत्याची खरी किंमत कळावयाला लागली आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक डिव्हिजनमध्यें वेळोवेळीं होणाऱ्या शेतकी परिषदांना लोक येऊं लागले आहेत, कोआपरे टिव्हक्रेडिट सोसायट्या ऊर्फ परस्पर सहायक मंडळ्या यांची वाढ होत आहे या सगळ्या गोष्टी अत्यंत समाधानकारक आहेत. सरकारी अधिकाऱ्यांना सारवसुली

उमरावती येथील टेक्निकल् इन्स्टिटयूट्.

या संस्थेसंबंधानें आह्मीं मागे एकदां एका लेखांत आमच्या वाचकांस माहिती दिलीच आहे. सुदैवानें सरकारचा व वऱ्हांडांतील लोकांचा दोघांचाही आश्रय या संस्थेस प्राप्त झालेला आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं वर्गणीद्वारा फंड उभारून या संस्थेस जरी चांगलीच मदत केली आहे तरी एवढ्यानें आपलें कर्तव्य संपलें असें त्यांनीं ... नये. या शाळेच्या आज... इतिहासावरून असें दिसून येतें ...शा तऱ्हेची उपयुक्त व सध्याचे ...त आपल्या देशास अत्यंत जरूरीची संस्था आपले प्रांतांत उपयुक्त कार्य करीत आहे ही गोष्ट वऱ्हाडांतील लोक एक तर विसरले असले पाहिजेत किंवा कोणतीही गोष्ट नेटानें पुढें चालविण्याची संवयच आपल्या लोकांस फारशी नसल्यामुळें या संस्थेविषयीं ते उदासीन असले पाहिजेत. शाळेंतील शिक्षणक्रम आतां व्यवस्थित रीतीनें ठरविला जाऊन तो अमलांत आणिला जात आहे; लायक व अनुभवी शिक्षकांची योजना झाली आहे, तात्विक व्यावहारिक [Theoretical & Practical] दोन्ही बाजूंनीं इंजिनिअरिंग या विषयाचें शिक्षण देण्यास अवश्य असणारी यंत्र सामुग्रीही शाळेच्या कारखान्यांत दरवर्षीं येत आहे, व या शाळेच्या शिक्षणक्रमांतून पार पडलेले विद्यार्थी नागपूर येथील बॉयलर ॲक्टच्या परिक्षेस बसून पास होत आहेत. या सर्व गोष्टी या शाळेच्या सूव्यवस्थितपणाची साक्ष देत आहेत. इतकें असून व आपल्या देशास धंदेशिक्षण हवें आहे, अशी योग्य ओरड चोहोंकडे चालली असून या शाळेचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पहावी तर फारच अल्प! हें कशाचें लक्षण समजावयाचें? उमरावती येथील टेकनिकल इन्स्टिटयूट मध्यें शिक्षण मोफत दिलें जातें इतकेंच नाहीं, तर लायक विद्यार्थ्यास स्कालरशिपाही देण्यांत येतात ही गोष्ट पुष्कळांना ठाऊक नाहीं असें दिसतें. आतां तरी वऱ्हाड व मध्यप्रांतांतील लोकांस आपल्या मुलांस इंजिनिअरिंगचें शिक्षण देण्यास बाहेर पाठविण्याची जरूर नाहीं. या गोष्टीचा लोक योग्य विचार करतील व आपल्या मुलांना या शाळेंत औद्योगिक शिक्षण घेण्यास पाठवितील अशी उमेद आहे. उमरावती टेक्निकल् इन्स्टिटयूटचा वर्षारंभ लवकरच आहे. तरी इंजिनिअरिंगचें शिक्षण मिळविण्यास इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं वेळ दवडूं नये. त्या इन्स्टिटयूटची जाहीरात या अकांत दुसरीकडे दिली आहे तिजकडे विद्यार्थ्यांनीं व त्यांच्या पालकांनीं अवश्य लक्ष्य पुरवावें अशी आमची आग्रहाची शिफारस आहे.

हिंदुस्थान आणि मिसर देश

एथिओपिया (अथवा नीग्रो लोकांचा देश), न्युबिया, व इजिप्त यांना आपले पूर्वज कालीतट ह्मणत. काली हे नांव नाइल नदीचें आहे. कालीतटावर देवांचा वास आहे अशी आपल्या पूर्वजांची समजूत असे, ग्रीक लोकांत सुद्धां हीच समजूत प्रचलित होती. आपल्या पुराणांतून वर्णिलेले देश अद्याप मिसर देशांत आहेत. उदा० बर्बर [बर्बरा], तप (थेबे) इ० पुराणोक्त जातींपैकीं पुलिंद, शार्मिक, व पल्ली या जाती अद्याप आहेत. पद्मपुराणांत अशी कथा आहे कीं या देशांत सत्यव्रत नांवाचा राजा होऊन गेला. त्याला जयपति, चर्म, व शर्म असे तीन पुत्र होते. पैकीं शर्म फिरत फिरत एकदां काली नदीच्या तिरावर आला. तेथें त्यानें रूपवती नगरी निर्माण केली. हिलाच पुढें प्राचीन ग्रीक इतिहासकारांनीं रपटा ह्मटलें आहे. या शर्मानेंच पद्मादेवीच्या पूजेसाठीं एक विशाल मंदीर निर्माण केलें. त्याला पद्मामठ (याचाच अपभ्रंश पिरामिड हा झाला) ह्मणत. शर्माच्या मागून पल्ली जातीचे लोक तिकडे गेले. स्कंद व पद्म पुराणांतही पल्ली जाति जंबुद्विपांतून शंखद्वीपांत (आफ्रिकेंत) गेल्याचें वर्णन आहे. राजपुतान्यांत हल्लीं पाली जात आहे. या प्रांतालाच पूर्वीं पल्लीस्थान असें नांव होतें. पल्लीजातीच्या लोकांनीं इकडून जातांना आपले बरोबर तिकडे चारीवेद नेले अशा विषयीं स्कंद व ब्रह्मपुराणांत उल्लेख आहेत. प्राचीन मिसर देशांतला अतिशय जुनाटग्रंथ ह्मणजे हर्मसचे ग्रंथ. याचेही चारच भाग असून त्यांची भाषा व विषय वेदाशीं फार जुळते आहेत.

बहु विवाहाचें अशास्त्रीयत्व.

चाळीस वर्षांपूर्वीं आपल्या शास्त्रग्रंथांनीं बहुविवाहपद्धतीला अनुमति दिली आहेकीं निषेध केला आहे याविषयीं बंगाल प्रांतांत शास्त्री लोकांत कडाक्याचा वाद चालला होता. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर निषेधपक्षाचे होते. ज्या एका श्लोकावर हा वाद चालला होता, तो श्लोक असा—

॥ सवर्णाग्रे द्विजातीनां प्रशस्ता दारकर्मणि ॥
॥ कामतस्तु प्रवृत्तानां इमां स्यु क्रमशो वराः ॥
॥ शूद्रैव भार्या शूद्राणां साच श्वाच विशःस्मृते ॥
।ते च श्वा क्षत्रियस्योक्तास्ताश्च स्वा ब्राह्मणा स्मृताः।

कित्येक या श्लोकाचा असा अर्थ करित कीं प्रथम स्वजातीय कन्येशीं विवाह करणें अवश्यक; नंतर

इंद्रिय तृप्तिसाठीं विवाहाची अवश्यकता असली तर स्वजातीय किंवा भिन्न जातीय कन्येशीं विवाह करावा. विद्यासागरांनीं या श्लोकाचा अर्थ केला तो असा— धर्माचरणार्थ स्वजातीय पत्नी अवश्यक, पण इंद्रियतृप्तीसाठीं विवाह करावयाचा तो स्वजातीय कन्येशीं करतां येत नाहीं. तो विजातीय स्त्रीशींच झाला पाहिजे. हा काम्यविवाह भिन्नजाती शिवाय शक्य नाहीं आणि ज्या अर्थीं भिन्नजाती विवाह कलियुगांत निषिद्ध आहे, त्या अर्थीं कलियुगांत बहुविवाह अशास्त्रीय ठरतो हें उघड आहे.

सुशिक्षितांचा चमत्कार.

हल्लींच्या काळाला जर चमत्कारयुग असें नांव दिलें तर हल्लींच्या पुण्याला चमत्कारक्षेत्र असें ह्मटलें पाहिजे. कारण ज्या गोष्टी इतर कोठें दिसत नाहींत त्या तेथें पाहण्यास सांपडतात. इकडे डिप्रेस्ड क्लासेस मिशनला प्रोत्साहन देऊन अंत्यज वर्गांतही ज्ञानाचा प्रसार व्हावा ह्मणून झटणारे पुण्यांत आहेत, आणि तिकडे युनिव्हर्सिटीची बी. ए. पदवी धारण करणारे आणि डेक्कन कॉलेजांत असिस्टंट प्रोफेसरचें काम केलेले चांगले सुशिक्षित, स्वतः म्लेच्छाची नोकरी करून वर्णाश्रमधर्माला लाथाडणारे ब्राह्मणाच्या मुलीला वर्णाश्रमधर्माच्या पांघरुणाखालीं वैद्यकीच्या परिक्षेला बसूंदेण्यास हरकत घेणारेही पुण्यांतच आहेत! हा चमत्कार नाहीं तर काय! पुण्यास एक संस्कृत पाठशाळा आहे. तींत दरसाल न्याय, व्याकरण, अलंकार, ज्योतिष, वैद्यक वगैरे विषयांत परीक्षा होत असतात, या पैकीं वैद्यकाच्या परीक्षेला यंदा एका कुलीन घराण्यांतल्या ब्राह्मणमुलीला बसावयाचें होतें, ह्मणून तिच्या बापानें अगोदर पाठशाळेचे सेक्रेटरी मि० बनहट्टी बी० ए० यांची परवानगी विचारली. परीक्षकांत कांहीं अगदीं जुन्या चालीचे वे० शा० सं० वासुदेवशास्त्री अभ्यंकरासारखे विद्वानशास्त्री होते. त्यांनीं परवानगी दिली. पण रा० बनहट्टी बी० ए० हे अगदीं आयतवेळीं वर्णाश्रमधर्माचें निमित्त हातीं धरून विरुद्ध गेले! पुरुषाइतकीच स्त्रियांनाही ज्ञानाची जरूरी येवढी साधी गोष्ट ज्यांना अद्याप कळूं लागली नाहीं असे रा० बनहट्टी सारखे मठ्ठ किंवा हट्टी लोक सुधारलेले इंग्रज सरकार विद्याखात्यांत कशाला ठेवते हेंच अह्मांस कळत नाहीं. अशा विद्वानांच्या हातून मनापासून आपल्या विद्यार्थ्यांना विद्यादान होण्याची शक्यता आह्मांला तरी दिसत नाहीं. अशा लोकांना ठेवावयाचेंच झालें तर त्यांच्यासाठीं योग्य जागा ह्मणजे पांजरपोळ ही आहे. तेथें त्यांना खुशाल ठेवावें.

पालीठाणा येथील जलप्रलय.

कोठेवाडांत मृगनक्षत्राच्या पहिल्या पर्जन्यानें अगदीं कहर करून सोडल्याच्या खबरा आल्या आहेत. पालीठाणा येथें या पर्जन्यानें नदीला महापूर येउन तिचें पाणी गांवांत शिरून दोन अडीच हजार घरांचा नाश होउन हजारों कुटुंबें निराश्रित झालीं व दोन अडीशचें प्राणांचीही हानि झाली. असें समजतें. पाण्याच्या प्रवाहामुळें घरें अंगावर कोसळून त्या खालीं कुटुंबेंचीं कुटुंबें गडप झाल्याचीं अत्यंत ह्रदयद्रावक वर्णनें वाचून अंगावर शहारे येतात! या पावसानें नुसत्या पालिठाण्यासच नाहीं तर भावनगर संस्थानांत कांहीं ठिकाणीं असेंच भयंकर नुकसान केल्याच्या हृदयखबरा येत आहेत. कांहीं ठिकाणीं एका रात्रींत बारा इंच, सतरा इंच व एका ठीकाणीं तर बावीस इंच पाऊस झाला असें सांगतात? दोन वर्षांपूर्वीं याच भागांत अनावृष्टी मुळें लोक दुष्काळांत अन्न अन्न करुन मेले. यंदा पर्जन्यकाळाच्या सुरवातीलाच महापुरानें हा असा नाश झाला? या अर्थांत सांपडून अनाथ झालेल्या माणसांच्या साह्यार्थ एक फंड उभारण्याची खटपट चालली आहे. पण जेथें परमेस्वरच त्यांच्यावर कोपला, तेथें मनुष्याचे त्यांना वाचविण्याचे प्रयत्न किती पंगु ठरणार? तथापि पंगु ह्मणून स्वस्थ बसून चालावयाचें नाहीं. यथाशक्ति आपल्या बंधुभागिनींचें संरक्षण हें केलेंच पाहिजे. तें करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. या कर्तव्याला जे जागतील त्यांना मोठें पुण्य लाभेल.

वऱ्हाडवृत्त.

हवामान—आद्रा नक्षत्रानें प्रारंभ फार उत्तम केला असून गेल्या शनिवार पासून पर्जन्याचें वातावरण उष्णकालाला कंटाळलेल्या सृष्टीचें रूप रमणीय व उल्लासप्रद बनवीत आहे. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

गेल्या शुक्रवारीं लॉर्ड हार्डिंज व्हाइसराय यांचा वाढदिवस सर्वत्र आनंदोत्सवांनीं परिप्लुत होता; आणि त्या थोर, उदारचरित, व कल्याणदृष्टी सद्गृहस्थाची पूर्ण ओळख आबालवृद्धांस फार नामी तऱ्हेने झाली आहे. येथील जुबिली पार्कमधील हा महोत्सव फार आनंदप्रद झाला. बाल व तरुण विद्यार्थी आपल्या आनंदाच्या बागडण्यानें व खेळण्यानें सर्व लहानथोर मंडळीस आनंदवीत होते आणि मेवामिठाई, बक्षीसें वगैरे श्री. सौ. करक्ह्याम ब यांच्या हातून घेतांना त्यांनीं मोठा जयज कार केला आणि रा. रा. अनंत विष खरे यांच्या समयोचित संभाषणाचा प्रति ध्वनी ह्मणून धन्यवादांच्या टाळ्याचा ग एकसारखा चालूं होता.

रा. रा. बइलसन असि. कमि. यांनं यवतमाळच्या डिपुटी कमिशनरीचा चा घेतला आहे.

मेजर प्लौडन साहेब डिपुटी कमिश हे रजेवरून परत गेल्या गुरुवारीं आले.

रा. रा. महमदहादी साहेब मुनसफ आकोल यांस सबर्डिनेट जज्जाची बढती मिळून त्यां खांडव्यास बदलण्यांत आलें. हे गृहस्थ स्वभावानें सरळ व मनमिळाऊ असून कायद्यां चांगले पंडित आहेत.

क्याप्टन फौलर साहेब हे येथील सिव्हिलस र्जनच्या जागीं रजेवरून परत येणा असल्या विषयीं बातमी आहे.

कापूस- तक्ता- साप्ताहिक- १४ जुन १९१३ पर्यंत

जिल्हा.	वर्ष	काटन सांगली, आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता. १४।६।१३ पर्यंतचा आठवडा	१।१०।१२ पासून	रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. १४।६।१३ पर्यंतचा आठवडा	१।१०।१२ पासून	गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. — ता० १४।६।१३ पर्यंतचा आठवडा	ता. १।१०।१२ पा आज तागाईत
उमरावती	चालूं साल	१२८	१६७३४८	३४७	२३,५०८	२,३९०	१८०,४५०
	गुदस्त	३	२४५३९१	५१	२७,७३७	....	.
	तिगस्त	८४	११०९७१	६४	१३२४०	....	
यवतमाळ	चालूं साल	....	१३३२१६	२४	३०,८१५	१९०	८६,७२०
	गुदस्त	....	१४१४९६	....	११,९३०	....	....
	तिगस्त	१	४०,३४३	८	१३,५६०	....	....
आकोला	चालूं साल	६७	१५७०२६	७०८	५००८३	१६४१	१८६३३८
	गुदस्त	९	१८१८७१	२४०	५१८४०	....	....
	तिगस्त	८७	१०१५७०	३०६	२६३५२	....	....
बुलढाणा	चालुं साल	....	९६,६४१	....	११,२९५	४९०	१३१४८६
	गुदस्त	....	१२०९६९	१	९३६३	....	....
	तिगस्त	....	१ ९२०३	....	७,१२५	....	....
एकूण वऱ्हाड	चालू साल	१९५	५५४२३१	१,०७९	१०५७०१	४,७११	५८[illegible]
	गुदस्त	१२	६८९७२७	३००	१००८७०	....	
	तिगस्त	१७२	३७२०८७	३७०	६०,२७७	....	

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १५ जून १९१२ व

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
२२ ३५

ध्यानी ...या सारखी
स्थावर जमीनीसंबंधाचे तंटे
जंगम माल
...व्यांची संख्या
आहे. द व्याच्या
सी. णी संबधानें जुडिशियल कमीशनर
डायरेक्टर ...चा असा अभिप्राय आहे कीं जेव्हां
हां नवीन जमाबंदी सुरू होते तेव्हां तेव्हां
नव्या जमाबंदीच्या भागांत स्थावरा संबंधीचे

अमूल्य संधी ! अप्रतीम नासिक चूर्ण !! अमुल्य रत्न.

टि. सि. .

सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकाच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. आलिकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि एतद्देशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.

मस्तकशूल, ज्ञानतंतूची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानसिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशा प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे लोक प्रिय सुगंधी तपकीर केवल एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभरित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
' डझन डबीस २–६–० " " " ०–६–०

(सुचना) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव ... पकीरीची किंमत लिहुन कळविलें असतां वरील किंमती ... ध्या दरम्यान एक ... किंवा तसें न केल्यास अडिचरुपयांस ... पर्यंत पैसा ठेविला जाईल ... रानीं इंग्रजींत अथवा बालबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून अथवा ... लिहावे.

स्वतः तयार करणारें :— टि० सी० नागलिंगप्पा आणी कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० १० पार्क टाऊन पोष्ट' मद्रास

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाण:—

गुरुबसवा आणि कंपनी,
नो. नं. ११ सावकार पेठ, मद्रास

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा

डॉ० वामन गोपाळ यांचा आयोडाईज्ड सार्सापरिला.

हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधात "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधें रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १२

Oriental Government security LIFE ASSURANCE COMPANy Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceasr of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 13

जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.

शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन वेळ च्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवस धार० हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ब जारभा० श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे मुंबई चैकशी करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं आकोला २१- सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून ह्यिची किंमत नो० नं० २ ...रच माफक ठेविली आहे.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या बऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७] आकोला-- सोमवार तारीख ३० माहे जून सन १९१३ इ० [अंक २५

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास कर[illegible].

चें वास्तव्य

एका चिपची [illegible] २६$\frac{२}{३}$ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें (मंदिराचें) काम बांधण्याचे सुरू आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामी संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल कर्ते नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात ह्मणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी.

व्यवस्थापक
रामचंद्र कृष्णाजी पाटील
नो० नं० ३

वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां **डोळे तपासून** सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ४ आकोला

अपूर्व लाभ! अपूर्व संधी!! अपूर्व संधी!!!

उत्तम कलप.

—:*:*:—

जर तुह्माला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहीत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखें मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे. एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त ह्मणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे.

ट. ह. निराळा

प्रेम संदेश

(डिहार्डिंज यांचे आनंदोद्गार)

[illegible]र्डिंज हे आपल्या विनयानें, सहि[illegible] उदार चरितानें हिंदी लोकांस [illegible] व पूज्य झाले आहेत. हिंदी [illegible] ते कल्पवृक्षा प्रमाणें वाटतात.

अजब करामत.

बालक्षुधा निवारण- लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हौसेनें घेतात. किं० १ तो० ८२ आणे.

हेमसुधा- धपणी हा रोग पुष्कळ स्त्रियांना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

कामधेनुगुटिका- अलीकडील निरानिराळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ८६ आणे.

जानकीबाई रानडे नर्स अॅण्ड मिड्वाईफ. } सांगली,
नो० नं० ६

रामबाण उपाय.

रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे.

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पासून त्वचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त [illegible] सह ॥=सर्व पत्र [illegible] त्या संबंधानें त्याचा सर्वत्र गौरव करण्यांत येतो. न्याय खात्याचें मुख्य ब्रीद ह्मणजे न्याय चांगला लवकर व स्वस्त हें होय. या दृष्टीनें पाहतां न्याय खात्यांत चांगल्या चांगल्या कायदे पंडितांची बढती होऊं लागल्यापासून न्याय कोर्टाचे निर्णय लोकांस अधिकाधिक मान्य होत चालले आहेत. न्यायाची कामगिरी

शास्त्रोक्त वशीकरणयंत्र

इसे सीधी भुजामें बांधकर जिस किसी स्त्रीपुरूषसे प्रीति करोगे तो वही आपके वशमें होगा दक्षिणा ।॥ पौकिंग डा० म० जुदा पत्र हिन्दी अँग्रेजीमें देना. डोडूवाला चमत्कारी कार्यालय जलेसर जिली एटा

नों. नंबर ८

अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः- श्री गजानन, दत्तात्रय, मारुती, शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोट पेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु. १८६

सर्वत्र एजंटस् पाहिजेत

पताः- बेंद्रे आणि कंपनी पुणे सिटी
नो० नं० ९

नोटीस

नोटीस बेशमी मारुती वा राघोजी वालटे रा० वाडेगांव ता० बाळापूर यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे घर मी जरूरी कामामुळें तुह्मास विकलें. आणि त्याबद्दल मी इसाराचा लेख लिहून दिला. त्याचे दुसरे दिवशीं रुपये माझे पदरांत घालण्याचा तुमचा करार होता. परंतु तुमचे कडून तसें न झाल्यानें माझे फार नुकसान झालें. तरी सदरहु नोटीस पावल्यापासून ८ दिवसांनें १ दाव्या झालेल्या नुकसानीची विशेष ध्यानांत ठेवण्या सारखी गोष्ट ही कीं स्थावर जमीनीसंबंधाचे तंटे वाढले असून जंगम माल [illegible] संबंधाच्या दाव्यांची संख्या [illegible] उतरली आहे. दाव्याच्या [illegible] चढउतरणी संबधानें जुडिशियल कमीशनर साहेबांचा असा अभिप्राय आहे कीं जेव्हां जेव्हां नवीन जमाबंदी सुरू होते तेव्हां तेव्हां नव्या जमाबंदीच्या भागांत स्थावरा संबंधीचे

संख्या ८९१

श्रीजगदगुरुशंकराचार्य दक्षिणाम्नाय शृंगेरीशाखा मठ श्रीशिवगंगा संस्थानं मुक्काम श्रीक्षेत्राशिवगंगा

मि. वै. शु. १३ शके १८३५ रोज रविवार

श्री शंकराचार्य श्री शृंगेरी

श्री शिवगंगा

शिक्का

श्री शंकराचार्य

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपद - वाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियमासनप्राणायाम-प्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठागरिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्याख्यानसिंहासनाधीश्वरसकलवेदार्थप्रकाशक सांख्यत्रयीप्रतिपालक सकलनिगमागमसारहृदय वैदिकमार्गप्रवर्तक सर्वतंत्रस्वतंत्रादिराजधानी श्रीमद्विद्यानगरमहाराजधानीकर्नाटकसिंहासनप्रतिष्ठापनाचार्य श्रीमद्राजाधिराजगुरुभूमंडलाचार्य तुंगभद्रातीरवास ऋष्यशृंगपुरवराधीश्वर श्रीशृंगेरि श्रीमद्विद्याशंकरपादपद्माराधक श्रीशृंगेरि श्रीशिवगंगा श्रीगंगाधरभारती स्वामिनां करकमलसंजात श्रीशृंगेरी श्रीशिवगंगा श्रीसुब्रह्मण्याभिनवसच्चिदानन्दभारतीस्वामिभिः

अस्मदत्यन्तप्रियमुख्याशिष्य रा॥ रा॥ देविराम कोंडजी शिवचरण डिस्टिक्ट नाझर पेनशनर, सुभेदार सखाराम राजाराम काळे व भिमसेन लक्ष्मण जरांडे मास्तर रा॥ आकोला' प्रांत वऱ्हाड यांस.

विषये श्रीनारायणस्मरणपूर्वकविरचिताशिषः समुल्लसन्तुतरां ओसतुहिमाचलप्रसिद्धात्रभवत्श्रीमच्छंकरभगवत्पादपूज्यपीठविषयिणी भक्तिरनवधिकश्रेयोनिदानमितिसार्वजनीनमेतत्सांप्रतम्

या पीठाचा संचार आकोला प्रांत वऱ्हाड येथें झाला असतां तेथील राजेश्वर नारायण गदाधर वगैरे आठ ब्राह्मणांनीं बेडर प्रकरणामध्यें श्रीसंकेश्वर व करवीर स्वामींनीं दिलेला निर्णय- न्यायविरुद्ध आहे ह्मणून श्री शृंगेरीपीठाचा निर्णय मिळविण्यांकरितां अर्ज केला होता, परंतु त्याचे सब एजंट रा. रा. वामन बाळकृष्ण यांनीं चौकशी बरोबर केली नाहीं, या पीठानें चौकशी करुन निर्णय द्यावा ह्मणून तारेनें श्री शृंगेरीची अनुज्ञा मिळवून आमचेकडे विनंति अर्ज केला त्यावरून आह्मीं श्री शृंगेरीची संमति तारेनें विच्यारून उभय पक्षास बोलावून चौकशीस आरंभ केला.

चौकशींत वादी राजेश्वर वगैरे मंडळी, प्रतिवादी देविराम वगैरे मंडळी हे नीच जातीचे आहेत, अस्पृश्य आहेत असा केवळ लोकप्रवाद आहे ह्मणून दाखवीत [illegible] नांवें लि- [illegible] व दु- [illegible] श्वासोच्छ्वास ह्मणजे [illegible] व्यवहार होत, तिच्या आवाजांत धातूचा नाद घुमता असतो आणि तिच्या लोभी दृष्टींत इतके जालिम विष आहे कीं जीं राष्ट्रें तिच्या सुंदरतेला भुलतात तीं रसातळास पोंचतात. सर्व सृष्टीला नष्ट व भस्म करणाऱ्या तीन ज्वालाग्नि ती आपल्या हा-

आकोल्यामध्यें या विवादाचे पूर्वी प्रतिवादीचे घरांत धर्मकार्यामध्यें जात होते व त्यांस आपले घरीं बोलावीत होते ह्मणून स्पष्ट दिसून आलें आहे. वादीमंडळीनीं केवळ आपस्वार्थीपणानें व द्वेषबुद्धीनें प्रतिवादीची मानच्युति व्हावी ह्मणून या विवादास आरंभ केला आहे. असें दिसून आल्यावरून त्यांचा अर्ज या पीठानें नामंजूर केला आहे.

चौकशीचे वेळीं वादी पक्षास आपलें समर्थन बरोबर करतां आलें नाहीं व आपली तक्रार बरोबर मांडतां आली नाहीं इतकेंच कारण चौकशी बंद करून वादीचा अर्ज नामंजूर करण्यास पुरें झालें असतें. परंतु धर्मबुद्धीचाही विचार करणें पीठास योग्य दिसलें. कमजोर पक्षाची सर्व बाजूंनीं पूर्तता न्यायासनानेंच केली पाहिजे या तत्वास अनुसरून जितक्या सवलती देण्यासारख्या वाटल्या तितक्या सर्व वादी पक्षास देऊन संस्थानतर्फेही प्रश्न करून खुलासा काढून घेण्याचा प्रयत्न झाला, परंतु त्याचें यत्किंचित्ही दिग्दर्शन झालें नाहीं, ही खेदाची गोष्ट नमूद करणें मोठें कष्टावह झालें आहे.

प्रतिवादी देविराम वगैरे मंडळीनीं हजर केलेली तोंडी पुरावा, कागदपत्र व श्री संकेश्वर व करवीर मठांनीं दिलेले निर्णय पाहिले ह्मणजे प्रतिवादीचे वाडवडील मूळचे खानदेशांतील मराठे कुणबी असून हल्लीं आकोला, उमरावती, मालेगांव वगैरे ठिकाणीं असलेले प्रतिवादीच्या जातीचे बेडर ह्मणविणारे जे लोक आहेत तेही मराठे कुणबी आहेत असें ह्मणावयास काहीं अभ्यंतर नाहीं. प्रतिवादीतर्फे वादीपक्षाच्या सांगण्यांतील विरोध व आपल्या पक्षास अनुकूल अशा पुष्कळ गोष्टी त्यांच्याच तोंडून मोठ्या खुबीनें वदविल्या आहेत व आपल्या समर्थनांत त्याचें विवेचन फार समाधानकारक करण्यांत आले आहे त्याबद्दल त्यास या पीठाकरून धन्यवाद देण्यांत येत आहे.

वरील सर्व विवेचनावरून श्री संकेश्वर व करवीर मठांनीं दिलेले निर्णय पूर्ण खात्रीपूर्वक चौकशी करून केले आहेत असें दिसतें व ते निर्णय सर्वत्र आचरणांत आलें असून त्यास इतर प्रांतांतील मंडळीनीं कोणताही आक्षेप न काढतां सर्वत्रांनीं मान्य केले आहेत. असें असतां आकोला येथीलच कांहीं ब्राह्मण मंडळीनीं केवळ द्वेषबुद्धीनें केलेला आक्षेप न्याय्य नाहीं. सबब श्रीसंकेश्वर व करवीर मठाचे निर्णयासच आह्मी पूर्ण संमत होऊन प्रतिवादी देविराम वगैरे यांच्या जातीच्या लोकांचे घरीं मराठे कुणब्यांप्रमाणें धर्मकृत्यें ब्रह्मवृंदांनीं चालविण्यास हरकत नाहीं ह्मणून श्रीशृंगेरी पिठाचे प्रतिनिधि या नात्यानें आह्मीं आज्ञा दिली आहे ती श्रीशृंगेरी [illegible] सिवनें कायम ठेविली पाहिजे ह्मणून हें प्रकरण [illegible] नारायणस्मृतिः

आकोला म्युनिसिपालिटी

अथवा स्थानिक स्वराज्य संस्था

आजकाल सरकारचें धोरण व आकांक्षा ह्यांना निराळेंच वळण लागलें आहे. शिक्षणाचा फैलाव जास्त होत जाऊन शिक्षित जनसमूहाच्या, राजकीय सामाजिक वगैरे बाबींतील महत्वाकांक्षांना योग्य तें वळण देऊन त्यांना स्वराज्याचे अधिकार हळूं हळूं द्यावेत व अशा रीतीनें आपल्यावर असलेली राज्यकारभाराची जबाबदारी हिंदी लोकांस द्यावी अशा तऱ्हेचे प्रयत्न सरकार करीत आहे. कायदे कौंसिलांतील प्रातिनिधिक संख्या १९०९ ते सरकारनें वाढविली हा एक त्या [illegible] महत्वाचा भाग आहे ह्यावरून हें सिद्ध झाल्या सारखेंच आहे. कीं प्रजेमध्यें आपल्या अधिकाराची व हक्कांची योग्य अम्मल बजावणी करण्याची व कर्तव्याची जाणीव ही उत्पन्न झाली आहे.

हे हक्क व अधिकार कसे अंमलांत आणावे व आपल्यावरचीं जनहितासंबंधीचीं जबाबदारीचीं कामें कशीं करावी ह्याचा ओनामा शिकविण्याकरतां ह्मणूनच लोकलबोर्ड, म्युनिसिपालट्या वगैरे सारख्या राजकीय स्वरूपाच्या परंतु अल्प प्रमाणांत असलेल्या संस्थांचें चालकत्व स्थानिक प्रतिनिधीस देण्यांत आलें. अर्थात् सरकारनें अशा संस्थामध्ये विशिष्ट स्वरूपाचा अधिकार आपल्या हातीं ठेवणें हें अगदीं रास्त आहे. कारण आपले हक्क व अधिकार माहित नसणाऱ्यांच्या हातीं कदाचित् दिलेल्या सत्तेचा दुरुपयोग होण्याचा ही संभव असतो अशा वेळीं वरील विशिष्ट अधिकारामुळें त्याला योग्य वळण देतां येतें.

वर सांगितलेंच आहे कीं म्युनिसिपालिटी सारख्या संस्था उत्पन्न करण्यांत सरकारचा उद्देश लोकांना राजकीय स्वरूपाच्या कामाची माहिती करून देणें हा तर असतोच व शिवाय सरकारलाही साधारण महत्वाच्या कामांत आपला वेळ फुकट घालवावा लागत नाहीं. अशा संस्थांनीं करावयाचीं कामें ह्मटलीं ह्मणजे तीं खालील सदराखालीं येतात. १ शहरचें आरोग्य. ह्यांत पाण्याची व्यवस्था, मैल्याची व्यवस्था, जन्म मृत्यू संख्येचा अहवाल, रोगराईचें निवारण इत्यादि विषयांचा समावेश होतो.

२ रस्त्यांची व्यवस्था ह्यांत रस्त्यांची दुरुस्ती, सफाई, नवे रस्ते बनविणें रहदारीच्या मार्गांवर पाणी शिंपडणें इत्यादि गोष्टींचा विचार केला पाहिजे.

३ शहरांत रात्रीच्या वेळीं प्रकाशाची व्यवस्था.

४ व्यापार ह्या खालीं. साप्ताहिक बाजार भरण्याच्या जागा, बाहेरून धान्य अगर इतर माल आणणाऱ्या गाड्यांची व्यवस्था इत्यादि गोष्टी येतात.

[illegible] कांहीं कांहीं लोकांनीं व्हाइस व त्यांत आणण्या अर्जा- मिळण्याचें दूरच राहो परंतु त्यांतील सूचनाही अमलांत आणण्याचें श्रेय व्हाइसचेअर साहेबांनीं घेतलें नाहीं. आपणच पाठविलेल्या प्रतिनिधीनीं आपल्या सूचनांचा विचार करूं नये व ज्या लोकांनीं त्यांना हे स्थानिक हितांचीं कामें कळकळीनें आणि उत्साहानें करतील असा विश्वास ठेवून, निवडले त्यांनीं आपल्या कळकळीचा व कर्तव्य निष्ठेचा मासला इतक्या लवकर दाखवावा ह्याचें राहून राहून आश्चर्य वाटतें.

राजकीय काय किंवा सामाजिक बाबींत काय, ज्यांनीं आपल्या शिरावर महत्वाचीं कामें घेतलीं आहेत, त्यांनीं केव्हांही व कशाही वेळीं कर्तव्य पराङ्मुख होतां कामा नये. लोकांनीं व अनुयायांनीं ठेवले त्या विश्वासाचा व जबाबदारीचा योग्य उपयोग तत्परतेनें व आस्थापूर्वक केला पाहिजे. तसें त्यांनीं न केलें तर ते लोकनिंदेस पात्र होऊन आपण अशा जबाबदारींचीं कामें करण्यास नालायक आहोंत, असा लोकांचा समज होईल व तो केव्हांही अनिष्ट आहे. कारण एक तर पुन्हां अशा लोकांस जबाबदारींचीं कामें सांगण्यास लोक कचरतील व ज्यांनीं लोकांच्याद्वारा आपल्याला हीं जनहिताचीं कामें करण्यास संधी दिली त्यांचाही असे लोक राजकीय हक्क उपभोगण्यास अजून योग्य नाहींत असें मत होईल.

वर लिहिलेंच आहे कीं ५।७ अर्ज व्हाइस चेअरमनसाहेबांकडे आजपर्यंत ह्या वर्षांत लोकांनीं पाठविले त्या अर्जांत विशेषें करून नदींतील पाण्याचा पुरवठा, मैल्याच्या गाड्या, शहर प्रकाशाची व्यवस्था, मुताऱ्यांची सफाई, रस्त्यांवर पाणी शिंपडणें, कोंडवाड्यासंबंधीं वगैरे गोष्टींत, जे काहीं लोकांच्या मनोवृत्तीस आणि आरोग्यास अगर दृष्टीस घातुक व किळसवाणें असे प्रकार दिसत असत व जे चालूं राहणें इष्ट नव्हतें. अशाचें वर्णन देऊन ते बंद करून योग्य ती सुधारणा अमलात आणण्या विषयीं लोकांनीं त्या अर्जांत विनंती रूपानें सूचना केल्या होत्या. अशा अर्जांत नमूद केलेल्या गोष्टी केव्हांकेव्हां प्रतिनिधींच्या पाहाण्यात न आल्या तर त्याबद्दलचें ज्ञान त्यांना नागरिकांनीं करून देणें हें अगदीं साहाजिक व मी ह्मणतों त्याचें कर्तव्य आहे असें असतां मेहेरबान व्हाईस चेअरमन साहेबांनीं अर्जास नुसतें उत्तेजनपर व आश्वासन युक्त पत्र पाठवून लोकांचा गौरव करण्यांवरच न थांबतां त्या सूचना ताबडतोब अमलात आणल्या पाहिजे होत्या. गौरव करणें हा एक शिष्टाचाराचा प्रकार आहे. परंतु तेवढ्यानेंच कर्तव्य मर्यादा संपत नाहीं. नागरिकांनी आपलें कर्तव्य केलें परंतु प्रतिनिधींनीं आपल्यावील बोजा अजून उतरला नाहीं असें दिसतें [illegible] वाढले लोकांनीं आतां व्हाईस चेअरमन [illegible] संबंधून आपल्या अर्जांचा विचार होत नाहीं असें पाहून चेअरमन मे. प्रैडन सा. डेप्युटी कमि. वरिष्ठ स्थानिक उच्च अधिकारी यांजकडे अर्ज पाठवून दाद मागण्याचा विचार केला व त्यामाणें एक अर्ज पाठविलाही व त्या अर्जाचें समाधानकारक उत्तर आलें आहे.

(लार्डहार्डिंज यांचे आनंदोद्गार)

लार्डहार्डिंज हे आपल्या विनयानें, सहिष्णुतेनें व उदार चरितानें हिंदी लोकांस अत्यंत वंद्य व पूज्य झाले आहेत. हिंदी लोकांस ते कल्पवृक्षा प्रमाणें वाटतात.

वरील एकंदर विवेचनावरून लक्षांत येईल कीं प्रातिनिधीक अधिकाराचा उपयोग योग्य करून घेतलेला दिसत नाहीं. ह्या बाबतींत सांगत व विस्तारानें हकीगत देण्याचें मुद्दामच टाळले आहे. ठोकळमानानें माहिती देऊन ह्यापुढें तरी हयगय व अनास्था न दाखवितां प्रतिनिधी व मे. व्हाइसचेअरमन यांनीं एक मतानें, अर्जाचा योग्य विचार करून, प्रकाशाची व्यवस्था, रस्त्यांची दुरुस्ती, मैला वाहून नेणाऱ्या गाड्यासंबंधीच्या तक्रारी तसेंच कसायाच्या संबंधीं कानावर आलेली ओरड आणि गुरांना कोंडवाड्यांत जबरदस्तीनें, आणून घालणाऱ्या लोकांस चांगली तंबी इत्यादी बाबींत ताबडतोब योग्य उपाय योजवेत व अशा रीतीनें आपणावरील जबाबदारी बजावून लोक मताची अवहेलना इतःपर करूं नये इतकीच विनंती करून आजचा लेख संपवितों.

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ वद्य ११ शके १८३५ प्रमादी

भावी स्थिती.

(कौऊंट टालस्टाय यांची दिव्यदृष्टी)

राजकीय भविष्याची एक संदेश पत्रिका आपल्या झार साहेबांकडे कौऊंट टालस्टाय यांनीं आपल्या मरणापूर्वी थोडे दिवस पाठविली होती. हें पत्र छत्रपती श्रीमंत झार साहेब यांनी जर्मनीचे चक्रवर्ती श्रीमंत केसर व तसेंच इंग्लंडचे श्रीमान बादशाहा यांच्याकडे पाठविलें होतें. हें रमणीय पत्र फार मौजेचें असून त्या मध्यें त्या विख्यात सत्पुरुषाचे तात्विक विचार भविष्यज्ञान यांचा समन्वय अत्यंत विलक्षण प्रकारचा दिसून येतो. त्या पत्राचा मराठींत अनुवाद असा होईलः —

" ज्या गोष्टी मी येथें स्फुट करीत आहे त्या सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत आणि त्या लवकरच घडून आल्या पाहिजेत. मनुष्याची भावी स्थिती समुद्राप्रमाणें अफाट दिसते; त्या समुद्रावर एक तरुणी मोहनी-प्रमाणें तरंगत आहे. सर्वत्र राष्ट्रें तिच्या मोहनीनें वेडावलेलीं असून तीं तिच्या मागें मरधांव फिरत आहेत पण ती मात्र प्रत्येक राष्ट्राला आपल्या हातांतल्या बाहुलीप्रमाणें खेळवीत आहे. तिच्या अंगावरील हिऱ्या-माणकांवर तिचें नांव ' व्यापारदेवी ' असें खोंदलेलें दिसतें. ती दिसतांना फार मोहक व भूरळ पाडणारी आहे पण जेथें जेथें तिचें वास्तव्य होतें तेथें तेथें नाश व दुःख याची इडापीडा होतात. तिचे श्वासोच्छ्वास म्हणजे सर्व पापमूलक लोभाचे व्यवहार होत, तिच्या आवाजांत धातूचा नाद घुमता असतो आणि तिच्या लोभी दृष्टींत इतके जालिम विष आहे कीं जीं राष्ट्रें तिच्या सुंदरतेला भुलतात तीं रसा-तळास पोंचतात. सर्व सृष्टीला नष्ट व भस्म करणाऱ्या तीन ज्वालाग्नि ती आपल्या हा-तांत उंचवर नाचवीत आहे. पहिली ज्वाला म्हणजे लढाई; दुसरी ज्वाला म्हणजे धर्मवेड व दांभिकपणा; आणि तिसरी ज्वाला म्हणजे राष्ट्राचा कायदा. या कायद्याच्या आधार घेऊन त्याच्या ढांसळणाऱ्या पायावर राष्ट्रीय सर्व बडेंडाव व गतकालीन गोष्टी उभार-लेल्या असतात. पहिल्या लढाईच्या ज्वाला १९१२ च्या सुमाराला युरोपांतील आग्नेय राष्ट्रांमध्यें भडकतील. हा अग्नि १९१३ त एवढा पेटेल कीं तो सर्वत्र प्रलय मांडील. माझ्या दृष्टीपुढें युरोपभर हा अग्नि पेटलेला दिसतो आणि रक्तस्त्राव चालूं आहेत; आणि भयंकर लढायाचे शोकध्वनि माझ्या कानावर आदळत आहेत. पण या रक्तपाताच्या नाटकात रंगभूमीवर १९१५ च्या सुमाराला एक अद्भुत पुरुष दत्त म्हणून उभा राहील. या पुरुषाला लढाईच्या विद्या फारशा अवगत नाहींत पण लेखनकलेत तो पटु असून बहुतेक युरोपाला आपल्या मगर मिठींत १९२५ पर्यंत घट्ट धरून ठेवील. तो या पूर्वीच पृथ्वीवर जन्मास आलेला आहे. तो मोठा व्यवहारचतुर आहे. त्या-च्याकडे एक देवकार्य सोंपविलेलें आहे.

हा काल म्हणजे जुन्या युरोपाच्या उत्क्रांतीचा संधि होय. यापुढें हल्लींचीं राष्ट्रें व राज्यें राहणार नाहींत तर जगा-तील राष्ट्रें मिळून एक सयुक्त संघसंस्था होणारी आहे.

१९२५ नंतर धर्मविषयक विचारांमध्यें निराळीच प्रगती माझ्या डोळ्यापुढें खेळत आहे. हल्लींचे धर्मपंथ लयास जातील आणि विद्यमान नैतिक कल्पना देखील ऱ्हासास पोंचतील. एक मोठी धर्मक्रांती सुरूं होईल. सर्व विश्वामध्यें परमेश्वर कोंदला आहे अशा वैष्णव धर्माची कोणशिला प्रस्थापित करण्यांत येईल. जीव, शिव, आत्मा, अमरत्व इत्यादि वर्तमान कल्पना निराळ्याच भट्टींमध्यें ओतल्या जाणार आहेत. आणि त्यापासून एका नव्या नैतिक मनूच्या शांत साम्राज्याच्या वाटा साफसूफ केल्या जातील. राजकीय व धार्मिक आंदोलनें इतकीं प्रबल माजलीं आहेत कीं सध्या सर्वच राष्ट्रांची अध्यात्म दृष्टी अगदीं चळली आहे, पण मला वाटतें कीं या चालू अनुभवांनीं राष्ट्रांची गती ज्ञानाच्या सोपानानें उच्च उच्च होत जाईल. पर्वताच्या उच्च शिखरावर सायंकाळी जसें सूर्यकिरण चम-कत चमकत अस्तास पोंचतात त्या प्रमाणें जगाच्या प्रस्तुत नाटकाचा अंतिम अंक माझ्या डोळ्यासमोर संपत संपत येत चालला आहे; आणि त्या मोहिनी व्यापारदेवीच्या एका हातवाऱ्या सरशी नव्या इतिहासाला प्रारंभ होईल "

वरील प्रतिभासंपन्न कौंटटालस्टाय यांच्या या काव्यांत किती तरी खोल अर्थ भरला आहे ! पाश्चात्य राष्ट्रापुढील सांप्रतच्या तुमुल कलहाची ही पुढील दिशाच होय.

प्रेम संदेश

(लार्डहार्डिंज यांचे आनंदोद्गार)

लार्डहार्डिंज हे आपल्या विनयानें, सहि-ष्णुतेनें व उदार चरितानें हिंदी लोकांस अत्यंत वंद्य व पूज्य झाले आहेत. हिंदी लोकांस ते कल्पवृक्षा प्रमाणें वाटतात. आपल्या राष्ट्राच्या महत्वाकांक्षा त्यांच्या कारकीर्दींत फलद्रूप होतील असा भरंवसा द्विगुणित होत चालला आहे; आणि म्हणू-नच त्या थोर स्तुपाचा २० जूनचा वाढदिवस सर्व राष्ट्रभर मोठ्या महोत्सवाच्या सणाप्रमाणें साजरा करण्यांत आला. या महोत्सवाच्या प्रसंगाची ओळख इंडियाच्या तरुण पिढीस बहुविध कारणांमुळें सदोदित राहील आणि या पुढील इतिहासांत दिवस सोनेरी अक्षरांनीं लिहिण्यांत येईल. वाढदिवसाचे महोत्सवा संबंधानें नामदार चीफ कमिशनर साहेबांकडे अलिशान नाम-दार व्हाइसराय साहेबांनीं एक खलिता धाडला आहे. ते लिहितात कीं:— आप-ल्या वाढदिवसाच्या प्रसंगाला अनुलक्षून वऱ्हाड व मध्यप्रांत या मधील शहरोश-हरीं व गांवोगांव विलक्षण आनंदाचे महो-त्सव उभारण्याच्या कामांत व ते सुंदरपणें सिद्धीस नेण्याच्या गोष्टींत ज्या सर्वजणांनीं परिश्रम घेतले त्या सर्वांचा मी मनापासून फार फार आभारी आहे. मला माहीत आहे कीं या बाबतींत पुष्कळच श्रम घ्यावे लागले आहेत आणि हे सर्व श्रम मोठ्या उत्साहानें व आनंदानें केलेले आहेत. या कार्याच्या मूळाशी जी अंतःकरणाची भक्ति व अभिनंदनाची इर्षा खेळत होती कीं पाहून माझ्या मनावर मोठाच परिणाम घडलेला आहे." हे आनंदोद्गार खऱ्या प्रेमाचे आहेत आणि ते त्या मुलखाचा हिंदी लोकांशी कसा एकजीव झाला आहे हें उत्कृष्ट प्रकारें व्यक्त करितात.

The Chief Commissioner has received from His Excellency the Viceroy a letter conveying his most sincere thanks to all thsoe who have laboured to organise and carry out so striking a manifestation as there was in the towns and villages of the Central Provinces and Berar on the occasion of his Birthday. His Excellency is aware that a vast amount of trouble has been taken in the matter and taken most willingly and cheerfully, and he is deeply sensible of the genuine loyalty and thankfulness that prompted this.

न्यायखातें

(१९१२ चा दिवाणी अदालतींचा रिपोर्ट)

सर हेनरी ड्रेक ब्रॉकमन हे न्याय खात्याचे मुख्य अधिकारी आहेत. आणि त्यांच्या अमलाखालीं हें खातें इतकें सुधरत चाललें आहे कीं त्याची गणना इतर प्रांतांच्या चांगल्या सुधारलेल्या अग्रणी न्याय खात्यामध्यें सहजी करण्यांत येईल. सर ड्रेक ब्रॉकमन हे स्वतः उत्तम न्यायाधीश आहेत इतकेंच नाहीं तर ते न्यायखात्याचे उत्कृष्ट कारभारीही आहेत. त्यांच्या या उत्कृष्ट कारभाराचें पारितोषक म्हणूनच त्यांस सर हा किताब हिंदुस्थान सरकाराकडून देण्यांत नुकताच आलेला आहे आणि त्या संबंधानें त्यांचा सर्वत्र गौरव करण्यांत येतो. न्याय खात्याचें मुख्य ब्रीद म्हणजे न्याय चांगला लवकर व स्वस्त हें होय. या दृष्टीनें पाहतां न्याय खात्यांत चांगल्या चांगल्या कायदे पंडितांची बदली होऊं लागल्यापासून न्याय कोर्टाचे निर्णय लोकांस अधिकाधिक मान्य होत चालले आहेत. न्यायाची कामगिरी सत्वर व्हावी हा जो दुसरा मुख्य उद्देश तोही सर हेनरी ड्रेक ब्राकमन यांच्या विशेष दक्षतेनें कसोशीनें व काम घेण्याच्या पद्धतीनें चांगला साधत चालला आहे. तिसरा हेतू म्हणजे न्याय कोर्टांतील खर्चाची बाब होय. या बाबतींत समाधानकारक अशी सुधारणा दिसून येत नाहीं.

इंग्रजी न्यायखात्यामध्यें जो दोष आहे तो या खर्चाच्या बाबी संबंधाचाच होय. सर-कारी अदालती पुढें हात जोडून उभें राहून न्याय विकत घेण्याची लालसा लोकां मध्यें जोंपर्यंत कमी होत नाहीं तोंपर्यंत या खर्चाच्या संबंधानें कांहीं तडजोड निघेल असा संभव दिसत नाहीं.

दिवाणी व फौजदारी अदालती संबंधानें एकंदर न्याय खात्याचा खर्च २९३९६३८ रुपये १९१२ सालीं होता आणि न्याय खात्याचें उत्पन्न २६२०७९० रुपये होते. या वरून पाहतां सरासरी ३। लक्ष रुपये स्थानिक सरकारास न्याय खात्यासंबंधानें वार्षिक खर्च पडतो असें दिसतें. दिवाणी अदालतीकडे एकंदर २३० अधिकारी असून त्यापैकीं २० युरोपियन व २१० इंडिअन आहेत. एकंदर न्यायाधिशांचीं वर्गवारी खालील प्रमाणें —

१	जुडीशीअल कमिशनर
२	ऑडीशनल जु० कमिशनर
४	डिव्हिजनल जज्येस
१६	डिस्ट्रक्ट जज्य
८	ऑडिशनल डि० जज्य
६०	सब जज्य
५	स्मालकाज कोर्ट जज्य
१	राजिस्ट्रार स्मा० कोर्ट जज्य
१३३	मुनसफ
२३०	

लोक वस्तीच्या मानानें पाहतां आम्हाला वाटलें होतें कीं कोर्टातून लढाई करण्या-च्या बाबतींत वऱ्हाडचा पहिला नंबर लागेल, पण वास्तवीक प्रकार तसा नाहीं. वऱ्हाडावरही नेमाड, नागपूर, वर्धा, हुशंगाबाद, सागर नरसिंगपूर, छिंदवाडा यांचीं स्थानें क्रमवा-रीनें फार पुढें आहेत. वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून १३९,१६३०८ लोक वस्ती आहे. या लोकवस्तीमध्यें गेल्यासालीं एकंदर १,००,०७६ दावे कोर्टांत दाखल करण्यांत आले. तेव्हां सरासरीनें १३९ लोकांमागें १ दावा असें प्रमाण पडतें. आणि वऱ्हाडांत हें प्रमाण १२३ पासून १३९ लोकांमागें १ दावा असें पडत आहे. नेमाडांत हेंच प्रमाण ९९ माणसां मागें १ दावा असें आहे. १९१२ सालचे दाव्यांचे आंकडे जवळजवळ १९०० साला एवढेच आहेत, पण १९११ सा-पेक्षां हे दावे सरासरीनें १५००० नें [illegible] आहेत. पण विशेष ध्यानांत ठेवण्या सारखी गोष्ट ही कीं स्थावर जमीनीसंबंधाचे तंटे वाढले असून जंगम माल [illegible] संबंधाच्या दाव्यांची संख्या [illegible] उतरली आहे. दाव्याच्या [illegible] चढउतरणी संबंधानें जुडिशियल कमीशनर साहेबांचा असा अभिप्राय आहे कीं जेव्हां जेव्हां नवीन जमाबंदी सुरू होते तेव्हां तेव्हां नव्या जमाबंदीच्या भागांत स्थावरा संबंधीचे

दावे वाढत्या प्रमाणावर दाखल होत असतात. ही गोष्ट नागपूर, सागर, व छिंदवाडा या जिल्ह्यांतील दाव्यांच्या वाढी वरून चांगली निष्पन्न होते. आणि बर्वा, रायपूर व बिलासपूर ह्या जिल्ह्याच्या नवीन जमाबंद्या होऊन गेल्या नंतर तिकडील स्थावराचे दावे आपोआप कमी होत चालले. आणखी दुसरा असाही अनुभव आहे कीं १९१२ साला सारखे आबादानीचें वर्ष येतें तेव्हां लोक आपापलें कर्ज वगैरे देऊन टाकतात. अर्थातच सावकार लोकांना न्याय कोर्टाची पायरी फारच कमी वेळा चढावी लागते. पण ही ही गोष्ट खरी आहे कीं आबादानीच्या वर्षी जिनगी सबंधानें लोक कसोशीनें भांडतात. व तेवढ्या त्या मानानें दाव्यांची संख्या आपोआप वाढते.

वऱ्हाड आणि मध्य प्रांत मिळून एकंदर ६० बॅरीस्टर ६८ अडव्होकेट व ४९४ वकील मिळून ६९२ कायदे पंडित वकीली करीत असतात. न्यायाधीश व वकील यांचा परस्पर संबंध चांगला समाधान कारक आहे. कांहीं कांहीं जिल्ह्याच्या सदर ठिकाणीं वकीलांची संख्या फार वाढली अशी ओरड आहे. पण त्याच्या उलट अशी पुष्कळ तहसीली चीं ठिकाणें आहेत कीं तेथें वकीलांची विशेष जरूर आहे. तेव्हां आह्माला असें वाटतें कीं नवीन सनदादेतांना ज्या ज्या भागाला वकीलांची जरुर आहे त्या त्या निर्दिष्ट भागाला वकीली करण्याची सनद देण्याची पद्धती मुंबई इलाख्या प्रमाणें आमच्याही प्रांतीं सुरु करण्यांत यावी.

सहकारी मंडळ

आमच्या प्रांतिक सरकारची दृष्टी सहकारी तत्वांकडे विशेष आहे. सहकारी मंडळें हींच त्यांस सुधारणेच्या मुख्य संस्था वाटतात. लोक समाजाला चालन देण्याची शक्ती या सहकारीमंडळामध्यें उत्पन्न होईल असा स्थानिक सरकारला जसा पूर्ण भरंवसा आहे. तसा आतां लोकांनाही अनुभवानें वाटूं लागला आहे. हा प्रांत विशेषेंकरून शेतकीचा आहे आणि ह्मणूनच इकडील सहकारी मंडळें व सरकारी शेतीखातें यांचा अन्योन्य संबंध फार निकट आहे. आणि या विचाराच्या बाजूनें पाहातां सहकारी मंडळें व शेतीखातें हीं दोन्हींही एकाच सुधारणेच्या दिशेनें आपला मार्ग क्रमीत आहेत. आणि दोन्ही बाजूंचा उद्योग परस्परांला परिपोषक होत आहे. सहकारी स्वाचें तत्व ही सुधारणेची ध्वजा आहे असे सर्व लोक कबूल करितात. आणि संहतीची संघ शक्ती ही हीं लोक निदर्शनास आंगल्या प्रकारें आलेली आहे. विचाराच्या तींत सहकारीपणाचा सर्वच अंगीकार करतात. पण कार्याच्या क्षेत्रांत त्या सहकारीतत्वाचा अवलंब करतांना पुष्कळशा गोष्टी अद्याप शिकावयाच्या आहेत. व्यक्तीचें जसें पृथक जीवन असतें तसेंच व्यक्ती व्यक्ती मिळून झालेल्या संस्थेचेंहि जीवन पृथक असते. जरी संस्थेचें जीवन व्यक्तीवर अवलंबून नसते तथापि तिची संकलित व संयुक्त जीवन क्रिया रासायनीक क्रियेप्रमाणें अगदीं भिन्न स्वरूपाची असते हें पदोपदीं अगदीं लक्षांत ठेविलं पाहिजे. ज्या ज्या गोष्टी व्यक्तिमात्राच्या हातून होत नाहींत. त्या त्या संघांच्या द्वारानें सहजी घडून येतात. आणि कोणतीही संस्था किंवा संघ हा एक अदृश्य पुरुषच उत्पन्न होतो. आणि पुरुष सूक्तातील पुरुषाप्रमाणें या काल्पनिक पुरुषाच्या अंगीं विलक्षण कार्यशक्ती उत्पन्न होतात. या कार्यशक्तींचा उपयोग करण्याची कला अद्याप आह्मांस शिकावयाची आहे आणि ह्मणूनच आपली दृष्टी आपल्या घरादारा पलिकडे किंवा स्वतः पलीकडे फारशी दूरवर जात नाहीं. व्यक्तीस्वार्तव्याचा काल जेव्हा जेव्हां पूर्णतेस येतो, तेव्हां तेव्हां सहकारी मंडळाचा काल उत्पन्न होतो असा अनुभव आहे. आणि या बाजूनें पाहतां लोकाची उद्योगक्षमता व सुधारणेच्छा ही लक्षांत घेऊनच आमच्या स्थानिक सरकारानें सहकारी मंडळें स्थापण्याचा उपक्रम १९०६ सालां पासून सुरुं केला आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्यामध्यें येथील शेतकी परिषदेच्या वेळीं नामदार रावर्टसन यांनीं सरकारी धोरण आपल्या भाषणांत व्यक्त केलें. व लोकांस सहकारी तत्वाचा उपदेश केला. ही सर्व घडामोड सहकारी तत्वावर सरकारचा जो दृढ विश्वास बसत चालला आहे त्याची साक्ष देते.

सहकारी संस्थाचा नुकताच गेल्या सात वर्षांचा प्रारंभ आहे. तथापि आज इतक्या वर्षांचा अनुभव नव्यानव्या आशा उत्पन्न करीत आहे आणि समाजातील मुख्यमुख्य लोकाच्या धूरीणपणाकडे बोट दाखवीत आहे. यापुढें जर सहकारी मंडळें आपलीं कार्ये करण्याला अपात्र ठरतील, तर तो दोष सरकारचा नसून हिंदी समाजात ब्राह्मण वर्गांत मोडणाऱ्या किंवा तितक्याच उच्च पदाला पोंचलेल्या लोकांचा दोष होय असें आह्मीं समजूं. जे लोक विद्येनें श्रीमंतीनें किंवा अधिकार भेदानें समाजाचे नेते आहेत, त्यांनीं या गोष्टी प्रचलित केल्या पाहिजेत इतकेंच नाहीं तर सर्व सहकारी चळवळीचें सामर्थ्य प्रस्तुत समयाला सर्व समाजाचें एकाचित्त होण्याकडे आहे. अकोला जिल्हा प्रथमतः सहकारी मंडळें स्थापन करण्याची पहिली कार्यभूमि ह्मणून निवडून घेतलेला आहे आणि येथील या मंडळाच्या इतिहासाकडे पाहून पुढें पाऊल टाकण्याचा सरकारी संकल्प आहे. १९०६ सालीं प्रथमतः १३ सहकारी मंडळें स्थापन केलीं. पण या सर्व संस्था पतपेढीच्या तत्वावर होत्या. जे लोक वर्गणी देतील, तेवढेच लोक या मंडळाचे सभासद होत असत.

आणि त्यांच्या संयुक्त भांडवलाचा उपयोग प्रत्येक मंडळाच्या सभासदास करता येत असे. पुढें १९०९ सालीं या संस्थांना फंड पुरविण्यासाठीं १ मध्यवर्ती नगर पेढी काढण्यांत आली. पूर्वीच्या १३ संस्थापैकीं देऊळगांवची पत पेढी बंद करण्यांत आली. मंगरूळ तालुक्यांतील गव्हा, पोघात व पेडगांव येथील पतपेढ्या मृतःप्रायच आहेत. तीच मरणासन्न स्थिती मुर्तिजापूर तालुक्यांतील शेवती व धनोरा येथील संस्थांची होय. बाळापूर तालुक्यांतील सस्ती येथील पतपेढीही अशाच डबघाईला आली आहे. सध्यां या सहा मंडळांत नवीन जीव तरी घातला पाहिजे किंवा हीं सहकारी दुकानें बंद केलीं पाहिजेत असा प्रकार आहे. या गोष्टी उद्वेगकारक वाटतील पण त्यांच्या या इह वृत्तांतानेंच जो धडा शिकविला त्यानें आतां चांगल्या भरभराटीस येणाऱ्या अशा ७७ संस्था स्थापन करण्याचा मार्ग घालून दिला. पूर्वीचा प्रयत्न इतस्ततः दूरवर पसरलेला होता पण आतांची दिशा तो अगदीं लहान मर्यादित क्षेत्रांत जोरानें चालविला आहे. एकट्या बाळापूर तालुक्यांतच सध्यां ५६ सहकारी मंडळें आहेत. पूर्वीच्या संस्था पतपेढीच्या तत्वांवर होत्या त्यें आतां नवीन मंडळांच्या भागिनदारांना पदरची कांहीं वर्गणी द्यावी लागत नाहीं. तर प्रत्येक मंडळाच्या ऐपती प्रमाणें मध्यवर्ती नगर पेढी त्यांस कर्ज देत. व त्या कर्जाचा विनियोग जुनें कर्ज फेडण्याकडे व शेताच्या कामाकडे करण्यांत येतो.

अकोल्याच्या नगर पेढीचें सध्या १७००० भांडवल अपून ९२००० लोकांच्या ठेवी आहेत. त्या शिवाय जबलपूर येथील प्रांतिक ब्यांकेनें ३५००० रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. या अकोल्याच्या पेढीला आणखी इतका पैसा पाहीजे आहे कीं लवकरच पुष्कळसे मोठें नवीन भांडवल उभारण्यांत येईल अशी आह्मांस उमेद आहे. रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. इ. ए. सी. अकोला यांजकडे या सहकारी मंडळाचा कारभार आहे. व तो त्यांचे हातीं इतका यशस्वी होत चालला आहे कीं सहकारी मंडलाचें जाळें अधिक फैलावत जाईल व त्यांतील लोक ऋणमुक्त होऊन कार्यक्षम, उद्योगशील व सुखी होतील असा पूर्ण भरंवसा वाटत चालला आहे. एक सुखवस्तु गृहस्थ किती पुष्कळ गोष्टी करुं शकतो हें पहावयाचें असल्यास पारस व गायगांव या दोन खेड्यांमध्यें अशा ११ संस्था आहेत. व त्यांचा सुयंत्र कारभार रा. रा. विष्णू गणेश कुळकर्णी गायगांव यांचे कडे बोट दाखवीत आहे. हें कळविण्यांस आनंद वाटतो.

वऱ्हाडवृत्त.

हवामान पर्जन्यानें अगदीं बहार करून सोडली आहे. एवढा पर्जन्याचा सुयोग पुष्कळ वर्षांनीं पहाण्यांत येत आहे. पेरणीची कामें झपाट्यानें सुरुं असून सृष्टीचा नवा हिरवा पेहराव डोळ्यांना मोठा आनंद देतो. एकंदर पाऊस ७॥ इंचापर्यंत होत आला. या पर्जन्यानें सार्वजनिक आरोग्याला ही चांगली मदत होत आहे.

रा. रा. **मणपत महादेव** पेढारकर यांस अकोला येथें मुनसफ कोर्टावर बदलल्या अन्वयें ते येथें येऊन दाखल झाले.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे ए. स. कमि. यांस आणखी १ वर्ष २० दिवसांची फर्लो रजा देण्यांत आली.

बेळगांवकर संगीत नाटक मंडळीनें गेल्या शनिवारीं तारक- मारक नाटकाचा प्रयोग करून दाखविला. राजश्री नेवाळकर यांचें हें नाटक अमून बोध व करमणूक यांचा सांगड उत्तम घातली आहे. ही मंडळी चांगली गुणी असून निवडक नाटकें करितात.

आकोला बाजारभाव

हुंडी दर्शनी			१००।॥
सोनें			२४८॥
चांदी			८०
जवारी नवी	८०	ते	८२
गहुं काठे	१०८		१०२॥
गहुं बनशी	११९		१२०
जवस	१२२		१२२॥
तेल			७॥।
सरकी			११८॥
तीळ	७।		७॥।
कापुस	९७		९८
रुई आकोला जीन			७८

जाहीर नोटीस.

खालीं सही करणार इजकडून जाहीर करण्यांत येते कीं गणपत वा जानराव पाटील राहणार आकोले हा कांहीं दिवसापूर्वी माझेकडे नोकर होता परंतु त्याची गैर वर्तणूक दिसून आल्यावरून मी त्यास नोकरी वरून दूर केले असून त्यास दिलेलीं सर्व मुखत्यारपत्रें रद्द केली आहेत सबब त्याच्याशी कोणी व्यवहार केल्यास मी जबाबदार नाहीं व तुमचे जवळ असलेली सर्व कागदपत्रें ४ दिवसांचें आंत आणून द्यावे तसें न केल्यास त्याबद्दल योग्य तजवीज करीन.

सही

उजालाबाई जवजे गोपालदास अगरवाले राहणार बार्शिटाकळी तर्फे मु० बळीराम भगवंत राहणार आकोले ता० २८-६-१९१३

नो० नं० २७

जाहिर नोटीस

धोंडो सखाराम परभू पेनशनर जती कारकून रा० वणी ता० वणी जि० यवतमाळ यास खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमी आमचे दुकानीं मुकत्यारीचें कामीं ९।१ वर्षं नवकर आहात त्यास हल्लीं तुमची आमची नाबनती आल्यामुळें तुमचें मुकत्यारपत्र रद्द केलें आहे. तरी आमचे तर्फे तुह्मी कोर्टात वगैरे हरयेक तऱ्हेचें काम करुं नये. आणि असामी वगैरे पासून वसूल घेऊं नये. आपला पगार पूर्वीच ह्मणजे चैत्र शु॥ १ संमत १९६९ पासून बंद केला आहे. याजबद्दल समक्ष आपणास कळविलेंच होतें. कळावें ता० २६ माहे जून सन १९१३ इ.

सही

गंगया लछपा कोमटी कोंडावार रा॥ वणी ता० वणी यांचे हातची नि॥ असे.

नो. नं. २८ दस्तुर बळीराम रावजी मु॥

नोटीस

रा० रा० लक्ष्मणदास भगवानदास साहू दुकान जळगांव जिल्हा बुलढाणा यांस —

खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं तुझाला मी पहिली नोटीस दिली. त्यानंतर तुझी मे० सिराजुद्दीन साहेब तहशीलदार यांच्या मध्यस्तीनें माझा २८० रुपये पोटगीचा ठराव करण्याचा खोटाच घाट घातला. तहशीलदार साहेबांचा निरोप झणून गफारमिया देशमुख व अफजलबेग यास माझ्याकडे पाठविलें आणि मे० तहसीलदारसोहबांकडे मी गेले, त्यांनीं माझ्या हातांत एक रुपया दिला व मी त्याचा स्टांप आणिला. व्यंकट प्रसाद अर्जनवीसाकडून तुझी माझ्या जवळून स्टांप मागवून घेतला. आणि माझ्या अपरोक्ष वाटेल तसा मजकूर लिहून घेतला. व्यंकटप्रसादनें तहशीलदारांचें नांव सांगून गर्दी केली व एकदम अगोदर सही घेतली. व कागद न वाचून दाखवितां तसा लागलीच त्यानें तो नेला. पुढें काय झालें तें मला माहीत नाहीं. ही गोष्ट ९ ५।१९१३ च्या सुमाराला घडली.

पुढें तुझी लबाडीनें माझी बेइज्जत करण्यासाठीं माझ्यावर खोटीच फिर्याद एका मुसलमानाकडून केली असून ती मे० सिराजुद्दीन साहेब यांच्याकडे चालूं केली आहे. या सर्व गोष्टी मी बारिष्टांच्या नजरे पुढें मांडणार आहे. आणि तुझी मला फसवून कागद करून घेतला या बद्दल मी तुझावर निराळी फौजदारी करणार आहे. तो कागद ८ दिवसांत माझ्या हवाली करून पावती घ्यावी. कळावें ता० २२।६।१९१३

सही

हीरा मर्द तुळशीराम अगरवाले द० खु०

नो० नं० ११

नोटीस

आमृता सुतार रा. पळसोद ता. आकोट व सुकदेव व किसन रा. रौंदळ ता. आकोट यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतेकीं माझा नवरा आत्माराम हा तुमचा नातेवाईक असोन त्याज बरोबर माझें लहानपणीच लग्न झालें आहे. मजला ऋतु प्राप्त झालेवर मी १ वर्ष त्याज पासी होते. परंतु नवऱ्यानी मजला बरोबर वागविले नाहीं. सबब चार पंचाचे सांगण्या वरून मी आपले आई बापाचे घरीं आले. मध्यंतरीं माझा नवरा तुमचे घरीं अला असे समजलेवरून मी आपले भावास घेऊन तुमचे घरीं आलें. परंतु तेथून माझा नवरा पळून गेला. सबब फिरून मी आपले बापाचे घरीं आलें. हल्लीं मी नवतरणी असून माझा संसार होत नाहीं. वरून आपणास नोटीशीनें कळवितें कीं नोटीस पावले दिवसा पासून १५ दिवसाचे आंत माझे नवऱ्याचा तपासलावून त्याचे वर्तना बद्दल चार संभावीत मनुष्याचा दाखला आणून व माझे खावटीची रकम माझे बापास देऊन घेऊन जाणे. तसें न झाले तर हीच माझी फारकत समजून मी रिती प्रमाणें दुसरा घरठाव करीन. मग पुढें तुमचे व माझे नवऱ्याचे काहींएक चालणार नाहीं. सबब बुध्याही नोटीस दिली आहे. कळावें ता. २१-६-१३ द. लक्ष्मण जयराम पि. रा. आकोले

सही

यशवदी मर्द आत्माराम सुतार

रा. उवर त. आकोट नि.

खु. बांगडी तर्फे मु. रामचंद्र

वा। श्रावण सुतार.

नो० नं० १२

नोटीस

नोटीस बेशमी पन्नालाल सालग्राम रा. पंचगव्हाण

यांस: —

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझांस ताबेगहाण तारिख २९ एप्रील १९११ सर्वे नंबर ११३ मौजे दहीगांव ता० आकोट जिल्हा आकोला रु० ७०० बद्दल दोन वर्षाच्या शर्तीनें लिहून दिलें आहे. त्या गहाणखताचे रुपये वर लिहीलेले कित्येक वेळां तुमचे कडेस आझी घेऊन आलो परंतु तुझी टाळमटोले करून घेतले नाहीं. ह्यामुळें अडगांव पोष्ट आफीस मधून तुला तीन ठिकाणीं रजीस्टर्ड नोटीस केलें त्यापैकीं दोन वापस होऊन एक पंचगव्हाण मुक्कामीं वामन भटाच्या सहीची रसीद मिळाली परंतु तुमच्या सहीची रसीद नाहीं. करितां आझांला वऱ्हाडसमाचार मधून नोटीस देणें भाग आलें आहे कीं तुझी आपले रुपये विठोबा सोनाजी रा० निंबोळी याजकडेस ठेवले आहे ते घेऊन जाणे अगर तुमी रुपये घेऊन गेला नाहीं तर त्याबद्दल आझी कोणत्याही प्रकारें कोर्टखर्चानीं व्याजानीं जबाबदार राहणार नाहीं. शिवाय दामचा या संबंधी जो कांहीं खर्च होईल तो तुझांस द्यावा लागेल. रजीस्टर नोटीस दिल्या तारखेपासून आझी व्याजाचेही संबंधी जबाबदार नाहीं कळावें ता० २०।६।१३

सही

पुंजाजी सखाराम पाटील रा०

अडगांव दस्तुर खुद

नो. नं. १३

नोटीस

नोटीस बेशमी शेख कबडू वा। गु मोहमद रा० आकोट धारुळी वेस

यांस: —

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी ३ एप्रील १९१ रोजीं ताबेगहाणखत लिहून घेतलें त्यांत महमद इस्माईल यांचे ४६२ रुपये देण्याचे कबुल केले परंतु अद्याप तुझी ते दिले नाहींत करितां तुमचे ताबेगहाण अपु आहे. आतां तुमचे असलेले रुपये पाउणें पांचशे तुझी घेऊन जावे व पावती द्यावी वरील ताबेगहाण रुपये हजार बद्दल असे. असे तुझी ८ दिवसांत न केल्यास तुझी महमद इस्माईलचे रुपये व्याजासुद्धां दिले नाहीं असें समजून वरील ताबेगहाण रद्द समजले जाईल ही नोटीस दिली ता० १९ जून १९१३ इ०

सही

इमामबेग वा। मिर्जा रुस्तुमबेग

रा० आकोट धारुळीवेस

नो. नं. १४

कापूस-- तक्ता- साप्ताहिक- २१ जुन १९१३ पर्यंत

जिल्हा.	वर्ष	काटन मार्केट — आयत — कापसाच्या गाड्यांची संख्या ता. २१।६।१३ पर्यंतचा आठवडा	काटन मार्केट — आयत — कापसाच्या गाड्यांची संख्या १।१०।१२ पासून	काटन मार्केट — आयत — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या ता. २१।६।१३ पर्यंतचा आठवडा	काटन मार्केट — आयत — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या १।१०।१२ पासून	गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. ता० २१।६।१३ पर्यंतचा आठवडा	गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. ता. १।१०।१२ पासून आज तागाईत
उमरावती	चालूं साल	८	१६७३९६	११३	२३,६२१	८२८	१८१,२७८
	गुदस्त	३	२४९३९४	८	२७,७४९	....	.
	तिगस्त	९	११०९८०	३४	१३२७४	....	
यवतमाळ	चालूं साल	....	१३३२१६	....	२०,८१९	....	८६,०७२
	गुदस्त	....	१४१४९६	....	११,९३०	....	....
	तिगस्त	....	४०,३४३	....	१३,५६०	....	....
आकोला	चालूं साल	६४	१९७०९०	५६२	५०६४५	१२९२	१८७७६६
	गुदस्त	३	१८१८७४	९७	५१९८	....	....
	तिगस्त	४१	१०१६११	२९८	२६६५०	....	....
बुलढाणा	चालूं साल	१४	९६,६५५	४३	११,३३८	७०७	१३२१९३
	गुदस्त	२	१२०९७१	६	९३६९	....	....
	तिगस्त	२१	११९२२४	१३३	७,२५८	....	....
एकूण वऱ्हाड	चालू साल	८६	५५४३१७	७१८	१०६४१९	२,८२७	५८७,३०९
	गुदस्त	८	६८९७३५	१११	१००९८२	....	....
	तिगस्त	७१	३७२१५८	४६५	६०,७४२	....	....

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ११ जून १९१३ व १४ जून

~~पत्रकें धाडणारे~~
~~मार्केट प्रेस~~
~~१८ २४~~

१३ डीसेंबर सी. बी. बीव्स.
डायरेक्टर आफ आग्रिकलचर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

अमूल्य संधी ! अप्रतीम नासिक चूर्ण !! अमुल्य रत्न

टि. सि. .

सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकाच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. आलिकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि एतद्देशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.

मस्तकशूल, ज्ञानतंतूची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानासिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशा प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे लोक प्रिय सुगंधी तपकीर केवल एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभरित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
' डझन डबीस २–६–० " " " ०–६–०

(सुचना) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत लिहुन कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील ' किंवा तसें न केल्यास अडिचरुपयांस पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणी कंपनी'
नं० २० सिंगण्णरोड.
नो० नं० १५ पार्क टाऊन पोष्ट' मद्रास

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास

नो. नं. १६

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा

डॉ० वामन गोपाळ यांचा
आयोडाईज्ड सार्सापरिला.

हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत " सर्वोत्तम " अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १७

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANy
Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

FUND Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceasr of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employinn portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 18

जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.

शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविली असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

हें पत्र अकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

नोटीस 30

नोटीस बेशमी अंबी मर्द परशराम धनगर रा० रिधोरें ता० बाळापूर जि० अकोला

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमला आमचे बापानें ठेविलें अमून आज सुमारें २५ वर्ष झाले असतील. त्या नंतर दि० मु० नं० २३-१८२२ यामध्यें तुझे हयाती पावेतों तुमला खाण्या करितां शेत मिळाले आहे त्यामध्यें तुमला गहाण किंवा खरेदी देण्यास मुळींच अधिकार नसून आमचे संमतीशिवाय मोतीलाल बनशीलाल साहु दुकान आकोला याजला तुझी गहाण लिहून देऊन शर्त लहानगहाणाची आहे असें आम्हास समजलें व सदरहु शेत त्या सावकाराचे ताब्यांतहो दिलें. तरी तुमला अधिकार कांही नसतां तूं तें शेत कसें दिलें? तरी तें शेत तूं त्या सावकारापासून काढून घेऊन आम्हास कागद १५ दिवसांत दाखवावा. नाहींतर योग्य कोर्टांत दावा करून कोर्टाचा खर्चही तुझास द्यावा लागेल ता० २४-६-१३

सही

मुकुंदराव जानजी व सिताराम जानजी रा० रिधोर पोष्ट आकोला ता० बाळापूर द० खु०

नो० नं० १९

नोटीस 31

नोटीस बेशमी खाजेजोरावर अल्लीखां वा॥ खाजेहनायत अल्लीखा जाहगीरदार तर्फे मुखत्यार शाबुदीन वा॥ गुलामी सौदागर मु० रा० पातूर शेखबाबू

यांस: —

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे देऊळगांव ता० बाळापूर येथील शेत सर्वे नं० ७८-१२३ व १५ असें तीन शेतें माझे ताब्यांत खरेदीखतावरून अमून ताबाही माझा आहे. दरसाल शेतसारा मी देत आलों. त्याप्रमाणें मी दरसालाप्रमाणें शेतसारा चावडीवर पाटील पटवारी यांचेकडेस घेऊन गेलों असतां त्यानीं घेतला नाहीं. करितां आपणांस कळविण्यांत येतें कीं, शेतसारा मी देण्यास राजी असून तुझी घेत नाहीं. त्याजबद्दल तुझी फिर्यादी वगैरे केल्यास त्याचे खर्चाचा जबाबदार मी नाहीं. मी आपला खर्च तुमचे जवळून भरून घेईन. ही नोटीस दिली ता० २१-६-१३ इसवी

दस्तुर पांडुरग भगवंत मोकाशी क्लर्क

सही

सखाराम वा॥ सोनाजी पारखडे रा० देऊळगांव जहागीर ता० बाळापूर

नो० नं० २०

नोटीस 32

रा० आभान वा॥ केशरसींग जाधव रा० पिंपळगांव

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून तुझांस या लेखावरून असें कळविलें जाते कीं ता० १३।५।१३ इ० रोजीं तुझी खरेदी घेतलेलें शेत आह्मांस २०० रु. एकर प्रमाणे मौजे मानेगांव येथील मयत मारोती पाटील खोंद्रे याचे खरेदी देण्याचें ठरून बयन्याबद्दल रु० २०० माझें जवळून घेतले व राहिलेले पैसे सालीम शेताचे एकराचे मानाने जे होतील ते नामू वा॥ रूपचंद पाटील यांचे मार्फत मे महिना अखेर देवून खरेदीखत करून घेण्याचा ठराव चार पंचासमक्ष झाला अमून त्या प्रमाणें मी ता० २५ मेचे आंत १।२ वेळ रक्कम घेवून तुमचेकडे आलों असतां तुझी रुपये घेवून खरेदीखत लिहून देत नाहीं सबब असे कळवितों कीं ८ दिवसाचें आंत ठरल्याप्रमाणें नोंदणार अम्मलदारासमोर रुपये घेवून खरेदीखत करून द्यावें तसे तुमचे कडून न झाल्यास तुमचेवर योग्य कोर्टात दावा करून या नोटीसीचा व कोर्टाचें खर्चासुद्धां जमीनीसह भरून घेतला जाईल हे पक्के समजावें कळावें ता० ५ जुन सन १९१३ इ.

सही

इश्राजी वा॥ भगवान रावूत रा० पिंपळगांव नि० खुद

नो. नं. २१

नोटीस 33

नोटीस बेशमी हिरासींग मोहनसींग रजपूत रा० आपोती बु॥

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी माझे साक्षांत देर आहांत. माझी व तुमची इष्टेट एकत्रच असून माझा नवरा मेल्यावर तुझी मला व माझा मुलगा गणपतसींग याजला हिस्सा न देतां हाकून दिलें. ह्मणून मी दिवाणी कोर्टात दावा करून तुमचेवर आज दोन वर्षांपूर्वी फैसल मिळविला, माझा मुलगा गणपत हा बिघडला आहे व तुझी त्याची इष्टेट पचविण्याचे विचारांत आहांत. तारीख २३।६।१३ इ० रोजीं त्याला फुसलावून माझे पश्चात बेकायदेसीर पावती लिहून घेतली. ती मला कबूल नाहीं. बाळपणापासून त्याचे पालनपोषण मी केलें. तरी पुढें मी व माधोसींग व लालसींग यांचा विचार घेतल्याशिवाय कोणत्याही तऱ्हेचा माझे मुला जवळून लेख करून घेऊं नये. अगर समज घेऊं नये. ती केलेली पावती रद्द समजावी. जर या पुढें असा प्रकार केल्यास फुसलाविल्याबद्दल मोकदमा कायद्याप्रमाणें केला जाईल करितां नोटीसीनें कळविले आहे तारीख २५-६-१३

सही

रज्याबाई मर्द गुमानसींग रजपूत रा० आपोती बु॥ निशाणी बांगडी

नो. नं. २२

नोटीस 29

बजाई मर्द लक्ष्मण सोनार रा. भाडगांव ता. मलकापूर जि० बुलडाणा ईस खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं:—

तूं आमची वडील भावजय असोन तुझा नवरा नामें लक्ष्मण मोहना सोनार हा आज बावीस वर्षें जाहलीं नापत्ता आहे. आह्मी सर्व एकत्र असोन आमच्या अद्याप वाटण्या जाहल्या नाहींत. अशा स्थितींत तुला फक्त अन्नवस्त्राचा व पोटगीचा हक्क आहे. आतां तो मी तुजला देत आहे व देण्यास तयार आहे. आतां मला असें समजतें कीं, तुझ्या मनांत कांहीं विचार येऊन तुझा नवरा व आमच्या समाईक असलेल्या स्थावर जंगम इस्टेटीची अफरातफर करणार आहेस, अगर कोणास गहाण अगर खरेदी देण्याचे विचारांत आहेस. तरी तुला कळविण्यांत येतें कीं, तुजला असें करण्याचा अधिकार नाहीं. तसेंच तुझे कडून कोणीही गहाण अगर खरेदी बक्षीस करून घेतल्यास त्याचे बद्दल मी जबाबदार नाहीं. ही नोटीस द्यावी लागल्यानें याचा खर्च तुजवर आहे. ता० २१।६।१३

सही

तुकाराम मोहना सोनार द० खु०

नो० नं० २३

नोटीस 28

राजश्री मोतीलाल बससीलाल साहु दुकान आकोला यांसी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, चुन्नाबाई जवजे मुकंदलाल ह्या नांवची दुकान असून मालक आपण आहात असें आह्मास समजले वरून नोटीस देण्यांत येते कीं, अमचे बापानें ठेविलेली आवाबाई मर्द परशराम धनगर रा० रिधोरे इजला दि० मु० ३३ सन १८१२ सर्वे नंबर १३ एकर १५ गुंठे ३७ आकार रु. ३२ हें शेत जीवंत आहे तोंपावेतो खण्यास मिळाले आहे. तिजला गहाण अगर खरेदीस अधिकार मुळींच नाहीं. तुझी आमचे परवानगी शिवाय जे कांहीं घेवदेव व कागद वगैरे झाले असतील ते रद्द असे. सदरहु शेत तुमचे ताब्यांत कसे घेतले हे तरी सदरहु शेत १५ दिवसाचे आंत खांडून द्यावें खालीं न केल्यास योग्य कोर्टात दावा करून कोर्ट खर्चाचे पैसेही तुह्मास द्यावे लागतील कळावें ता० २४।६।१३

सही

मुकुंदराव जानजी व सिताराम जानजी रा० रिधोरे ता० बाळापुर पोष्ट आकोला.

नो० नं० २४

नोटीस 30

मी धोंडी मर्द सुलाजी पुंड माळी रा. मौजे उकळी प्र. व मेहकर जि. बुलडाणा यांजकडून सु वा॥ असरू पुंड जात माळी रा. उकळी प्र. व ता. मेहकर जी. बु यांस या नोटीसीनें कळाविण्यांत कीं, मी तुमची लग्नाची बायको आ यांत येण्यास अंदाज ४।५ वर्षें त्या मुदतींत मी तुमचें येथें नांदत तुमचा एकत्र सखा वडील भाऊ ह माझा सखा वडील दीर याचे गैर मुळें व वाईट हेतु मुळें मजला त्रास होउ लागला त्या मुळें मी उकळी मजकुरी आपले आई बापा जाऊन राहिलो. तुह्मांस बरेंच वेळां ले कीं मी नांदण्यास तयार आहे वर प्रमाणें तुमचे वडील भावांत वरील मुळें नराहतां वेगळे राहुं तरी इकडे लक्ष दिले नाहीं सबब मी वर्षां पासून साहुकारी कर्ज काढून उदर निर्वाह करीत आहे. मी नव असून नवऱ्या वांचून कोठ पर्यंत तेव्हां तुह्मीं मजवर झालेले सावका कर्ज रुपये २०० देऊन ही नो पावतांच मजला घेऊन जाणें व वे ठेवणें मी येण्यास तयार आहे असें केल्यास ही दिलेली नोटीस हीच फा ती समजून मी दुसरा घरठाव क मग तुमचा मजवर व माझ्याशीं करणाऱ्यावर कोणतेच प्रकारचा चालणार नाहीं कळावें ता. २९।४।१३

सही

नि. धोंडी मर्द सुलाजी

नो० नं० २९

जाहीर नोटीस. 30

मी खालीं सही करणार या नो सीनें सर्वत्र लोकांस जाहीर करितें माझा नवरा लक्ष्मीनारायण सिवबकस म वाडी रा. हिवरे खुर्द ता. मेहकर बुलडाणा हा मयत होऊन सुमारें वर्षें झालीं त्यांचे मरणा नंतर मी म जिनगीचा कारभार दोन वर्षापा माझा पुतण्या सुरजमल जमनादास याज सोपविला होता. परंतु सदरहू मुल चांगले वर्तनाचा नमून वाईट छंद लागला आहे करीतां मी त्यास कारभ वरुन कमी केले आहे. माझी स्था जंगम इस्टेट माझे नवऱ्याची संपा आहे. तरी ती कोणी गहाण, ख वगैरे घेऊनये घेतल्यास त्या बद्दल घेण जबाबदार राहून त्याजवर योग्य तऱ्ह केली जाईल. माझे नवऱ्य हातचे घेणें त्यास कोणी देऊंनये दिल्य ते घेणें माझें असल्यानें मी द करीन. करीतां माझे पुतण्याशी को इस्टेटी संबंधी व्यवहार करुं कळावे तारीख ३।६।१३ई.

सही.

सोनाबाई भ्रतार लक्ष्मीनारायण वाडी रा. हिवरे खुर्द ता. हकर नि. बुल

नो० नं० २६ नि. आं